मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.

https://www.vruttamanas.in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com

मुंबई/ पालघर | शुक्रवार, २५ ऑक्टोबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - १२५ | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

## भारताच्या सरन्यायाधीशपदी संजीव खन्ना यांची निवड



**नवी दिल्ली :** मावळते सरन्यायाधीश डी वाय चंद्रचूड यांनीच संजीव खन्ना यांचं नाव सुचवलं होतं. त्यानंतर आता राष्ट्रपतींनी खन्ना यांच्या नावावर शिक्कामोर्तब केलाय. खन्ना हे ११ नोव्हेंबर रोजी सरन्यायाधीश पदाची शपथ घेतील. चंद्रचूड यांच्यानंतर संजीव खन्ना हे सर्वात वरिष्ठ न्यायाधीश आहेत. त्यांनी काही ऐतिहासिक आणि महत्त्वाचे निकाल दिले आहेत. केंद्रीय विधी व न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी ही घोषणा केली.



## जस्टिन ट्रुडो यांच्या राजीनाम्याची मागणी

पान 8

### राष्ट्रवादी श. प. पक्षाची पहिली यादी जाहीर

# बारामतीमध्ये काका विरुद्ध पुतण्या



अजित पवार वि. युगेंद्र पवार लढत निश्चित





प्रतिनिधी

**पुणे**

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने विधानसभा निवडणुकीसाठी आपली पहिली यादी जाहीर केली आहे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आज पुण्यात पत्रकार परिषद घेऊन ४५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. यामध्ये बारामतीमधून युगेंद्र पवार यांना उमेदवारी दिल्यामुळे आता बारामतीत काका विरुद्ध पुतण्या असा संघर्ष पुन्हा एकदा दिसणार आहे. तर मुक्ताईनगरमधून रोहिणी खडसे यांनाही उमेदवारी देण्यात आली आहे. तर राष्ट्रवादीचे युवा नेते महेबुब शेख यांना बीड जिल्ह्यातील आष्टी मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. उरलेल्या मतदारांची यादी मुंबईत जाऊन जाहीर केली जाईल, असे जयंत पाटील यांनी सांगितले. काही जागांवर अद्यापही चर्चा सुरू आहे. त्यामुळे त्यांची नावे मुंबईतच जाहीर केले जाईल, असेही ते म्हणाले.

प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील पुढे म्हणाले की, तीनही पक्षांनी प्रत्येकी ८५ जागांवर एकमत केले आहे. उरलेल्या जागांवर मित्रपक्षांशी चर्चा करून त्याही जागा लवकरच जाहीर केल्या जातील. तीनही पक्ष २७५ जागा लढविणार असून उरलेल्या जागा मित्रपक्षांना देण्यात येतील. तसेच मुंबईतील अणुशक्ती नगर हा नवाब मलिकांचा मतदारसंघ आहे. या मतदारसंघात कुणाला उमेदवारी द्यायची, हा निर्णयही लवकरच घेतला जाईल, असेही ते म्हणाले. पुढील दोन दिवसांत महाविकास आघाडीचा संयुक्त जाहीरनामा जाहीर केला जाईल, असेही जयंत पाटील म्हणाले.प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी ४५ उमेदवारांची नावे जाहीर केली

### मतदारसंघ व उमेदवार

- इस्लामपूर – जयंत पाटील
- काटोल – अनिल देशमुख
- घनसावंगी – राजेश टोपे
- कराड उत्तर – बाळासाहेब पाटील
- मुंब्रा कळवा – जितेंद्र आव्हाड
- कोरेगाव – शशिकांत शिंदे
- वसमत – जयप्रकाश दांडेगावकर
- जळगाव ग्रामीण – गुलाबराव देवकर
- इंदापूर – हर्षवर्धन पाटील
- राहुरी – प्राजक्त तनपुरे
- शिरूर – अशोक पवार
- शिराळा – मानसिंगराव नाईक
- विक्रमगड – सुनील भुसारा
- कर्जत जामखेड – रोहित पवार
- अहमदपूर – विनायकराव पाटील
- सिंदखेडराजा – डॉ. राजेंद्र शिंगणे
- उदगीर – सुधाकर भालेराव
- भोकरदन – चंद्रकांत दानवे
- तुमसर – चरण वाघमारे
- किनवट – प्रदीप नाईक
- जिंतूर – विजय भांबळे
- केज – पृथ्वीराज साठे
- बेलापूर – संदीप नाईक
- वडगाव शेरी – बापूसाहेब पठारे

# महायुतीत उर्वरीत जागांचा तिढा सुटला

## अमित शहांच्या उपस्थितीत पुन्हा दिल्लीत बैठक

प्रतिनिधी

**नवी दिल्ली**

दिल्लीत पुन्हा एकदा महायुतीची बैठक केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या निवासस्थानी पार पडली. या बैठकीमध्ये जवळपास २५ जागांवर चर्चा झाली. महायुतीचे जागावाटप जवळपास ठरले असून उर्वरित जागांचा तिढा सुटल्याचे समजते. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस आणि अजित पवार यांच्यासह भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकूळे, राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे या बैठकीला उपस्थित होते. दरम्यान, महायुतीतील जागावाटप ठरले असले तरी राज्यात ५ ते ७ जागांवर तिन्ही पक्ष दावा करत असल्याने या जागांवर अंतिम निर्णय शेवटपर्यंत होण्याची शक्यता कमी असल्याचे समजते. साडेतीन तास ही बैठक चालली, तत्पुर्वी भाजपची स्वतंत्र बैठकही पार पडली.

दरम्यान, अमित शाह यांच्यासोबत महायुतीच्या नेत्यांची चर्चा सकारात्मक झाली असुन निवडून येण्याची क्षमता हा मुद्दा चर्चेच्या केंद्रस्थानी होता. ज्या जागांबाबत संदिग्धता आहे तिथे जिंकण्याची क्षमता विचारात घेऊनच निर्णय होणार आहे. तसेच दिल्लीतली चर्चा आता पूर्ण झाली असून महाराष्ट्रात चर्चेची अंतिम फेरी होणार आहे. जागा वाटपाच्या अंतिम सुत्राची घोषणाही लवकरच महाराष्ट्रात होणार आहे.

दिल्लीतील महायुतीच्या बैठकीमध्ये महायुतीचा जाहीरनामा, अपेक्षित बंडखोरी टाळणे या विषयावरही चर्चा झाल्याचे समजते. या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार महायुतीचा जाहीरनामा एकत्र असणार आहे.

### शहा- फडणवीस यांच्यात स्वतंत्र बैठक

महायुतीच्या बैठकीपूर्वी अमित शहा यांनी देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्यामध्ये ४५ मिनिटे चर्चा झाली. या बैठकीत राज्यातील प्रचार आणि रणनितीवर चर्चा झाल्याचे समजते. महायुतीमध्ये भाजपच मोठा भाऊ असणार आहे. या पार्श्वभूमीवर मित्र पक्षांना सोबत घेणे, मित्र पक्षांसाठीही रणनीती तयार करणे मित्र पक्षांच्या मतदारसंघात सभांचे नियोजन करणे यावरही चर्चा झाल्याचे समजते.

# काँग्रेसकडून पहिली यादी जाहीर

## 48 उमेदवारांच्या नावांची घोषणा

प्रतिनिधी

**मुंबई**

विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाकडून पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. गुरुवारी रात्री 09 वाजताच्या सुमारास पहिली यादी जाहीर करण्यात आली असून यामधून 48 उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे. या नावांमध्ये यशोमती ठाकूर, विश्वजीत कदम, विकास ठाकरे, विजय वडेट्टीवार, डॉ. ज्योती गायकवाड, मोहम्मद आरिफ नसीम खान, मुजफ्फर हुसेन, अमिन पटेल, नाना पटोले, अस्लम शेख, पृथ्वीराज चव्हाण, रवींद्र धंगेकर, धीरज देशमुख आणि अमित देशमुख या देशमुख बंधूंचा या यादीत समावेश आहे.

महाविकास आघाडीकडून उमेदवारांची यादी कधी जाहीर करण्यात येणार? असा प्रश्न उपस्थित करण्यात येत होता. ज्यानंतर बुधवारी शिवसेना ठाकरे गटाने आणि गुरुवारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने उमेदवारांच्या नावांची घोषणा केली.

तर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना साकोली विधानसभेतून उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तर, कलकुवामधून के. सी. पडवी, शहादामधून राजेंद्र गावीत, तिवसा विधानसभेतून यशोमती ठाकूर, नागपूर पश्चिममधून विकास ठाकरे, नागपूर उत्तपमधून नितीन राऊत, कसबा पेठेतून रवींद्र धंगेकर, कराड दक्षिणमधून पृथ्वीराज चव्हाण, पलूस कडेगावमधून विश्वजीत कदम, संगमनेरमधून बाळासाहेब थोरात, कोल्हापूर दक्षिण विधानसभेतून ऋतुराज पाटील यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

1.अक्कलकुवा – ॲड. के.सी. पडवी
2.शहादा – राजेंद्रकुमार कृष्णराव गावित
3. नंदुरबार – किरण दामोदर तडवी
4.नवापूर – श्रीकृष्णकुमार सुरुपसिंग नाईक
5.साक्री – एसटी प्रवीणबापू चौरे
6.धुळे ग्रामीण – कुणाल रोहिदास पाटील
7.रावेर – ॲड. धनंजय शिरीष चौधरी
8.मलकापूर – राजेश पंडितराव एकाडे
9.चिखली – राहुल सिद्धिविनायक बोंद्रे
10.रिसोड – अमित सुभाषराव झनक
11.धामणगाव रेल्वे -प्रा.वीरेंद्र वाल्मीकराव जगताप
12.अमरावती – डॉ. सुनील देशमुख
13.तेओसा – ॲड. यशोमती चंद्रकांत ठाकूर
14.अचलपूर – अनिरुद्ध बबलूभाऊ सुभानराव देशमुख
15.देवळी – रणजित प्रताप कांबळे
16.नागपूर दक्षिण पश्चिम – प्रफुल्ल विनोदराव गुडधे
17.नागपूर मध्यवर्ती – बंटी बाबा शेळके
18.नागपूर पश्चिम – विकास पी. ठाकरे
19.नागपूर उत्तर – SC डॉ. नितीन काशिनाथ राऊत
20 साकोली – नानाभाऊ फाल्गुनराव पटोले
21.गोंदिया- गोपालदास शंकरलाल अग्रवाल
22.राजुरा- सुभाष रामचंद्रराव धोटे
23.ब्रह्मपुरी – विजय नामदेवराव वडेट्टीवार
24.चिमूर – सतीश मनोहरराव वारजूकर
25.हदगाव – माधवराव निवृत्तीराव पवार पाटील
26. भोकर- तिरुपती बाबुराव कदम कोंडेकर
27. नायगाव – मीनल निरंजन पाटील (खतगावकर)
28. पाथरी – सुरेश अंबादास वरपुडकर
29. फुलंब्री – विलास केशवराव औताडे
30. मीरा भाईंदर – सय्यद मुजफ्फर हुसेन
31. मालाड पश्चिम – अस्लम आर. शेख
32. चांदिवली – मोहम्मद आरिफ नसीम खान
33. धारावी – डॉ.ज्योती एकनाथ गायकवाड (ST)
34. मुंबादेवी – अमीन अमीराली पटेल
35. पुरंदर – संजय चंद्रकांत जगताप
36. भोर – संग्राम अनंतराव थोपटे
37. कसबा पेठ – रवींद्र हेमराज धंगेकर
38. संगमनेर – विजय बाळासाहेब थोरात
39. शिर्डी – प्रभावती जे.घोगरे
40. लातूर – ग्रामीण धिरज विलासराव देशमुख
41. लातूर शहर – अमित विलासराव देशमुख
42. अक्कलकोट – सिद्धाराम सातलिंगप्पा म्हेत्रे
43. कराड दक्षिण – पृथ्वीराज चव्हाण
44. कोल्हापूर दक्षिण – रुतुराज संजय पाटील
45. करवीर – राहुल पांडुरंग पाटील
46. हातकणंगले – राजू जयंतराव आवळे (SC)
47. पलूस-कडेगाव – डॉ.विश्वजीत पतंगराव कदम
48. जाट – विक्रमसिंह बाळासाहेब सावंत

# आई अन् बहिणीच्या विरोधात माजी मुख्यमंत्र्यांची कोर्टात धाव

वृत्तसंस्था

**कडप्पा**

आंध्र प्रदेशचे माजी मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांनी आपली आई आणि बहिणीच्या विरोधामध्ये कोर्टात धाव घेतली आहे. रेड्डींच्या घरामध्ये मागच्या काही दिवसांपासून कलह निर्माण झाला आहे. त्यांची बहीण वायएस शर्मिला यांनी दिवंगत वडील वायएस राजशेखर रेड्डी यांच्या निर्देशांचा हवाला देत जगनमोहन रेड्डींना पत्र लिहिलं होतं.



शर्मिला यांनी पत्रामध्ये लिहिलं की, "आपल्या वडिलांनी कमावलेली सर्व संपत्ती चारही नातवांमध्ये समान वाटप झाली पाहिजे, असं त्यांनीच सांगितलं होतं. तुम्ही त्यावेळी वडिलांना याबाबत आश्वासन दिलं होतं आणि त्यांच्या शब्दांचं पालन केलं जाईल, असं शब्द दिला होता. परंतु वडिलांच्या निधनानंतर तुम्ही ते वचन विसरला आहात.".

वायएस शर्मिला यांनी या पत्राच्या माध्यमातून ठासून सांगितलं की, साक्षी मीडिया ग्रुप, भारती सिमेंट्स आणि इतर व्यवसायांवर माझ्या मुलांचा अधिकार आहे. कारण ही संपत्ती त्यांच्या वडिलांनी त्यांच्या आयुष्यात कौटुंबिक संसाधनामधून कमावली होती. "माझा आणि माझ्या मुलांचा वडिलांच्या संपत्तीवर अधिकार आहे, तुम्ही याकडे डोळेझाक करु शकत नाही."

पान 8 वर

## राज्यातून आजपर्यंत 720 नामनिर्देशन पत्र दाखल

**मुंबई**

महाराष्ट्र विधानसभेच्या २८८ मतदारसंघात निवडणुकीकरिता नामनिर्देशन पत्र भरण्याचा आज तिसरा दिवस आहे. तिसऱ्या दिवशी म्हणजे २४ ऑक्टोबर २०२४ रोजी राज्यातून आजपर्यंत ५५२ उमेदवारांचे ७२० नामनिर्देशन पत्र दाखल झाली आहेत, अशी माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे. महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची आदर्श आचारसंहिता १५ ऑक्टोबर २०२४ पासून लागू झाली असून २२ ऑक्टोबर २०२४ रोजी निवडणूक अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली.

# पंतप्रधान मोदी 8 दिवस महाराष्ट्रात

## महायुतीच्या प्रचारासाठी घेणार 8 जाहीर सभा

प्रतिनिधी

**मुंबई**

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झाली असून गुरुवारी अनेक दिग्गजांनी आपले उमेदवारी अर्ज भरले. चंद्रकांत पाटील, हर्षवर्धन पाटील, आदित्य ठाकरे, जितेंद्र आव्हाड यांनी शक्तीप्रदर्शन करत आपले नामांकन दाखल केले. 29 ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी भरण्याची तारीख असून त्यानंतर प्रचाराला सुरुवात होणार आहे. महायुतीच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्रात येणार आहेत.



पंतप्रधान मोदींच्या राज्यात 8 सभा होणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी 7 नोव्हेंबर ते 14 नोव्हेंबर महाराष्ट्रात तळ ठोकून असणार आहेत. या 8 दिवसांत ते विविध मतदारसंघात जाहीर सभा घेतील. पंतप्रधान मोदी 14 नोव्हेंबरपासून परदेश दौऱ्यावर जाणार आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रचारासाठी फारसा वेळ नसणार. त्यामुळे या 8 दिवसांत मोदींच्या जास्तीत जास्त सभा घेण्यावर महायुती भर देईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी केवळ भाजपच नाही तर महायुतीच्या घटक पक्षातील उमेदावारांच्या प्रचारासाठी सुद्धा सभा घेणार आहेत.

### काँग्रेस यूपीत पोटनिवडणूक लढवणार नाही

# सपाने सर्व 9 जागांवर उमेदवार केले जाहीर

प्रतिनिधी

**लखनौ**

काँग्रेस उत्तर प्रदेशातील विधानसभा पोटनिवडणूक लढवणार नाही. पक्षाचे प्रदेश प्रभारी अविनाश पांडे यांनी गुरुवारी ही घोषणा केली. ते म्हणाले, 'पोटनिवडणुकीत काँग्रेस इंडिया आघाडीला पाठिंबा देईल.' यानंतर सपाने गाझियाबाद आणि खैर या जागांवरही आपल्या उमेदवारांची नावे जाहीर केली. सपाने यापूर्वीच 7 जागांसाठी उमेदवारांची नावे निश्चित केली होती. राज्यात 13 नोव्हेंबरला विधानसभेच्या 9 जागांसाठी पोटनिवडणूक होणार आहे. 23 नोव्हेंबरला निकाल लागणार आहे.

तत्पूर्वी, अखिलेश यादव यांनी बुधवारी रात्री 11.11 वाजता डॉ गुरुवारी सकाळी अखिलेश यांनी राहुल यांचा हात धरलेला एक फोटोही शेअर केला आहे.

अखिलेश यांनी गुरुवारी राहुल गांधींचा हात धरलेला एक फोटो ट्विटरवर शेअर केला. त्यावर लिहिले होते, 'हमने ठाना है. संविधान, आरक्षण और सौहार्द बचाना है।'

### अखिलेश यांनी राहुल यांचा हात धरलेला फोटो शेअर केला



हा जागेचा नाही तर विजयाचा मुद्दा आहे. या रणनीतीनुसार, 'इंडिया अलायन्स'चे संयुक्त उमेदवार सर्व 9 जागांवर सपाच्या चिन्ह 'सायकल'वर निवडणूक लढवतील. काँग्रेस आणि सपा मोठ्या विजयासाठी खांद्याला खांदा लावून उभे आहेत. या पोटनिवडणुकीत इंडिया आघाडी विजयाचा नवा अध्याय लिहिणार आहे. काँग्रेस पक्षाचे सर्वोच्च नेतृत्व ते बूथ पातळीवरील कार्यकर्ते एकत्र आल्याने सपाची ताकद अनेक पटींनी वाढली.

पान 8 वर






२ वृत्तमानस
पालघर, मुंबई
मुंबई, शुक्रवार, २५ ऑक्टोबर २०२४

## डाबर मेसवाकच्या ब्रँड ॲम्बेसेडरपदी नागार्जुन अक्किनेनी

**मुंबई :** भारतातील आघाडीची विज्ञान-आधारित आयुर्वेद कंपनी डाबर इंडिया लिमिटेडने आपल्या ओरल केअर ब्रँड डाबर मेसवाकसाठी सुप्रसिद्ध दक्षिण अभिनेता आणि सुपरस्टार नागार्जुन अक्किनेनी यांची ब्रँड ॲम्बेसेडरपदी नियुक्ती केली आहे. डाबर मेसवाकमध्ये मौखिक काळजीकरिता ७० पेक्षा जास्त फायद्यांसाठी ओळखल्या जाणा-या चमत्कारी औषधी वनस्पती मेसवाकचा शुद्ध अर्क आहे. ही भागीदारी नागार्जुनचे चाहते असणा-या दक्षिण भारतात डाबर मेसवाकचे स्थान आणखी मजबूत करेल. याबद्दल बोलताना नागार्जुन अक्किनेनी यांनी सांगितले की, "ज्या ब्रँडवर मी अनेक वर्षांपासून वैयक्तिकरित्या विश्वास ठेवत आहे त्या डाबर मेसवाकसोबत जोडल्याचा मला आनंद होत आहे. डाबर मेसवाक संपूर्ण मौखिक काळजी प्रदान करते. मी डाबर मेसवाकसोबतच्या या भागीदारीबद्दल आणि प्रत्येकाला मौखिक काळजी घेण्याचे रहस्य सांगण्यासाठी खूप उत्सुक आहे."




## थोडक्यात

### रविवारी केशव गोरे स्मारक ट्रस्ट मध्ये कार्यशाळा

**मुंबई:** उत्तरदायित्व फाउंडेशन, समन्वय व केशव गोरे स्मारक ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने, 27 ऑक्टोबर 2024 रोजी सायंकाळी 4 ते 7 या वेळेत "कायदेमंडळाची कर्तव्ये आणि लोकांचे प्रश्न" या विषयावर केशव गोरे स्मारक ट्रस्ट, मृणालताई गोरे कला दालन, आरे रोड,गोरेगाव पश्चिम, येथे एक कार्यशाळा घेण्यात येणार आहे. विधानसभा आणि विधान परिषदेच्या (विधिमंडळ ) अधिवेशनांचे कामकाज कशा प्रकारे चालते तसेच लोकांच्या जिव्हाळ्याचे प्रश्न लोकप्रतिनिधींच्या मार्फत कशाप्रकारे अधिवेशनात उपस्थित केले जातात, त्याची कार्यपद्धती कोणती याविषयी 'संपर्क' संस्थेच्या मेधा कुलकर्णीव अशोक राजवाडे हे कार्यशाळेस मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यशाळेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या लोकांनी खाली दिलेल्या नंबरवर पूर्व नोंदणी करावी, असे आवाहन राजू गडहिरे-8850638034,ॲड. समता रेड्डी -9969884331व ॲड. प्रणितकुमार म्हस्के -9594038758 यांनी केले आहे.

### अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार

**वसई:** नालासोपाऱ्यात आणखी एक सामूहिक बलात्काराची घटना उघडकीस आली आहे. १६ वर्षाच्या मुलीवर तिच्या वर्गमित्रासह दोघांना धमकावून बलात्कार केला तसेच तिची अश्लील छायाचित्रे काढून तिला धमकावले आहे. याप्रकरणी नालासोपारा पोलिसांनी दोन विधीसंघर्षित (अल्पवयीन) मुलांवर सामूहिक बलात्कार आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियमाअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पीडित मुलगी १६ वर्षांची आहे. ऑगस्ट महिन्यात तिचा १६ वर्षांचा वर्ग मित्र तिला निळेमोरे येथील एका मित्राच्या घरी घेऊन गेला होता. तेथे तिला फूस लावून त्या दोघांनी तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर दोघांनी पुन्हा तिला धमकावून निळेमोरे येथे बोलावून तिच्यावर बलात्कार केला. यावेळी एका आरोपीने त्यांच्या संबंधाचे चित्रिकरण केले. या चित्रिकरणाच्या आधारे दोन्ही तिला धमकावत होते. याप्रकरणी पिडीत मुलीच्या आईने नालासोपारा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. यातील एक आरोपी १६ तर दुसरा आरोपी १७ वर्षांचा आहे. त्यांच्या विरोधात नालासोपारा पोलिसांनी सामूहिक बलात्कार आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियमाअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

## बोईसरमध्ये बविआसमोर तगडा उमेदवार

# मविआकडून डॉ. विश्वास वळवी यांना उमेदवारी जाहीर

**प्रतिनिधी**
■ **वसई**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांचे बिगुल वाजल्यानंतर, उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. पालघर जिल्ह्यातील सर्वच प्रमुख पक्ष येत्या काही दिवसांत आपापले उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या तयारीत आहेत. विशेषतः बोईसर विधानसभा मतदारसंघात, ठाकरे गटाने महायुती आणि बहुजन विकास आघाडीला जोरदार आव्हान देण्यासाठी डॉ. विश्वास वळवी यांची उमेदवारी जाहीर केली आहे.

मागील काही दिवसांपूर्वी बहुजन विकास आघाडीचे माजी खासदार बळीराम जाधव यांचे चुलत बंधू रमेश जाधव ठाकरे गटात सामील झाले होते. रमेश जाधव यांना विधानसभा निवडणुकीत उतरण्याची अपेक्षा होती परंतु उमेदवारी न मिळाल्याने त्यांच्या आकांक्षांवर पाणी फिरले आहे. त्याऐवजी ठाकरे गटाने डॉ. विश्वास वळवी यांना महाविकास आघाडीच्या तिकिटावर मैदानात उतरवले आहे.

### महायुतीचा उमेदवार अजून गुलदस्त्यात

बहुजन विकास आघाडीचे विद्यमान आमदार राजेश पाटील यांना यंदाही उमेदवारी मिळाल्याने ते पुन्हा बोईसरमधून निवडणुकीत उतरले आहेत. मात्र या वेळी त्यांच्यापुढे ठाकरे गटाच्या डॉ. विश्वास वळवी यांचे तगडे आव्हान उभे राहिले आहे. बोईसर विधानसभा मतदारसंघात ठाकरे गटाचा कोणताही खास मोठा चेहरा नसतानाही, मागील लोकसभा निवडणुकीत त्यांच्या उमेदवार भारती कामडी यांनी महत्त्वपूर्ण मते मिळवली होती. बहुजन विकास आघाडीचे राजेश पाटील हे तिसऱ्या क्रमांकावर होते.

या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या बाजूने सहानुभूतीची लाट असल्याचे बोलले जात आहे, ज्याचा फायदा डॉ. वळवी यांना होऊ शकतो. तसेच, भाजपकडून माजी आमदार विलास तरे आणि संतोष जनाठे यांच्यात उमेदवारीसाठी चुरस आहे. यापैकी कोणाला उमेदवारी दिली जाईल हे येत्या एक, दोन दिवसांत निश्चित होईल.

या निवडणुकीत बहुजन विकास आघाडीला कडवे आव्हान मिळण्याची शक्यता असून, त्यांना आपला गड राखण्यासाठी मोठी मेहनत घ्यावी लागणार आहे.

# नालासोपाऱ्यात भाजपची प्रचार मोहीम जोमात

## राजन नाईक आज भरतील उमेदवारी अर्ज

**प्रतिनिधी**
■ **वसई**

नालासोपारा मतदारसंघातील बहुजन विकास आघाडीचा (बविआ) गड भेदण्याच्या उद्देशाने भारतीय जनता पक्षाने (भाजप) प्रचाराचे रणशिंग फुंकले आहे. नालासोपारा मतदारसंघातील राजकीय वातावरण तापवत भाजपने जिल्हाध्यक्ष राजन नाईक यांना उमेदवारी दिली आहे. बहुजन विकास आघाडीत राहण्याचा निर्णय घेतलेल्या राजीव पाटील यांच्यामुळे भाजपने नव्या रणनीतीनुसार नाईक यांच्यावर विश्वास ठेवला आहे. आज (२५ ऑक्टोबर) राजन नाईक मोठ्या शक्ती प्रदर्शनासह आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत हा उमेदवारी अर्ज दाखल होणार आहे. राजन नाईक यांनी आपल्या प्रचाराची जोरदार सुरुवात केली असून नालासोपाऱ्यात भाजपचे बडे नेते आधीच प्रचाराच्या आखाड्यात उतरले आहेत. त्यांच्या उपस्थितीत भाजप कार्यकर्त्यांना मार्गदर्शन देण्यात आले आहे, ज्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये ऊर्जा संचारली आहे.

भाजपने या मतदारसंघाला प्रतिष्ठेचे मानले असून या पार्श्वभूमीवर भाजपचे जेष्ठ नेते किरीट सोमय्या आणि पालघरचे खासदार डॉ. हेमंत सावरा यांनीही नालासोपाऱ्यात हजेरी लावली होती. त्यांनी पक्षाच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधत निवडणूक रणनितीवर चर्चा केली आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन दिले.

दरम्यान, बविआने या मतदारसंघातून विद्यमान आमदार क्षितीज ठाकूर यांना संधी दिली आहे. बोईसर मतदारसंघातून बविआचे उमेदवार म्हणून राजेश पाटील निवडले गेले आहेत. यंदाच्या निवडणुकीत भाजप आणि इतर पक्षांमध्ये उमेदवार निश्चितीवरून अजूनही काही ठोस निर्णय झालेला नसल्याने वसई, नालासोपारा आणि बोईसरमध्ये प्रचाराचे वातावरण तुलनेने थंड आहे. मात्र, ४ नोव्हेंबरनंतर प्रचाराला खरी रंगत येईल अशी शक्यता आहे. ज्यामध्ये भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची प्रचारात सक्रिय सहभागाची अपेक्षा आहे.

***बोईसरमध्ये महायुतीत बंडखोरीची शक्यता***

*बोईसर विधानसभा मतदारसंघात महायुतीत बंडखोरीची शक्यता वाढली आहे. भाजप आणि शिंदे गट दोन्ही या जागेसाठी सज्ज आहेत, मात्र अद्याप उमेदवार निश्चित झाला नाही. भाजपमधून माजी आमदार विलास तरे आणि संघ कार्यकर्ते संतोष जनाठे इच्छुक आहेत. तर शिंदे गटातून माजी आमदार मनिषा निमकर आणि जगदीश धोडी यांच्यात उमेदवारीसाठी रस्सीखेच सुरू आहे. २०१९ साली संतोष जनाठे यांच्या बंडखोरीमुळे बहुजन विकास आघाडीचे राजेश पाटील विजयी झाले होते. यंदाही अशीच बंडखोरी होण्याची शक्यता असल्याने बहुजन विकास आघाडीला याचा लाभ मिळण्याची शक्यता आहे.*

# बेस्टला पुन्हा हवा अर्थआधार
## पालिकेकडून पाच वर्षांत साडेआठ हजार कोटी रुपयांची मदत

■ **मुंबई**

उत्पन्न वाढवणे आणि खर्च कमी करण्यासाठी बेस्ट उपक्रमाकडून विविध प्रयत्न केले जात असतानाही उत्पन्न काही फारसे वाढलेले नाही. त्यामुळे बेस्टला निवृत्त कर्मचाऱ्यांची देणी, दैनंदिन खर्च भागवणे यांसह अन्य कामे मार्गी लावण्यासाठी मुंबई महापालिकेकडे आर्थिक मदत मागावी लागत आहे.

२०२४-२५ मधील महापालिकेच्या अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदींपैकी फक्त ५९ कोटी रुपयेच शिल्लक असून यापलिकडे रक्कम देणार कशी, असा प्रश्न मुंबई महापालिकेला पडला आहे. मागील पाच वर्षांत महापालिकेने बेस्टला साडेआठ हजार कोटी रुपये आर्थिक मदत देऊनही उत्पन्नवाढीसह कर्मचाऱ्यांची देणीही देता आलेली नाहीत. त्यामुळे बेस्ट उपक्रमाकडून दैनंदिन खर्च, गरजा भागवण्यासाठी महापालिकेकडे मदत मागावी लागत आहे. बेस्ट उपक्रमाची आर्थिक परिस्थिती विचार घेऊन २०२४-२५मध्ये अर्थसंकल्पात तरतूद करून मुंबई महापालिकेने अनुदान देण्याचा निर्णय घेतला. यामुळे बेस्ट उपक्रमाची पायाभूत विकास आणि भांडवली उपकरणे खरेदी, कर्जाची परतफेड, भाडेतत्त्वावरील नवीन बस घेणे, दैनंदिन खर्च भागवणे, निवृत्त कर्मचाऱ्यांची देणी आदी कामे मार्गी लावली जाणार आहेत.

२०२४-२५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये बेस्ट उपक्रमास अनुदान म्हणून ९२८ कोटी रुपये तरतूद प्रस्तावित करण्यात आली. मुंबई महापालिका यापैकी १२८ कोटी रुपये रक्कम ही बसखरेदीसाठी देणार आहे. उर्वरित रक्कम विविध कामांसाठी बेस्टला देण्यात आली असून फक्त ५९ कोटी रुपयेच शिल्लक असल्याची माहिती मुंबई महापालिकेतील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

# महापरिनिर्वाणदिनी चैत्यभूमीवर उभारण्यात येणाऱ्या स्टॉलवरील जीएसटी रद्द करण्याची मागणी

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

महापरिनिर्वाण दिना साठी 5 ते 6 डिसेंबर 2024 रोजी चैत्यभूमी दादर परिसर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहण्यासाठी देशभरातून येणाऱ्या गरीब आणि गरजू अनुयायांना मोफत अन्न, पाणी, आणि औषध देणाऱ्या संस्थांच्या तसेच पुस्तकांच्या स्टॉलवर मुंबई महानगरपालिकेकडून 18% जी एस टी' लावण्यात आलेला आहे. हा जी एस टी रद्द करण्यात यावा, अशी मागणी कामगार नेते, बौद्धजन पंचायत समिती, चैत्यभूमी व्यवस्थापक रमेश जाधव यांनी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

मुंबई महानगरपालिकेने वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीत 5 व 6 डिसेंबर रोजी शिवाजी महाराज पार्क व परिसरात उभारण्यात येणाऱ्या विविध वस्तू व भोजनाच्या स्टॉलवर 18% GST आकारत असल्याचे



म्हटले आहे. तसेच स्टॉल वाटपासाठी पाळण्यात येणाऱ्या नियम आणि प्रक्रियेचा तपशील स्पष्टपणे नमूद केला आहे.

खरे तर भारतरत्न, भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनी त्यांना अभिवादन करण्यासाठी आल्यानंतर अनुयायांना लागणाऱ्या सोयी सुविधांच्या विषयांमध्ये हे स्टॉल येतात. म्हणून असा कर आकारणी करणे बरोबर नाही आणि समाजातील वंचित आणि गरजू वर्गाला मदत करण्यासाठी व मार्गदर्शन घेऊन जाण्यासाठी विविध साहित्य तेथे विक्रीसाठी उपलब्ध होते आणि त्यासाठी अशा पद्धतीने जीएसटी लावणे हे योग्य नाही. ६ डिसेंबर हा दिवस डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या प्रस्तावनेत अंतर्भूत केलेल्या समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुत्वाच्या मूल्यांना श्रध्दांजली अर्पण करण्याचा दिवस आहे. आणि त्या दिवशी अनुयायांना भोजन, पाणी, पुस्तके यासाठी उभारले जाणारे ते स्टॉल असतात. मुळात सर्व संघटनेची मागणी आहे की महानगरपालिकेने हे स्टॉल स्वतः बांधून दिले पाहिजेत पण तसं होताना दिसत नाही उलट या स्टॉल वर जीएसटी आकारणे हे योग्य नसल्याचे ही रमेश जाधव यांनी म्हटले आहे.

या मागणीचा गांभीर्यपूर्वक विचार करावा व स्टॉल्सवरील "GST" रद्द करून खऱ्या अर्थाने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करावे अशी विनंतीही रमेश जाधव यांनी शेवटी केली.

# नायगाव पूर्वेत फेरीवाल्यांचा विळखा आणि बेकायदेशीर वसुल्या

**प्रतिनिधी**
■ **वसई**

नायगाव पूर्व परिसरात फेरीवाल्यांच्या बेकायदा धंद्याचे साम्राज्य वाढत असून नालासोपाराच्या नंतर हा परिसर फेरीवाल्यांच्या बेकायदा कृत्यांमध्ये दुसऱ्या क्रमांकावर आला आहे. पालिका, राजकीय नेते आणि पोलिसांच्या पाठबळावर या फेरीवाल्यांकडून बेकायदेशीर वसुली होत असल्याच्या चर्चांना जोर आला आहे.

नायगाव स्टेशनपासून सोपारा खाडी पूलपर्यंतच्या मुख्य मार्गांवर बेकायदा फेरीवाल्यांनी बस्तान मांडले आहे. परेरा नगर आणि स्टार सिटी परिसरातही फेरीवाल्यांची संख्या वाढत आहे. सोपारा खाडी पूल तर फेरीवाल्यांच्या व्यापातून जवळपास मुक्त नाही. फेरीवाल्यांच्या या वाढत्या समस्येमुळे स्थानिक रहिवासी व पादचारी प्रचंड त्रस्त झाले आहेत.



***आयुक्तांच्या आदेशाकडे दुर्लक्ष***

*वसई-विरार महानगरपालिकेचे आयुक्त अनिलकुमार पवार यांनी फेरीवाले आणि अतिक्रमण रोखण्यासाठी विशेष पथक तयार केले असून, सियुसी विभागाचे पुनर्गठनही केले आहे. मात्र, कनिष्ठ अधिकाऱ्यांकडून आयुक्तांच्या आदेशांकडे दुर्लक्ष होत असल्यामुळे फेरीवाल्यांच्या समस्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. या निष्क्रियतेमुळे नायगाव पूर्व आणि इतर परिसरात बेकायदा फेरीवाल्यांचे साम्राज्य फोफावले आहे.*

पालिका प्रशासनाने या बेकायदा फेरीवाल्यांवर कारवाई करण्यास अपयशी ठरले आहे. त्यामुळे नायगाव पूर्व परिसरातील रहदारी आणि स्थानिकांचे दैनंदिन जीवन वेठीस धरले गेले आहे. पादचाऱ्यांच्या मार्गात अडथळे निर्माण होत असून, रहदारीची समस्या गंभीर बनली आहे. स्थानिक रहिवासी वारंवार तक्रार करत असतानाही प्रशासनाने योग्य ती कारवाई केली नसल्याचे दिसून येत आहे.

नायगाव पूर्व परिसरात एक वडापाव विक्रेता राजकीय आणि पोलिस पाठबळाच्या जोरावर फेरीवाल्यांकडून बेकायदेशीर वसुली करत असल्याचे आरोप होत आहेत. हा वडापाव विक्रेता फेरीवाल्यांवर दादागिरी करून त्यांच्याकडून पैशांची वसुली करतो, असे स्थानिकांचा दावा आहे. पालिकेने या अनियमिततेवर लक्ष घालून तातडीने कारवाई करणे अत्यावश्यक आहे.

वसई-विरार परिसरात फेरीवाल्यांचे प्रश्न हे एका मोठ्या संकटाचे रूप घेत आहेत, आणि यावर तातडीने उपाययोजना न केल्यास आगामी काळात याचा फटका शहराच्या व्यवस्थापनावर आणि रहिवाशांच्या दैनंदिन जीवनावर मोठ्या प्रमाणात बसू शकतो.

# मोतीलाल नगरला अनधिकृत लॉजिंग व बोर्डिंगचा विळखा

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

मोतीलाल नगर 1, 2 , 3 आणि सिद्धार्थ नगरच्या म्हाडा वसाहतीमध्ये अनधिकृत बांधकामांचा प्रश्न ऐरणीवर आलेला असताना आता मोतीलाल नगर एक, लिंक रोड आणि सिद्धार्थ नगरमध्ये अनधिकृत लॉजिंग व बोर्डिंगचा विळखा पडलेला दिसून येत आहे. संबंधित विभागाची कोणतीही परवानगी न घेता या परिसरात दहा ते पंधरा हॉटेलच्या नावाखाली लॉजिंग बोर्डिंगचा व्यवसाय जोरात सुरू आहे.

या लॉजिंग व बोर्डिंगमध्ये "रात्रीस खेळ" चालण्याबरोबरच सकाळ व दुपारही अनैतिक धंदे सुरू असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. त्यामुळे या अनधिकृत लॉजिंग व बोर्डिंगवर म्हाडाने कारवाई करावी. तसेच स्थानिक पोलीस ठाण्यानेही याची गंभीर दखल घेऊन लॉजिंग व बोर्डिंगमध्ये अनैतिक धंदे चालवणाऱ्यांवर कठोरात कठोर कारवाई करावी, अशी मागणीही दक्ष नागरिक करीत आहेत. दरम्यान, जर या लॉजिंग व बोर्डिंगवर तात्काळ कारवाई न केल्यास मोतीलाल नगर एक, सिद्धार्थ नगर "रेड लाईट एरिया" बनून जाईल, असा संतप्त सवाल ही स्थानिक नागरिक आहेत.

गोरेगाव पश्चिमेला मोतीलाल नगर १, लिंक रोड, सिद्धार्थ नगर येथील म्हाडाच्या चाळीच्या रस्त्यावर असलेल्या सदनिकेमध्ये अनधिकृत बांधकाम करुन लॉज आणि हॉटेल व्यवसायिकांचा सुळसुळाट पाहायला मिळत आहे. लॉज आणि हॉटेल चालविण्यासाठी लागणार परवाना न घेताच हॉटेल मालक कायद्याला खिशात ठेऊन लॉजिंग व बोर्डिंग थाटून बसले आहेत. विशेष म्हणजे हे हॉटेल रहिवासी (रेसिडेन्स) भागात असल्याने याचा नाहक त्रास स्थानिक रहिवास्यांना होत आहे. या ठिकाणी संध्याकाळ आणि रात्री प्रेमी जोडपे मोठ्या प्रमाणात येत असताना पाहायला मिळत आहेत. त्यामुळे परिसरातील वातावरण बिघडत आहे. दरम्यान, म्हाडाकडून मोतीलाल नगर १.२/३ सिद्धार्थ

नगर, उन्नत नगर येथील निवासी अनधिकृत बांधकामावर कारवाई होत नसल्यामुळे संताप व्यक्त केला जात आहे. त्यातच अशा अनधिकृत व्यावसायिक हॉटेलवर कार्यवाही केली जात जात नसल्यामुळे म्हाडाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उभे केले जात आहे.

***लॉजवर कारवाई होणार - संदीप कळंबे***

*मोतीलाल नगर 1, 2 , 3, लिंक रोड आणि सिद्धार्थ नगरच्या म्हाडा वसाहतीमध्ये अनधिकृत बांधकाम, लॉजिंग व बोर्डिंग मोठ्या प्रमाणात सुरू आहे. याबाबत आमच्या प्रतिनिधीने अतिक्रमण निर्मूलन कक्षाचे प्रमुख संदीप कळंबे यांना विचारले असता या सर्व बेकायदेशीर बांधकामावर आम्ही लवकरच कारवाई करणार आहोत. 30 ते 35 अनधिकृत बांधकाम व बारा ते पंधरा अनधिकृत लॉजिंग व बोर्डिंगचा सर्व्हे केला आहे. त्यानुसार पुढील आठवड्यामध्ये सर्व नियमबाह्य बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात येणार असल्याचे कळंबे यांनी सांगितले.*

# विद्या विकास मंडळ विद्यालयात दिले जाते संस्कार शिक्षण

**प्रतिनिधी**
■ **मुंबई**

सामान्य परिस्थितीतील व प्रामुख्याने वंचित वर्गातील विद्यार्थ्यांना शाळेच्या हितचिंतकांच्या मदतीने उत्तम पायाभूत सुविधा निर्माण करुन विद्या विकास मध्ये संस्कार शिक्षण दिले जाते.फक्त घेणारे हात तयार न करता आपण सुध्दा समाजातील वंचितांसाठी जमेल तशी मदत करु शकतो हा विचार विद्यार्थ्यांच्या मनात अंधेरी पश्चिम येथील विद्या विकासचे शिक्षक रुजवतात.

शाळेच्या विद्यार्थी संसदेतील पंतप्रधान हर्ष पाचाडकर व अध्यक्ष तन्वी टिपराळे यांच्यासह सर्व निवडून आलेल्या विद्यार्थी प्रतिनिधींनी या वर्षी 'अनिर्वेध' या दृष्टीहीन बांधवांसाठी कार्य करणाऱ्या संस्थेचे संस्थापक सचिन व अंजली सरकाळे या दाम्पत्याला



शाळेत बोलावून त्यांच्याशी संवाद साधला. ते करीत असलेले काम समजून घेतले व त्यांचे कौतुक केले.

गुरुपौर्णिमेला शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वतःच्या परिस्थिती नुसार कलशात अर्पण केलेल्या गुरुदक्षिणेची रक्कम अनिर्वेध या दृष्टीहीन बांधवांसाठी कार्य करत असलेल्या संस्थेला देण्याचा निर्णय विद्यार्थी प्रतिनिधींनी घेतला व जमलेल्या रकमेचा धनादेश सरकाळे पती पत्नीकडे सुपुर्द केला.

यावेळी सरकाळे उभयतांनी अनिर्वेध संस्था व ते करत असलेल्या कार्याविषयी मुलांशी मनमोकळा संवाद साधला व मुलांच्या प्रश्नांची उत्तरे दिली.विशेष म्हणजे सचिन सरकाळे हे देखील विद्या विकासच्या संस्कारात घडलेले शाळेचे माजी विद्यार्थी आहेत.

# सोडतीत नाव नाही, तरीही मुंबई म्हाडाकडून 442 जणांना लागली लॉटरी

■ **मुंबई**

मुंबई म्हाडाकडून दोन महिन्यांपूर्वी 2030 घरांसाठी लॉटरी जाहीर करण्यात आली होती. 08 ऑक्टोबरला नरिमन पॉईंट येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांच्या उपस्थितीत ही सोडत जाहीर करण्यात आली. या सोडतीमुळे अनेक मुंबईकरांचे घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे. पण 2030 भाग्यवान लोकांपैकी 442 जणांनी म्हाडाला घर परत केल्याने ज्या लोकांची नावे या सोडतीत आली नव्हती, त्यांना आता ही घरे देण्याचा निर्णय म्हाडाच्या अधिकाऱ्यांकडून घेण्यात आला आहे. ज्यामुळे वेटिंग लिस्टमध्ये असलेल्या उमेदवारांना म्हाडाची लॉटरी लागली आहे. म्हाडामधील एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्या विजेत्यांना घर मिळाले होते, त्यातील काही विजेत्यांनी घर म्हाडाला परत केले आहे. त्यामुळे वेटिंग लिस्टमध्ये असलेल्या अर्जदारांना एसएमएसच्या माध्यमातून माहिती देण्यात येत आहे. त्यानंतर वेटिंग लिस्टमध्ये असलेल्या अर्जदारांना घर विकत घेण्याची संधी मिळणार आहे. म्हाडाने लॉटरी विजेत्यांना 20 ऑक्टोबरपर्यंत घरे स्वीकारण्याची मुदत दिली होती. म्हाडाच्या मुंबई मंडळातील 2030 घरांसाठी 1 लाख 13 हजार 811 जणांनी अर्ज दाखल केला आहे. अनेक लॉटरी विक्रेत्याने एकाहून अधिक घर लागली आहेत. मात्र, नियमांनुसार विजेता एकाहून अधिक घर खरेदी करू शकत नाही. यामुळे या लॉटरीच्या माध्यमातून विजेत्यांना एकापेक्षा अधिक घर स्वीकारता येत नाही. एक घर सरेंडर करावे लागते.

**जाहीर सुचना**

या नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, गाव मौजे विरार, तालुका वसई, जिल्हा पालघर येथील मिळकत सर्व्हे क्रमांक ५०२, मधील प्लॉट क्र. ४, क्षेत्र ६०६.९४ चौ.मी., प्लॉट क्र. ५, क्षेत्र ६०६.९४ चौ.मी., प्लॉट क्र. ६, क्षेत्र ६०६.९४ चौ.मी., प्लॉट क्र. ७, क्षेत्र ६०६.९४ चौ.मी., ही मिळकत व त्यावर असलेली इमारत क्र. १ शिवम व इमारत क्र. २ सत्यम हया इमारती, माझे अशील ओमकारेश्वर सहकारी गृहनिर्माण संस्था लि, पत्ता विरार (पश्चिम), तालुका वसई, जिल्हा पालघर, ह्यांचे मालकीच्या आहेत. सदर मिळकत पुर्नविकसीत करावयाची असुन त्या अनुषंगाने सदर मिळकतीबाबत वसई विरार शहर महानगरपालिका यांचेकडून बांधकाम परवानगी मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाही इसमाचा, व्यक्तीचा गहाण, दान, दावा, वारसा, वहीवाट, विश्वस्त बोजा, विक्री, कुळारग, अदलाबदल वा अन्य हक्क, हितसंबंध असेल तर तो त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत निम्नस्वाक्षरीकारांना त्यांच्या २०३, अली प्लाझा, वर्तक रोड, विरार (पश्चिम), तालुका वसई, जिल्हा पालघर, या पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह कळवावा. अन्यथा तसा हक्क हितसंबंध नाही, असे समजून सदर मिळकतीवर कोणाचीही हरकत नसल्याबाबतचा दाखला देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

दि. २५/१०/२०२४ वकील
(ॲड. कल्पना एस. म्हात्रे)

**जाहीर सुचना**

या नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, गाव मौजे विरार, तालुका वसई, जिल्हा पालघर येथील बिनशेती मिळकत सर्व्हे क्रमांक २९२. हिस्सा क्रमांक ब, क्षेत्र १०२३ चौ.मी., सर्व्हे क्रमांक ५३५, हिस्सा क्रमांक ४/अ, क्षेत्र ५०० चौ.मी., ही मिळकत माझे अशील श्री. मनहरलाल रणछोडजी देसाई रा. विरार (पश्चिम), तालुका वसई, जिल्हा पालघर हयांचे मालकीची आहे. सदर मिळकत विकसीत करावयाची असुन त्या अनुषंगाने सदर मिळकतीबाबत वसई विरार शहर महानगरपालिका यांचेकडून बांधकाम परवानगी मिळण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाही इसमाचा, व्यक्तीचा, गहाण, दान, दावा, वारसा, वहीवाट, विश्वस्त बोजा, विक्री, कुळारग, अदलाबदल वा अन्य हक्क, हितसंबंध असेल तर तो त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत निम्नस्वाक्षरीकारांना त्यांच्या २०३, अली प्लाझा, वर्तक रोड, विरार (पश्चिम), तालुका वसई, जिल्हा पालघर, या पत्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह कळवावा. अन्यथा तसा हक्क हितसंबंध नाही, असे समजून सदर मिळकतीवर कोणाचीही हरकत नसल्याबाबतचा दाखला देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

दि. २५/१०/२०२४ वकील
(ॲड. कल्पना एस. म्हात्रे)

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 125**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - १२५**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

# आयआयटी मुंबईचा विस्तार करणार, तज्ज्ञांनी घेतला मागील पाच वर्षांचा आढावा

**मुंबई :** भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबईमध्ये (आयआयटी, मुंबई) शिक्षणासाठी येणाऱ्या अधिकाधिक विद्यार्थ्यांना सामावून घेण्यासाठी बांधीव क्षेत्र (बिल्ट अप) ९ लाख चौरस मीटरवरून १६ लाख चौरस मीटरपर्यंत वाढविण्याची योजना आखण्यात आली आहे. तसेच संशोधन आणि विकासासाठी ५०० कोटी रुपयांची जागतिक दर्जाची उपकरणे खरेदी करण्यात आल्याचे आयआयटी मुंबईचे संचालक प्रा. शिरीष केदारे यांनी सांगितले. आयआयटी, मुंबईचा विकास व विस्तार करण्यासाठी ऑक्टोबर २०२३ ते जानेवारी २०२४ या कालावधीमध्ये दोन टप्प्यात संस्थेचे निरीक्षण करण्यात आले. पहिल्या टप्प्यात विविध शैक्षणिक विभागांचे बाह्य समितीद्वारे अवलोकन करण्यात आले, तर दुसऱ्या टप्प्यात संस्थात्मक पुनरावलोकन समितीच्या माध्यमातून मूल्यांकन करण्यात आले.



## थोडक्यात

### वरळीतून शिंदेंच्या शिवसेनेकडून सुशांत शेलार इच्छुक

**मुंबई:** विधानसभा निवडणुकीचा ज्वर शिगेला पोहोचलेला असला तरी महायुती आणि महाविकास आघाडीकडून अंतिम स्वरुपात जागावाटप झालेले नाही. अनेक पक्षांनी आपली पहिली यादी जाहीर केलीय. दरम्यान, शिवसेनेनं आपली 45 जणांची पहिली यादी मंगळवारी रात्री जाहीर केलीय. मात्र अद्यापपर्यंत वरळी विधानसभा मतदारसंघातून कुणालाही उमेदवारी दिली नाहीये. तर इथे शिवसेना (ठाकरे गटाकडून) आदित्य ठाकरे तर मनसेकडून संदीप देशपांडे यांना उमेदवारी देण्यात आलीय. मात्र महायुतीतून अद्याप कोणालाही उमेदवारी देण्यात आली नसल्यामुळं आदित्य ठाकरे या तुल्यबळ उमेदवाराच्या विरोधात नेमकी कोणाला उमेदवारी मिळणार? याबाबत राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलंय. मात्र शिवसेना चित्रपट सेनेचे सचिव आणि अभिनेता सुशांत शेलार यांनीही वरळीतून निवडणूक लढवण्यास आपण इच्छुक असल्याचं म्हटलंय.

### लाडक्या बहिणींना डिसेंबरचा हप्ता आचारसंहितेनंतर

**मुंबई:** दोन दिवसांपूर्वी जळगावच्या मुक्ताईनगरमध्ये महायुतीच्या मेळाव्यात बोलताना 'लाडकी बहिणी' योजने बाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माहिती दिली. तसेच त्यांनी लाडक्या बहीण योजनेवरून विरोधकांना देखील जोरदार टोला लगावला आहे. कोणही लाडकी बहीण योजना बंद पाडू शकणार नाही. सावत्र भावांनी या योजनेत खोडा घातला. त्यांना जोडा दाखवा असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की लाडकी बहीण योजनेचे पैसे वाटत राहणार, लाडकी बहीण योजनेचे पैसे वाढत राहणार , आचारसंहिता संपली की डिसेंबरचा हफ्ता बहिणींना मिळेल.

### आचारसंहितेमुळे आकाश कंदील व्यावसायिकांना फटका

**मुंबई:** दरवर्षी दिवाळीचे औचित्य साधून राजकीय मंडळी स्वत:चे छायाचित्र, पक्षाचे चिन्ह व नाव, विशिष्ट घोषणांचा समावेश असलेले भव्य आकाश कंदील शहर व उपनगरांतील मुख्य रस्ता, नाका आणि चौकाचौकांत उभारून वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतात. यंदाच्या वर्षी कोणत्या चौकात, कोणत्या पक्षाचा आकाश कंदील दिसणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र, ऐन दिवाळीतच विधानसभा निवडणुकीसाठीची आचारसंहिता जारी झाल्यामुळे शक्तिप्रदर्शन करण्याची राजकीय मंडळींची संधी हुकली. तसेच आचारसंहितेमुळे राजकीय पक्षांच्या नेते व पदाधिकाऱ्यांकडून आकाश कंदिलांची मागणी नसल्यामुळे आकाश कंदील विक्रेत्यांना आर्थिक फटकाही सहन करावा लागत आहे. माहीमच्या प्रसिद्ध 'कंदील गल्ली'त नक्षीदार व रंगीबेरंगी लहान – मोठ्या आकाश कंदिलांची निर्मिती आणि विक्री केली जाते. गणेशोत्सवानंतर आकाश कंदिलांची निर्मिती करण्याच्या कामाला सुरुवात होते. दिवाळीपूर्वी जवळपास दोन महिने आकाश कंदील तयार करण्याच्या कामात अनेक कुटुंबे गुंतलेली असतात. दरवर्षी 'कंदील गल्ली'त मुंबई शहर, उपनगर तसेच ठाण्यातील नागरिकांचीही घरगुती कंदील घेण्यासाठी गर्दी असते. तर राजकीय मंडळींकडूनही स्वत:चे छायाचित्र, पक्षाचे चिन्ह व नाव, विशिष्ट घोषणांचा समावेश असलेल्या भव्य आकाश कंदिलांची मोठ्या प्रमाणात मागणी असते.

## विधानसभा सार्वत्रिक निवडणूक -२०२४

# गेल्या 24 तासात 52 कोटी रुपयांची मालमत्ता जप्त



- इन्कमटॅक्स डिपार्टमेंन्ट : 30 कोटी 93 लाख 92 हजार 573
- रेव्हयून्यू इन्टेलिजन्स : 8 कोटी 30 लाख 84 हजार 878
- राज्य पोलीस डिपार्टमेंट : 8 कोटी 10 लाख 12 हजार 811
- नार्कोटिस्ट कंन्ट्रोल ब्युरो : 2 कोटी 50 लाख
- राज्य उत्पादन शुल्क विभाग : 1 कोटी 75 लाख 392
- कस्टम डिपार्टमेंट : 72 लाख 65 हजार 745

प्रतिनिधी
■ मुंबई

राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ साठी १५ ऑक्टोबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांद्वारे करण्यात आलेल्या कारवाईत बेकायदा पैसे, दारू, ड्रग्ज व मौल्यवान धातू इत्यादी बाबतीत १५ ते २४ ऑक्टोबर २०२४ पर्यंत एकूण ९० कोटी ७४ लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली असून त्यापैकी गेल्या २४ तासात ५२ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

निवडणूक आचारसंहितेच्या काळात सजगपणे कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्यातील १९ अंमलबजावणी यंत्रणांनी एका दिवसात ५२ कोटी रुपयांची मालमत्ता जप्त करण्याची कामगिरी बजावली आहे. विविध ठिकाणी पोलिस विभाग आणि इतर यंत्रणांनी उभारलेले तपासणी नाके योग्य पध्दतीने कार्यरत असल्यामुळे हे यश मिळाले आहे.

दिवसभरात झालेल्या कारवाईमध्ये नागपूर, मुंबई उपनगर, रत्नागिरी ह्या जिल्ह्यांमधल्या मोठ्या कारवायांचा समावेश आहे. ह्यातून निवडणूक यंत्रणा दक्ष असून मतदारांना प्रलोभन दाखवण्याचा प्रकार खपवून घेतला जाणार नाही, असा संदेश गेला आहे. प्रत्येक प्रकरणाच्या मागील धागेदोरे तपास काढून गुन्ह्याची साखळी मोडून काढण्याचे आदेश निवडणूक आयोगाने दिले आहेत. सर्व मतदारांना आचारसंहिता भंगाचा प्रकार आढळल्यास आयोगाच्या सी व्हिजील ॲपवर तक्रार करता येते. ह्या तक्रारींची माहिती सर्व अंमलबजावणी यंत्रणांना दिली जात असल्याने आवश्यक ठिकाणी जप्तीची कारवाई केली जात आहे.

१५ ते २४ ऑक्टोबर २०२४ पर्यंत राज्यभरात सी-व्हिजिल (C-Vigil app) ॲपवर एकूण १ हजार १४४ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी १ हजार १४२ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकाली काढण्यात आल्या आहेत. म्हणजे एकूण ९९ टक्के तक्रारी निकाली काढण्यात आल्या आहेत अशी माहिती, मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.

सजग नागरिकांना आचारसंहिता पालनासाठी सहकार्य करणारे सी-व्हिजिल (C-Vigil app) ॲप हे कोणत्याही ॲपस्टोअरमधून डाऊनलोड करता येते. या ॲपव्दारे नागरिकांना आचारसंहिता भंगाबाबत तक्रार करता येते. तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित पथकाव्दारे चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येते.

### प्राप्तीकर विभागाचा स्वतंत्र नियंत्रण कक्ष 24 तास कार्यरत

धनशक्तीचा वापर करुन मतदारांना प्रलोभन दाखवणाऱ्यांना लगाम घालण्यासाठी आयकर विभाग देखील पुढे सरसावला आहे. राज्यात सुरू असलेल्या विधानसभा निवडणुकांच्या काळात पैशांचा गैरवापर रोखण्याच्या उद्देशाने प्राप्तीकर विभागाने मुंबई इथे नियंत्रण कक्षाची स्थापना केली आहे. हा नियंत्रण कक्ष आठवड्याचे सातही दिवस चोवीस तास सुरु असेल. या नियंत्रण कक्षाकडे नागरिक १८००२२१५१० हा टोल फ्री क्रमांक ८९७६१७६२७६ आणि ८९७६१७६७७६ या व्हॉट्सअप क्रमांकावर किंवा mumbai.addldit.inv7@incometax.gov.in या ईमेलवर आपल्या तक्रारी नोंदवू शकतात. नागरिकांनी दिलेल्या माहितीच्या आधारावर प्राप्तीकर विभागाद्वारे जप्तीची कारवाई करण्यात येत आहे.

# समीर भुजबळांच्या अजित पवारांना झटका; राष्ट्रवादी मुंबई अध्यक्षपदाचा दिला राजीनामा

## नांदगावमधून अपक्ष निवडणूक लढवणार



प्रतिनिधी
■ मुंबई

राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांचे पुतणे समीर भुजबळ यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसला जोरदार झटका दिला आहे. त्यांनी राष्ट्रवादीच्या मुंबई अध्यक्षपदाचा राजीनामा देत नांदगाव - मनमाड विधानसभा मतदारसंघातून अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे. या ठिकाणी महायुतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे विद्यमान आमदार सुहास कांदे यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे समीर यांच्या भूमिकेमुळे महायुतीच्या पोटात गोळा उठला आहे.समीर भुजबळ यांनी आपला राजीनामा राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल व प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनाही पाठवला आहे.

गेल्या काही दिवसांपासून समीर भुजबळ हे नांदगाव - मनमाड विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार असल्याची चर्चा राज्याच्या राजकीय गोटात रंगली होती. पण छगन भुजबळ यांनी समीर यांच्या वाढदिवसाच्या दिवशी केलेल्या एका ट्विटमधून त्याचे स्पष्ट संकेत मिळाले होते. पण पत्रकारांनी गुरुवारी याविषयी भुजबळ यांना छेडले असता त्यांनी अशी कोणतीही माहिती आपल्याकडे नसल्याचे ठणकावून सांगितले होते. पण त्याचवेळी त्यांनी समीर स्वतःचा निर्णय घेण्यास सक्षम असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले होते. त्याचवेळी समीर हे नांदगाव विधानसभेतून शिवसेना उमेदवार सुहास कांदे यांच्याविरोधात अपक्ष उमेदवार म्हणून मैदानात उतरणार असल्याचे स्पष्ट झाले होते.

### नांदगावमधील दूषित वातावरण सुधारायचे आहे - समीर भुजबळ

*समीर भुजबळ यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांना पाठवलेल्या आपल्या राजीनामापत्रात म्हणाले की, आदरणीय दादा, साधारण वर्षभरापूर्वी तुम्ही सर्वांनी माझ्यावर विश्वास ठेवून मुंबई अध्यक्षपदाची जबाबदारी माझ्याकडे सुपूर्द केली होती. ही जबाबदारी पार पाडताना अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये आपण संघटन मजबुतीने उभे केले. यामध्ये जिल्हाध्यक्षापासून बूथपर्यंत संघटनेची बांधणी आपण केली.मात्र भुजबळ कुटुंबीयांचा ऋणानुबंद असलेल्या नांदगावमध्ये परिस्थिती अतिशय बिकट आहे. गेल्या 5 वर्षांत या मतदारसंघातील वातावरण अतिशय दूषित झालेले असून, येथील नागरिक भयभीत झाले आहेत. नांदगावमधील कार्यकर्ते पदाधिकारी व नागरिकांनी आपली भेट घेऊन याबाबतची कैफियत आपल्यासमोर मांडली. नांदगावमधील नागरिकांची वाढत असलेली मागणी व नांदगावमधील दहशतीचे वातावरण बदलण्यासाठी मी या मतदारसंघातून विधानसभा निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे.तरी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा मुंबई अध्यक्षपदाचा मी राजीनामा देत आहे. तो आपण स्वीकारावा अशी नम्र विनंती. आपण आतापर्यंत केलेल्या सहकार्याबद्दल मी आपला ऋणी आहे.*

# प्राप्तीकर विभागाचा स्वतंत्र नियंत्रण कक्ष 24 तास कार्यरत - अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी

**मुंबई:** विधानसभा निवडणुकांच्या काळात धनशक्तीचा गैरवापर रोखण्याच्या उद्देशाने प्राप्तीकर विभागाने मुंबई इथे नियंत्रण कक्षाची स्थापना केली आहे. हा नियंत्रण कक्ष आठवड्याचे सातही दिवस चोवीस तास सुरु असेल अशी माहिती अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांनी दिली. या नियंत्रण कक्षाकडे नागरिक १८००२२१५१० हा टोल फ्री क्रमांक ८९७६१७६२७६ आणि ८९७६१७६७७६ या व्हॉट्सअप क्रमांकावर किंवा mumbai.addldit.inv7@incometax.gov.in या ईमेलवर आपल्या तक्रारी नोंदवू शकतात. नागरिकांनी दिलेल्या माहितीच्या आधारावर प्राप्तीकर विभागाद्वारे जप्तीची कारवाई करण्यात येणार आहे.

# बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट व ईव्हीएम मशिन्सची प्रथम सरमिसळ पूर्ण

■ मुंबई

विधानसभा निवडणुकीसाठी पुरेशा संख्येने ईव्हीएम मशिन उपलब्ध आहे. सर्व बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट व ईव्हीएम मशिन्सची प्रथम सरमिसळ 18 ते 21 ऑक्टोबर, 2024 या कालावधीत सर्व जिल्ह्यांकडून पूर्ण करण्यात आली असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आली आहे. महाराष्ट्र विधानसभा 2024 च्या निवडणुकीच्या अनुषंगाने 1 लाख 186 इतक्या मतदान केंद्रासाठी 2 लाख 21 हजार 600 बॅलेट युनिट (221 % ) 1 लाख 21 हजार 886 कंट्रोल युनिट (122%) व 1 लाख 32 हजार 94 व्हीव्हीपॅट (132%) इतक्या प्रथमस्तरीय तपासणी मशिन्स उपलब्ध असून एकूण प्रथमस्तरीय करण्यात आलेल्या ईव्हीएम मशिन्स पैकी प्रशिक्षण व जनजागृतीच्या कार्यक्रमाकरिता त्यापैकी 5 हजार 166 बॅलेट युनिट, 5 हजार 166 कंट्रोल युनिट व 5 हजार 165 व्हीव्हीपॅट इतक्या ईव्हीएम मशिन्सचा वापर करण्यात आला आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 दरम्यान मुंबई उच्च न्यायालय, व विविध खंडपीठासमोर 14 लोकसभा मतदारसंघात 16 निवडणूक याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत. सदरहू 16 याचिकांमुळे राज्यातील विविध जिल्ह्यात 56 हजार 200 बीयु व 28 हजार 408 सीयु मशीन्स न्यायालयीन प्रकरणामुळे सीलबंद होत्या. सद्यस्थितीत प्रस्तुत 16 निवडणूक याचिकांपैकी 7 निवडणूक याचिकांमधील ईव्हीएम-व्हीव्हीपॅट मशीन्स उच्च न्यायालयाने मुक्त केल्या आहेत. त्यामध्ये 23 हजार 731 बीयु व 12 हजार 307 सीयु मशीन्सचा समावेश आहे.

# बाबा, मला रोज तुमची आठवण येते !

## झिशान सिद्दीकींची वडील बाबा सिद्दीकींबद्दल भावूक पोस्ट



प्रतिनिधी
■ मुंबई

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या हत्येनंतर त्यांचे पुत्र झिशान सिद्दीकी यांनी आज अतिशय भावनिक ट्विट केलं आहे. झिशान सिद्दीकी यांनी आपल्या वडिलांसोबतचा एक फोटो शेअर केला आहे. हा फोटो पाच वर्षांपूर्वीचा आहे. २४ ऑक्टोबर २०२४ चा हा फोटो आहे. या दिवशी विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर झाला होता. त्यावेळी झिशान सिद्दीकी यांचा वांद्यातून विजय झाला होता. त्यावेळी बाबा सिद्दीकी यांना प्रचंड आनंद झाला होता. बाबा सिद्दीकी यांनी त्यावेळी झिशान यांना गळाभेट घेतली होती. त्या भेटीचा क्षण कुणीतरी कॅमेऱ्यात कैद केला होता. तोच फोटो शेअर झिशानने भावनिक पोस्ट केली आहे. "तुमच्या मेहनतीमुळे आणि माझ्यावरील विश्वासामुळे जे क्षण शक्य झाले ते या फोटोत कैद झाले होते, बाबा, मला रोज तुमची आठवण येते", असं झिशान आपल्या एक्सवरील पोस्टमध्ये म्हणाले आहेत.

बाबा सिद्दीकी यांच्यावर १२ ऑक्टोबरला झिशान सिद्दीकी यांच्या कार्यालयाच्या बाहेर गोळीबार करण्यात आल्या. रिक्षातून आलेल्या तीन हल्लेखोरांनी बाबा सिद्दीकी यांच्यावर गोळीबार केला. या गोळीबारात बाबा सिद्दीकी यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्राचं राजकारण हादरलं आहे.

विशेष म्हणजे विधानसभा निवडणूक तोंडावर असताना अशी घटना घडल्याने अनेकांकडून आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. बाबा सिद्दीकी यांच्या हत्येमागे कोण आहे? याचा तपास पोलिसांकडून केला जातोय. पोलिसांनी या प्रकरणी अनेकांना अटक देखील केली आहे. या प्रकरणात बिश्नोई गँगचं नाव समोर आलं आहे. तसेच एसआरए प्रकल्पाशी संबंधित प्रकरणामुळे सिद्दीकी यांची हत्या करण्यात आली का? या अँगलने सुद्धा पोलीस तपास करत आहेत. पण या दुर्घटनेमुळे सिद्दीकी कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. बाबा सिद्दीकी यांचे चिरंजीव झिशान यांनी आज 'एक्स'वर ट्विट करत आपल्या वडिलांसोबतची आठवण शेअर केली आहे.

### स्वार्थी लोकांची गर्दी वाढवण्यात अर्थ नाही -झीशान

*नुकतंच झिशानने एक राजकीय पोस्ट केली होती. यावेळी त्यांनी महायुतीकडून उमेदवारांची यादी शेअर करण्यात येत आहे. त्याबाबत त्यांनी सूचक ट्विट केले. असं ऐकलं आहे की, वांद्रे पूर्व मतदारसंघात आमच्या जुन्या मित्रांनी उमेदवाराची घोषणा केली आहे. साथ निभवायची हे त्यांच्या नैतिकतेतच नव्हतं. नातं त्यांच्यासोबतच ठेवा जो आदर आणि सन्मान देईल. स्वार्थी लोकांची गर्दी वाढवण्यात काहीच उपयोग नाही. आता निर्णय जनता घेणार, असे ट्विट झिशान सिद्दीकी यांनी केले होते*

# आचारसंहितेचे उल्लंघन होतेय ? मग, सी व्हिजिल ॲपवर तक्रार करा

## १०० मिनिटाच्या आत मिळतो प्रतिसाद

प्रतिनिधी
■ मुंबई

भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची तारीख जाहीर केली आहे. 20 नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे.त्यासाठी 15 ऑक्टोबर 2024 पासून राज्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास सर्वसामान्य मतदार, नागरिकांना आता थेट निवडणूक आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. त्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सी व्हिजिल सिटीझन ॲप विकसित केले आहे. या ॲपवर दाखल होणाऱ्या तक्रारींवर 100 मिनिटांत पहिली कार्यवाही केली जात आहे. असे आयोगाने कळविले आहे.

आचारसंहिता कालावधीत काय करावे आणि काय करु नये याविषयी निवडणूक उमेदवार, प्रशासन आणि राजकीय पक्षांना माहिती दिली जाते. पण, काहीवेळा आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होते. त्याची तक्रार करणे आता पूर्वीपेक्षा अधिक सुलभ झाले आहे. आचारसंहिता उल्लंघनाची तक्रार किंवा माहिती निवडणूक आयोग आणि जिल्हा प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सी व्हिजिल ॲप विकसित केले आहे. या मोबाईल ॲपद्वारे मतदारांना आता थेट आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. या सी व्हिजिल ॲपवर तक्रार प्राप्त होताच तातडीने त्यावर कारवाई केली जाते. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवले जाते.

सी व्हिजिल ॲप अँड्रॉइड आणि आयओएस डिव्हाइसवर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे. उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी, वापरकर्त्यांनी फक्त ॲप उघडणे, उल्लंघनाचा प्रकार निवडणे आणि घटनेचे तपशिल, स्थान, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हीडिओ प्रदान करणे आवश्यक आहे. ॲप वापरकर्त्यांना त्यांच्या तक्रारींच्या प्रगतीचा मागोवा घेता येणार आहे.

सी व्हिजिल ॲप हा वापरकर्त्यांना आदर्श आचारसंहितेच्या उल्लंघनाची तक्रार करण्याची अनुमती देतो. नागरिकांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देतो. उल्लंघनाचे स्थान ट्रॅक करण्यासाठी जीपीएस वापरतो. वापरकर्त्यांना केवळ थेट घटना चित्रित करण्याची अनुमती देतो. तक्रारीच्या प्रगतीचा मागोवा घेतो.

### वापर कसा करायचा

*एन्ड्रॉईड मोबाईलमधील गुगल प्ले स्टोर आणि आयफोनमधील ॲप स्टोर या ॲपमध्ये जावून सी व्हिजिल (cVIGIL) सर्च करावे.त्यानंतर ॲप डाऊनलोड करा. त्यानंतर ॲप उघडून मोबाईल क्रमांक, पत्ता, मतदारसंघ समाविष्ट करुन खाते तयार करा. तुम्हाला ज्या उल्लंघनाची तक्रार करायची आहे ते निवडा आणि स्थळ, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हीडिओसह घटनेचे तपशील टाका. त्यानंतर तक्रार सबमिट करा.*

### अचूक कृती व देखरेख

*या ॲप्लिकेशनचा वापर करून, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात न जाताही काही मिनिटांतच नागरिक राजकीय गैरव्यवहाराच्या घटनांची तक्रार नोंदवू शकतात. हा सी व्हिजिल ॲप जिल्हा नियंत्रण कक्ष, निवडणूक निर्णय अधिकारी आणि भरारी पथकाशी जागरूक नागरिकांना जोडतो. ज्यामुळे एक जलद आणि अचूक कृती, देखरेख आणि अहवाल प्रणाली तयार होते.*

### लाईव्ह फोटो, व्हिडिओ

*या ॲपच्या अचूकतेसाठी ॲपमधून फक्त लाईव्ह लोकेशनवर आधारित फोटो, व्हीडिओ घेतले जातात. जेणेकरुन भरारी पथक, स्थिर संनिरीक्षण चमुंना वेळेत कार्यवाही करणे शक्य होईल.*

### तातडीने होते कारवाई

*या ॲपवर तक्रार दाखल होताच स्थानिक निवडणूक यंत्रणा तुमच्या तक्रारीची चौकशी करेल आणि योग्य ती कारवाई करेल.*

### डाटा सुरक्षा

*या ॲपवरील डाटा हा सुरक्षित ठेवला जातो. हा डाटा इतर कोणत्याही थर्ड पार्टीला दिला जात नाही. याशिवाय हा डाटा एन्ड टू एन्ड इन्क्रिप्टेड ठेवला जातो.*

# जपानने महाराष्ट्राला मशरुम, आंबा उत्पादनात मदत करावी - राज्यपाल

## जपानच्या वाणिज्यदूतांनी घेतली राज्यपालांची भेट



प्रतिनिधी
■ मुंबई

जपान व भारत हे एकमेकांचे स्वाभाविक भागीदार असून उभय देशांचे संबंध आज सर्वोच्च पातळीवर आहेत. जपानचे महाराष्ट्राशी संबंध विशेष चांगले असून जपान महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठासोबत कौशल्य प्रशिक्षणासाठी सहकार्य करीत आहे, असे प्रतिपादन जपानचे मुंबईतील वाणिज्यदूत यागी कोजी यांनी येथे केले.यागी कोजी यांनी गुरुवारी (दि. 24) राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची राजभवन मुंबई येथे सदिच्छा भेट घेतली, त्यावेळी ते बोलत होते.

जपानने राज्यातील अटल सेतू, बुलेट ट्रेन, मेट्रो लाईन यांसह अनेक पायाभूत सुविधा प्रकल्पांना अर्थसहाय्य केले आहे असे सांगून सध्या जपान 500 किमी प्रतितास चालणाऱ्या लिनिअर मोटार कार रेल्वेवर काम करीत असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्रातील १४ उच्च शिक्षण संस्थांमध्ये जपानी भाषा शिकवली जात असल्याचे यागी कोजी यांनी यावेळी राज्यपालांना सांगितले.

आपण कॉयर बोर्डचे अध्यक्ष असताना टोकियो व ओसाका येथे भेट दिली होती. जपानमधील मशरूम आकाराने मोठे, चवदार व उत्कृष्ट दर्जाचे असून जपानने राज्यातील शेतकऱ्यांना तसेच महिला बचत गटांना मशरुम उत्पादनात मदत करावी अशी अपेक्षा राज्यपाल राधाकृष्णन यांनी यावेळी व्यक्त केली. या संदर्भात उभय देशातील कृषी विद्यापीठांमध्ये सहकार्य स्थापित व्हावे असे त्यांनी सांगितले. जपानमधील प्रसिद्ध 'मियाझाकी' आंबा अतिशय चवदार असून त्याला जगभरात सर्वाधिक बाजारमूल्य मिळते असे सांगून या आंब्याची लागवड महाराष्ट्रात करण्यासाठी देखील जपानने राज्याला मदत करावी जेणेकरून त्याचा लाभ राज्यातील शेतकरी बांधवांना होईल असे राज्यपालांनी सांगितले.

पायाभूत सुविधांप्रमाणे जपानने कृषी क्षेत्रात राज्याला मदत केल्यास त्याचा राज्यातील व विशेषतः आदिवासी भागातील शेतकऱ्यांना लाभ होईल असे राज्यपालांनी सांगितले. विद्यापीठांचा कुलपती या नात्याने आपण राज्यातील विद्यापीठांमधून जपानी भाषेच्या अध्यापनाला चालना देऊ व त्या दृष्टीने जपान फाउंडेशनच्या पदाधिकाऱ्यांची व राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरुंची बैठक राजभवन येथे आयोजित करू असे राज्यपालांनी यागी कोजी यांना सांगितले.जर्मनीप्रमाणे जपानने देखील महाराष्ट्रासोबत कुशल मनुष्यबळ निर्मितीसाठी योजना राबवावी तसेच सौर ऊर्जा निर्मितीसाठी मदत करावी अशी अपेक्षा राज्यपालांनी यावेळी व्यक्त केली.

# सणवार आले, खाद्यतेल महागले; दरात 20 टक्क्यांची वाढ

प्रतिनिधी
■ मुंबई


तेलबियांचे उत्पादन मागील वर्षीपेक्षा जवळपास तीन टक्के अधिक राहण्याची शक्यता असूनही ऐन सणासुदीत खाद्यतेलाच्या दरात वाढ झाली आहे. मागील दहा दिवसांत हे दर २० टक्क्यांनी महागले आहेत. त्यात मलेशियाकडून येणाऱ्या पामतेलाचे दर सहा महिन्यांच्या उच्चांकावर पोहोचले असताना दिवाळीच्या वाढत्या मागणीत खाद्यतेल आणखी महागण्याची शक्यता आहे.

देशात यंदा विविधी खाद्यतेलबियांची सरासरू ५.२० लाख हेक्टरवर अधिक पेरणी झाली आहे. हा आकडा मागीलवर्षीच्या पेरणीच्या पाच टक्के अधिक आहे. सर्वाधिक मागणीच्या शेंगदाणा व सोयाबीनच्या पेरणीत अनुक्रमे ४.१० व ३.०५ लाख हेक्टरची वाढ आहे. त्यातून तयार होणाऱ्या खाद्यतेलामुळे यंदा देशात मागीलवर्षीपेक्षा तीन टक्के अधिक खाद्यतेल उपलब्ध आहे. पण तसे असतानाही दरांत वाढ झाली आहे.

बाजारातील सूत्रांनुसार, आधी नवरात्रात खाद्यतेलाच्या मागणीत वाढ होतीच. मात्र यंदा दिवाळी महिन्याच्या सुरुवातीला असल्याने ग्राहकांनी आत्ताच त्यासाठीची खरेदी सुरू केली आहे.

पश्चिम रेल्वे
शुद्धिपत्रक
निविदा क्र: ईएल-टीआरडी डब्ल्यू-११८-२४-२५-१०, दि. २४.१०.२०२५ उघडण्याचा दिनांक २५.१०.२०२४ (१५:३०) च्या ऐवजी ०५.११.२०२४ (१५:३०) असा बदलण्यात आला आहे. निविदेच्या अन्य सर्व अटी पूर्वीप्रमाणेच राहतील. 0672
आम्हाला लाईक करा facebook.com/WesternRly

प्रत्येक आव्हान ही शिकण्याची आणि वाढण्याची संधी असते.



- रतन टाटा
प्रसिध्द उद्योगपती

वृत्तमानस
मुंबई, शुक्रवार, २५ ऑक्टोबर २०२४

# रोज मरे, त्याला रेल म्हणे!

गेल्या काही काळात महानगरी मुंबईमधून अनेकांनी सुरुवातीला ठाणे आणि त्यानंतर ठाणेपल्याड कल्याण, अंबरनाथ, बदलापूर, ते थेट कर्जत कसाऱ्यापर्यंत स्थलांतर केले. असे असले तरी पोटापाण्यासाठी मुंबई आणि ठाण्याचाच पर्याय असल्याने लोकलमधील गर्दी ही वाढतच चालली आहे. तिन्ही प्रहर ही गर्दी कायम असते. दरवाजामध्ये लोंबकळत केवळ पुरुषच नव्हे तर महिलासुद्धा आपला जीव धोक्यात घालून प्रवास करीत असल्याचे चित्र नेहमीच दिसते. यामधून अपघाती मृत्यू वाढत चालले आहेत. एका अहवालानुसार मुंबई उपनगरीय रेल्वेमुळे होणारे मृत्युदर हे किमान ३८ टक्के इतके आहे. म्हणजेच प्रत्येक दिवशी सात प्रवासी आपला जीव प्रवासात गमावतात. हा जगातील सर्वाधिक मोठा मृत्युदर असल्याने त्याला वेळीच आळा घातला पाहिजे. उपनगरीय रेल्वेतून मागील वर्षभरात तीन हजार प्रवाशांनी आपला जीव गमावला असून, सरासरी दररोज सात जणांचा मृत्यू झाला आहे. यात मध्य रेल्वेवरील अपघातांमध्ये दीड हजार जणांचा तर पश्चिम रेल्वेवर हजार जणांचा मृत्यू झाला असल्याची चिंता वाढविणारी माहिती उपलब्ध आहे. या आकडेवारीवरून न्यायालयाने नाराजी व्यक्त करीत रेल्वेसेवेवर ताशेरे ओढले होते. रेल्वे नियमावलीनुसार, रेल्वेरूळ ओलांडताना आणि रेल्वेतून पडून मृत्यू झालेल्यांना कोणतीही नुकसानभरपाई मिळत नाही. निव्वळ रेल्वे अपघात किंवा रेल्वेमध्ये आग लागलेल्यांनाच नुकसानभरपाई देण्याची तरतूद आहे. रेल्वेरुळासभोवतालच्या संरक्षक भिंती तोडून शॉर्टकट मारण्याचे उद्योगही अपघाताला कारणीभूत ठरत आहेत. रेल्वे स्टेशनवरदेखील एका प्लॅटफॉर्मवरून दुसऱ्या प्लॅटफॉर्मवर जाताना पुलाचा वापर न करता जवळचा मार्ग म्हणून रेल्वेरुळावरून उड्या मारत जातात. त्यातून अपघाताच्या घटना घडत असतात. लोकलमधून आजघडीला मध्य, हार्बर आणि पश्चिम रेल्वेवर मिळून सध्या ८० लाखांपेक्षा जास्त प्रवासी दररोज प्रवास करतात. तर दिवसभरात तिन्ही मार्गांवर तीन हजारपेक्षा जास्त लोकल धावतात. मात्र लोकलची संख्या कितीही वाढली तरी मुंबईतील वाढलेली प्रवाशांची संख्या या लोकलमध्ये सामावू शकत नाही, हे वास्तव नकारून चालणार नाही. साधारणपणे सकाळी आठ ते ११ आणि संध्याकाळी पाच ते आठ हे मुंबईतील लोकलमधील सर्वात गर्दीचे तास असतात. या पिक अवरदरम्यान प्रत्येक तीन ते चार मिनिटाला एक अशा १८ लोकल एका तासात धावतात. असे असूनही त्या अपुऱ्या पडतात. ठाणेपल्याड कल्याण, डोंबिवली, बदलापूर, दिवा परिसराचे नागरीकरण झाले आहे. मुंबईला जाणारा नोकरदारवर्ग वाढला आहे. प्रत्येकाची कामावर वेळेत जाण्याची धडपड असते. लोकल वेळेवर नसतात. मिळेल ती लोकल पकडून जाण्यासाठी असलेली धडपड प्रवाशांच्या मृत्यूस कारणीभूत ठरत आहे. यापूर्वीच्या कसारा, कर्जत, खोपोली भागातून येणाऱ्या अतिजलद लोकल प्रत्येक स्थानकावर वेळेत यायच्या. कल्याण, डोंबिवलीतील प्रवासी ५५ ते ६० मिनिटांमध्ये सीएसएमटीला पोहोचायचा. गेल्या काही काळापासून या लोकल १५ ते २० मिनिटे कायम उशिराने धावत असल्याने गर्दीचा पसारा वाढतच जातो. प्रवाशाच्या पाठीवरील पिशवी प्रवासी दरवाजात लोंबकळत प्रवास करीत असेल तर ही पिशवी डोंबिवली, कोपर ते मुंब्रादरम्यानच्या रेल्वेमार्गातील एखाद्या खांबाला जोराने धडकून प्रवासी त्या पिशवीसह रेल्वेमार्गात पडतो, हे अनेकदा स्पष्ट झाले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे यापूर्वी डोंबिवली, कल्याण लोकल या कल्याण, डोंबिवलीतील प्रवाशांसाठी हक्काच्या लोकल होत्या. आता कल्याण लोकलमध्ये कोपर, डोंबिवलीचे प्रवासी कल्याण दिशेने उलट प्रवास करून पुन्हा मुंबईचा प्रवास सुरू करतात. डोंबिवली लोकलमध्ये मुंब्रा, दिवा येथील उलट दिशेने प्रवास करतात. कार्यालयात वेळेवर जाण्यासाठीची ओढ कर्मचाऱ्यांना जीवघेणा धोका देते. टोकियोपाठोपाठ जागतिक स्तरावर दुसरी सर्वात वर्दळीची रेल्वे यंत्रणा म्हणून मुंबई उपनगरी रेल्वेची ओळख आहे. प्रवासी संख्या मोठी असल्याची सबब पुढे करून रेल्वे प्रशासन आपली जबाबदारी झटकू शकत नाही. रेल्वेकडून पायाभूत सोयीसुविधा आजही जवळपास पूर्वी एवढ्याच उपलब्ध आहेत. पूर्वी रेल्वे प्रशासनाकडून ९ डब्यांची लोकल होती. आता १२ डबे आणि १५ डब्यांची लोकल चालविली जात आहे. मात्र लोकल प्रवाशांच्या वाढत्या संख्येवर उपाय म्हणून १५ डब्यांच्या लोकल संख्येत वाढ करणे गरजेचे आहे. आज १२ डब्यांच्या लोकलची क्षमता १,१७२ प्रवाशांची आहे. मात्र उभे राहून किमान अडीच हजार प्रवासी जातात. पिक अवर्समध्ये या लोकल मधून जवळजवळ ५ हजार प्रवासी प्रवास करतात. त्यामुळे चालत्या लोकलमधून पडणाऱ्यांची संख्या वाढत जात आहे. इतकेच नव्हे तर लोकलच्या गेटवर गर्दी असल्यामुळे बसतेवेळी कित्येक प्रवाशांचे लोकलमधून पडून अपघात होत आहेत. त्यामुळे रेल्वे मंत्रालयाने याबद्दल दखल घेत लोकल गाड्यांची संख्या वाढविण्याची गरज आहे, जेणेकरून अशा दुर्घटना घटतील. उपनगरीय रेल्वे हे झटपट प्रवासाचे साधन आहे. त्यामुळे रस्ते प्रवास करण्यापेक्षा जास्तीत जास्त प्रवासी लोकलची निवड करतात. परंतु, या प्रवाशांच्या संख्येत गेल्या काही वर्षांत मोठी वाढ झाली आहे. त्यातच बाहेरून येणारे लोंढे तसेच स्वस्तात मिळणारी घरे यामुळे उपनगरांकडे राहण्याचा ओढा वाढत आहे. त्यामुळे उपनगरांकडून शहराकडे लोकलने प्रवास करण्याचे प्रमाणही वाढले आहे. परिणामी सीएसएमटीकडे प्रवास करताना आणि जाताना लोकल गाड्यांना अधिक गर्दी होते व हा प्रवास गर्दीच्या वेळी फारच जीवघेणा ठरतो. त्यामुळे सरकारने बाहेरू येणाऱ्या लोंढ्यांवर नियंत्रण मिळविणे गरजेचे आहे. सातत्याने जनजागृती करूनही रेल्वे प्रवाशांच्या अपघाताचा आकडा वाढत जात आहे. याकडे पाहून मुंबईची लाइफलाइन अशी ओळख असणारी लोकल रेल्वे प्रवाशांसाठी आता मृत्यूचा सापळा ठरत असल्याचे दिसत आहे. मुंबई लोकल ही मुंबईची जीवनवाहिनी आहे. मुंबईसह मुंबईकरांच्या सर्वांगीण विकासात मुंबई लोकलचा असामान्य असा वाटा आहे. जसजशी लोकल संख्याची वाढली तसतशी मुंबईची गर्दीदेखील वाढत गेली. त्यामुळेच लोकलमधून पडून होणाऱ्या मृत्यूची संख्यादेखील वाढली. अखेर आता हीच जीवनवहिनी मुंबईकरांसाठी मृत्यूवाहिनी बनू लागली की काय, असा प्रश्न निर्माण होतो. लाखो प्रवाशांच्या दररोजच्या प्रवासामुळे रेल्वेच्या तिजोरीमध्ये दररोज कोट्यवधी रुपयांची भर पडत असते. पण उत्पन्नाच्या तुलनेत सुविधा मिळत नसल्याची ओरड नेहमीच प्रवाशांकडून करण्यात येत असते. इतके उत्पन्न मिळूनही प्रवाशांना सुविधा देण्यास रेल्वे प्रशासन चालढकल करीत असल्याचा आरोपही प्रवाशांकडून सातत्याने केला जात आहे. अनेक रेल्वे स्टेशनांवर आजही बकालपणा कायम आहे. फेरीवाल्यांचा विळखा तसेच उपनगरांतील अनेक रेल्वे स्टेशनांचा बाहेरील परिसर भिक्षेकऱ्यांचे निवासस्थानच झालेला आहे. अपघातावर तोडगा काढण्याची जबाबदारी ही रेल्वे प्रशासनासोबत प्रवाशांचीदेखील आहे. रेल्वेतील अपघातांचे दायित्व हे रेल्वे प्रशासनाबरोबर प्रवाशांचेही आहे. अपघातांना आळा बसलाच पाहिजे. अपघाताची समस्या नियंत्रणातच नाही तर या समस्येचे निर्मूलन झाले पाहिजे. अर्थात अपघात आटोक्यात यावे, प्रवासी सुविधा अपघातरहित हा न्यायालयाचाही हेतू अरु या अपघाताची मधल्या काळात न्यायालयानेही दखल घ्यावी याचाच अर्थ समस्येचे गांभीर्य वाढले आहे. रेल्वे प्रशासनाच्या उपाययोजनांना प्रवाशांचाही सकारात्मक प्रतिसाद कृतीतून मिळाल्यास ही समस्या नक्कीच नियंत्रणात येईल.

# फटाक्यांमुळे दिवाळी गोड की कडू ?



हिंदू धर्मातील सण, उत्सव केवळ मौज मजेसाठी असतात असे नव्हे, तर प्रत्येक सणामागील शास्त्र आणि ते कसे साजरे करावेत याबाबतचे सविस्तर ज्ञान आपल्या ऋषी मुनींनी हजारो वर्षांपूर्वी मांडून ठेवले आहे. ते तसे साजरे केल्यास मिळणारा लाभ अधिक असतो. गेल्या काही वर्षांत आपल्या सण उत्सवांत अनेक अपप्रवृत्तीचा शिरकाव झाला आहे. या अपप्रवृत्ती एवढ्या हामी झालेल्या आहेत की सण उत्सवांच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जाऊ लागला आहे. वर्णभेद विसरून एकत्र येण्याची शिकवण देणाऱ्या गोपाळकाला सणामध्ये आता दहीहंडीच्या मनोऱ्यांचीच स्पर्धा रंगू लागली आहे. त्यावर लाखो रुपयांची बक्षिसे लावली जाऊ लागली आहेत. उत्सवाच्या निमित्ताने एकत्र येऊन राष्ट्र आणि धर्म याबाबत संघटितपणे कार्य करण्याच्या उद्देशाने सुरु केलेल्या गणेशोत्सवामागील मूळ उद्देश बाजूला सरून प्रतिवर्षी गल्लीबोळांत नवनवीन मंडळे स्थापन होऊ लागली आहेत. गणेश मूर्ती, सजावट, मिरवणूक यांसारख्या कारणांनी मंडळांमध्ये तंटे होऊ लागले आहेत. नुकत्याच सरलेल्या नवरात्री उत्सवाचेही पुरते बाजारीकरण झाले आहे. येऊ घातलेला दिपावली सणही यातून सुटलेला नाही. दीपावली म्हटले की दिव्यांची रोषणाई, कंदिलांची सजावट, फराळाचा सुगंध यासारख्या बाबी डोळ्यासमोर यायला हव्यात; मात्र सध्या दिवाळी म्हटले तर सर्वात आधी आठवते ती सर्वत्र फटाक्यांची आतषबाजी, त्यामुळे होणारा धुरच धूर, वाढणारे वायू प्रदूषण आणि कानठळ्या बसवणारे आवाज.

मुलांना कोणी सांगितले कि 'यंदा दिवाळीला कोणीही फटाके नाही फोडायचे' तर मुले त्याचे ऐकतील का ? अजिबात नाही. 'फटाके दिवाळीला नाही फोडायचे तर केव्हा फोडायचे ?' असा लागलीच त्यांचा प्रतिप्रश्नही असेल. अर्थात ही चूक लहानग्यांची अजिबात नाही. गेल्या काही वर्षांपासून दिवाळीनिमित्त एवढ्या प्रचंड प्रमाणात फटाके फोडले जातात कि फटाके हीच दिवाळीची खरी ओळख आहे की काय असा प्रश्न पडतो. दीपावली शब्दाचाच अर्थ दीप +आवली अर्थात दिव्यांची रांग असा आहे. दीपावली हा दिव्यांचा उत्सव आहे. तिमिराकडून तेजाकडे म्हणजेच अंधाराकडून प्रकाशाकडे नेण्याची शिकवण दीप आपल्याला देतो. कोणी कितीही गरीब असला तरी त्याच्या घरी दिवाळी दरवर्षी साजरी होतेच. दिवाळीच्या निमित्ताने घर आणि सभोवतालचा परिसर स्वच्छ केला जातो, घराला रंगरंगोटी केली जाते, या सहा दिवसांत दाराबाहेर आकाशकंदील लावला जातो. दाराजवळ सुबक रांगोळी काढली जाते. दारात आणि तुळशीजवळ तेलाच्या पणत्या लावल्या जातात. घरोघरी लाडू, चकली कारंज्यांचा फराळ बनवला जातो. आप्तेष्टांना, मित्र मंडळींना दिवाळीच्या आणि पाडव्याच्या शुभेच्छा दिल्या जातात. हीच दिवाळी साजरी करण्याची परंपरागत पद्धत. या सर्वांत फटाके वाजवणे कुठेच बसत नाही, मग ही प्रथा दिवाळीत शिरली तरी कुठून ? एरव्ही लग्न समारंभ, उदघाटनाच्या कार्यक्रमांत, मिरवणुकांमध्ये आणि राजकीय सभांच्या वेळी आतषबाजी म्हणून फटाके फोडणे एकवेळ मान्य; मात्र दिवाळीसारख्या धार्मिक सणाचा आणि फटाके फोडण्याचा काय संबंध ?

सुमारे २२०० वर्षांपूर्वी चीनच्या लुईयाँग प्रांतात फटाके फोडल्याचा संदर्भ आढळतो. आगपेटीच्या काडीप्रमाणे काठ्यांच्या टोकाला ज्वालाग्राही पदार्थाची गाठ बनवली जाई आणि ही गाठ आगीत धरल्यावर तिचा आवाज येत असे. ही आतषबाजी पुढे लग्नसमारंभांना होऊ लागली. १९२३ मध्ये भारतातील कोलकात्यामध्ये नाडर बंधूंनी आगपेटीच्या कारखान्यांमध्ये सर्वप्रथम फटाक्यांची निर्मिती केली. १९४० मध्ये तामिळनाडूतील शिवकाशी येथे फटाक्यांचा पहिला कारखाना सुरु झाला. तेव्हापासून आजतागायत शिवकाशी मध्ये अविरतपणे फटाक्यांची निर्मिती सुरु आहे. आजमितीला शिवकाशी येथे फटाक्यांचे मोठमोठे कारखाने तयार झाले आहेत. येथून संपूर्ण भारतात फटाके पुरवले जातात. शिवकाशी येथे तयार केल्या जाणाऱ्या फटाक्यांना भारतभरातून विशेष मागणी आहे. दिवाळी सणाला सहस्रो वर्षांचा इतिहास आहे आणि फटाके बनवणारा पहिला कारखाना भारतात ८४ वर्षांपूर्वी तयार झाला आहे याचाच अर्थ दिवाळीत फटाके फोडण्याच्या प्रथेला कोणताही शास्त्रीय आधार नाही. पूर्वीचे राजे महाराजे आनंदाच्या क्षणी आतषबाजी करत असल्याचे दाखले इतिहासात सापडतात. ही आतषबाजी आता फटाक्यांच्या रूपाने दिवाळीत सर्वत्र होऊ लागली आहे. स्वातंत्र्य दिनाच्या किंवा सांस्कृतिक आणि सार्वजनिक कार्यक्रमांत आतषबाजी करण्याची प्रथा पाश्चात्य देशांमध्ये सुद्धा आहे, मात्र ही आतषबाजी केवळ शोभेच्या फटाक्यांपुरती सीमित असते. आपल्याकडे मात्र शोभेपेक्षा अधिकाधिक आवाजाच्या फटाक्यांचीच स्पर्धा प्रतिवर्षी पाहायला मिळते.

दिवाळीच्या तोंडावर दरवर्षी प्रशासनाकडून फटाके फोडण्यासंदर्भातील नियमावली जाहीर केली जाते ज्यामध्ये आवाजाच्या मर्यादेपासून फटाके फोडण्यासाठीची निषध्द क्षेत्रेही नमूद केलेली असतात. मात्र शहरासारख्या ठिकाणी या नियमावलीला सर्रासपणे हरताळ फासला जातो. सर्वत्रच फटाक्यांची आतषबाजी सुरु असल्याने कारवाई तरी कोणावर करणार, असा यक्ष प्रश्न प्रशासनासमोर असतो. २०२१ साली भारतभरात सुमारे १५०० कोटी रुपयांचे फटाके केवळ दिवाळीच्या दिवसांत फोडले गेले. यंदा हा आकडा याहून अधिक असेल. आजमितीला लोकसंख्येत अव्वल असलेल्या भारतातील बराचसा भाग दारिद्र्यरेषेखाली जीवन कंठत आहे, ज्यांना दोन वेळेचे पोटभर अन्न मिळणेही दुरापास्त आहे. देशातील कित्येक गावे कुपोषित आहेत. दिवसागणिक वाढत जाणाऱ्या महागाईने सर्वसामान्यांचे जगणे मुश्किल केले आहे. अशा परिस्थितीत केवळ क्षणिक मौजेखातर फटाक्यांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची राख-रांगोळी करणे कितपत योग्य आहे ?

शिवकाशी हे ठिकाण अव्वल दर्जाचे फटाके बनविण्यासाठी देशभर प्रसिद्ध आहे; मात्र याच शिवकाशीमध्ये दरवर्षी फटाक्यांच्या कारखान्यांना आगी लागून जीवित आणि वित्तहानी होण्याच्या अनेक घटना घडत असतात. या कारखान्यांतील दारूच्या प्रभावामुळे कारखान्यांत काम करणाऱ्या कितीतरी लहान मुलांना, कामगारांना असाध्य आजार जडतात, कायमचे अपंगत्व येते. याशिवाय दिवाळीच्या दरम्यान फटाक्यांच्या गोदामांना, दुकानांना आगी लागल्याच्या अनेक बातम्या दरवर्षी वाचनात येतात. फटाके फोडताना कित्येक जण भाजतात, जळके फटाके इतरत्र उडाल्यामुळे आगी लागण्याच्या घटना घडतात ज्यामध्ये दरवर्षी शेकडो जण मृत्युमुखी पडतात तर हजारो जण जखमी होतात. याकाळात अग्निशमन दलावर प्रचंड ताण असतो. याशिवाय केवळ फटाक्यांच्या कारणावरून अनेक ठिकाणी भांडणे, मारामाऱ्या होतात त्या वेगळ्या.

वर उल्लेख केल्याप्रमाणे आपल्याकडे दरवर्षी अधिकाधिक आवाजाच्या फटाक्यांची स्पर्धा लागलेली पाहायला मिळते. कानठळ्या बसवणाऱ्या आवाजाच्या फटाक्यांमुळे इमारतींना तडे जातात, खिडक्यांच्या काचा फुटतात तसेच सिलींगचे प्लास्टरिंग सैल होण्याचाही धोका असतो. विजेचे काचेचे बल्बही फटाक्यांच्या आवाजामुळे फुटतात.

दिवाळीत फोडल्या जाणाऱ्या फटाक्यांमुळे लोकांच्या आरोग्यावर सर्वाधिक परिणाम होतो. कानठळ्या बसवणाऱ्या फटाक्यांमुळे कायमचा बहिरेपणा येऊ शकतो. अतिआवाजामुळे कान बधीर होतात. श्रवणयंत्रणातील पेशी एकदा मृत झाल्या की, त्या पुन्हा नव्याने निर्माण होत नाहीत. गर्भवती महिला, दीर्घ आजाराने ग्रस्त असलेले रुग्ण आणि नवजात बालके यांच्यावर फटाक्यांच्या आवाजाचा भयंकर परिणाम होतो. मायग्रेन, रक्तदाब आणि हृदयविकाराचा त्रास असणाऱ्या रुग्णांच्या त्रासामध्ये फटाक्यांच्या अतिआवाजामुळे अधिक वाढ होण्याची शक्यता असते. फटाके फोडल्यावर निर्माण होणाऱ्या विषारी धुरामुळे प्रचंड वायुप्रदूषण होते ज्याचा त्रास लहान मुलांसह अस्थमा आणि फुफुसाचा आजार असलेल्यांना अधिक होत असतो.

अमेरिकेसारख्या विकसित देशात मानवी आरोग्यावर परिणाम करणाऱ्या फटाक्यांवर बंदी घालण्यात आली आहे. न्यूझीलंड, इटली, फ्रान्स, बेल्जियम या देशांत केवळ प्रौढ व्यक्तींनाच फटाके विकत घेण्यास आणि फोडण्यास अनुमती आहे. आपल्याकडे मात्र असे कोणतेही धोरण प्रशासनाने आखलेले नाही. उलट इथे घरातील प्रौढच फटाके आणून ती लहानांना फोडण्यासाठी उपलब्ध करून देतात.

दिवाळीतील लक्ष्मीपूजनाच्या दिवशी घराघरात श्री महालक्ष्मी आणि श्री कुबेराचे पूजन केले जाते. लक्ष्मी ही धनाची देवता आहे तर कुबेर हा धनसंचयाचा देव आहे. एकीकडे योग्य मार्गाने धन प्राप्ती होण्यासाठी देवी लक्ष्मीची आणि आलेले धन टिकून राहावे यासाठी कुबेराची पूजा करायची आणि दुसरीकडे लक्ष्मीच्या कृपेने मिळालेले धन फटाक्यांच्या माध्यमातून विनाकारण व्यय करायचे हा विरोधाभास नव्हे काय ?

प्राचीन युगात राक्षस नागरिकांना त्रास देऊन असुरी आनंद मिळवायचे. आताच्या काळी फटाके फोडून इतरांना त्रास देऊन साजरा केल्या जाणाऱ्या आनंदाला असुरी आनंदच म्हणावे लागेल. आपल्याला एखादा आजार झाला कि त्यावर वेळीच उपचार घेऊन आपण त्याचे निराकरण करतो. फटाक्यांच्या रूपाने आपल्या हिंदू संस्कृतीतील दीपावली सारख्या व्यापक आणि सात्विक सणाला एकप्रकारचा आजारच जडला आहे. तो दूर करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. दीपावलीच्या तेजाला लागलेली फटाक्यांची काजळी दूर करून तिला पुनर्रतेज प्राप्त करून द्यायचे असेल, तर सुरुवात आपल्या घरापासूनच करावी लागेल.

**- जगन घाणेकर,**
घाटकोपर, मुंबई

## पत्र मानस

### पक्षांतराच्या कोलांटउड्या

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पटलावर सध्या उलथापालथ सुरु आहे. महायुती आणि महाविकास आघाडी यांचे जागावाटप पूर्ण होत आले असून काही पक्षांनी उमेदवारही जाहीर केले आहेत. उमेदवार यादी जाहीर झाल्यानंतर मात्र अपेक्षेप्रमाणे उमेदवारी न मिळालेल्या इच्छुकांच्या पक्षांतराच्या कोलांटउड्या सुरु झाल्या आहेत. या पक्षांतराला कुठलाही विधिनिवेश नाही. गद्दार ठरलेले पक्षांतर करुन निष्ठावंत होत आहेत. मावळयांचे कावळे आणि पुन्हा कावळयांचे मावळे होत आहेत. पक्षनिष्ठा धाब्यावर ठेवून उमेदवारी देईल त्या पक्षाचा झेंडा हाती घेतला जात आहे. एकाच घरात नगरसेवक, आमदार आणि खासदार रहावेत यासाठी एकाच घरातील सख्खे नातेवाईक वेगवेगळ्या पक्षात प्रवेश करत आहेत. कुठल्याही पक्षाचा झेंडा हाती घेतला तरी आपलाच घोडा पुढे दामटवण्याचा यांचा प्रयत्न असतो. सामान्य मतदाराला मात्र गृहितच धरले जाते हेच खरे.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी**

### मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांचा निवडणुकीत दबावात्मक डाव

मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीत आपले ठराविक उमेदवार उभे करण्याचे ठरविले आहेत. जरांगे पाटील यांनी दबाव तंत्राचा वापर करण्याचा प्रयत्न करणार आहेत.२८८ पैकी काही उमेदवारीचा फॉर्म भरतील व आपल्या मागण्या मान्य करणाऱ्यांना मराठ्यांची मते देण्याचे आवाहन जरांगे पाटील करतील. पक्षीय उमेदवाराला मागण्या पूर्ण करण्याबाबत बॉन्डवर लिहून द्यावे लागणार आहे. लाख मराठाचे आंदोलनकर्ते नागपूर दक्षिण पश्चिम विभागाचे उमेदवार देवेंद्र फडणवीस यांच्या मतदार संघात तळ ठोकुन बंड करण्याचे काम आंदोलक करतील. असा अंदाज आहे. मविआ व महायुतीच्या उमेदवारांशी सामना करण्याचे धोरणही असणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी नवी मुंबईत मनोज जरांगे पाटील यांच्याशी संगनमत झाले. स्वागत हारतुरे झाले हे जनतेने पाहिले आहे. मुंबईकडे येणारा मोर्चा नवी मुंबईतच थांबवला गेला. चळवळीचे धोरणच पाडण्याचा राजकीय डाव जनतेने पाहिला आहे. उपमुख्यमंत्रीं देवेंद्र फडणवीस, मंत्री छगन भुजबळ यांनी आपली खेळी केली.असा मराठ्यांचा कयास आहे. आता सावध पवित्रा घ्यावा लागेल याचे भान मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांना तमाम आंदोलनकर्त्यांसह ठेवावे लागणार आहे. मनोज जरांगे पाटील महाराष्ट्र विधानसभा निवडणुक मराठा कार्यकर्त्यांची कमांड सांभाळणारआहेत. लाख मराठ्यांचे भवितव्य त्यांच्या हाती असणार आहे. या दबावात्मक कृतीत सावध पवित्रा घ्यावा लागणार आहे हे निश्चित !

**- अनंत दत्ताराम दाभोळकर. अंधेरी**

### पक्षांतराच्या कोलांटउड्या

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पटलावर सध्या उलथापालथ सुरु आहे. महायुती आणि महाविकास आघाडी यांचे जागावाटप पूर्ण होत आले असून काही पक्षांनी उमेदवारही जाहीर केले आहेत. उमेदवार यादी जाहीर झाल्यानंतर मात्र अपेक्षेप्रमाणे उमेदवारी न मिळालेल्या इच्छुकांच्या पक्षांतराच्या कोलांटउड्या सुरु झाल्या आहेत. या पक्षांतराला कुठलाही विधिनिषेध नाही. गद्दार ठरलेले पक्षांतर करुन निष्ठावंत होत आहेत. मावळयांचे कावळे आणि पुन्हा कावळयांचे मावळे होत आहेत. पक्षनिष्ठा धाब्यावर ठेवून उमेदवारी देईल त्या पक्षाचा झेंडा हाती घेतला जात आहे. एकाच घरात नगरसेवक, आमदार आणि खासदार रहावेत यासाठी एकाच घरातील सख्खे नातेवाईक वेगवेगळ्या पक्षात प्रवेश करत आहेत. कुठल्याही पक्षाचा झेंडा हाती घेतला तरी आपलाच घोडा पुढे दामटवण्याचा यांचा प्रयत्न असतो. सामान्य मतदाराला मात्र गृहितच धरले जाते हेच खरे.

**- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

### पुनर्वसना मध्ये मालमत्ता कर माफ करावा

"गृहनिर्माण मासुद्याची करणार होळी". हे शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत असे आश्वासन दिले आहे. तरी मुंबई मध्ये राहणाऱ्या, सर्व सामान्य रहिवाशांना पुनर्वसन मध्ये ५०० चौ फुटाच्या वर घरे मिळत आहेत. या मध्ये वर्षानुवर्ष कष्ट, हाल अपेक्षा सोशीत असलेला मराठी माणूस आहे. कित्येक वर्ष संक्रमण शिबिरात राहत आहेत. पुनर्वसनामुळे नागरीकांचे राहणीमान सुधारणार आहे. हे खरे असले तरी, ५०० फुटा पेक्षा जास्त आकाराच्या जागेवर, आकारण्यात येणारा मालमत्ता कर, हा खूप जास्त असल्यामुळे (अभ्युदय नगर वसाहतीतील घरे ६३५ चौ फूट घरांचे नुकतेच भूमिपूजन करण्यात आले आहे. काही ठिकाणी ८०० चौ फूट पर्यंत घरे मिळणार आहेत) या नव्या घरच्या मालमत्ता करामुळे, मराठी माणूस नाईलाजाने विरार, कल्याण पर्यंत फेकला जाणार आहे. अशा प्रकारे लाखो भूमिपुत्रांना स्थलांतर कारवे लागणार असल्यामुळे, राज्य सरकारने मालमत्ता करावर फेर विचार करणे आवश्यक आहे. तत्पूर्वी ५०० ते ७०० चौ फूट पर्यंतच्या घरांना ६०% सवलत मिळावी. सदर मागणीचा ठराव, मुंबई महापालिका सभागृहात ६ जुलै २०१७ ला संमत केला आहे. त्याप्रमाणे राज्य सरकारात अधिनियम १८८८ च्या कलम १४० व १४० अ मधील सुधारणा कारणे अपेक्षित होते. परंतु राज्य सरकारने १० मार्च २०१९ रोजी राज्यपालान तर्फे अध्यादेश काढून मालमत्ता करात ५०० चौ फूट पर्यंत, सर्वसाधारण कर माफ करण्यात आला आहे. तरी आता भूमिपुत्रा संबंधी, मुंबईचे मराठीपण, मराठी संस्कृति, मराठी अस्मिता टिकण्याकरिता सरकारने त्वरीत निर्णय घ्यावा.

**-विजय कदम, लोअर परळ.**

### राष्ट्रकुल स्पर्धा सर्व क्रीडा प्रकारांसह व्हावी

१२ वर्षांनंतर पुन्हा राष्ट्रकुल स्पर्धा आयोजनाचा मान ग्लासगोला मिळाला आहे. राष्ट्रकुल स्पर्धा घेण्यासाठी खर्चाची कपात करावी लागणार आहे आणि त्यासाठी स्पर्धा नेहमीच्या १९ क्रीडा प्रकारांऐवजी १० प्रकारांत घेण्यात येणार असल्याचे ठरत आहे.दोन वर्षांनंतर होणाऱ्या राष्ट्रकुल स्पर्धा २०२६ ग्लासगो संयोजन समितीने हॉकी, बॅडमिंटन, कुस्ती, क्रिकेट,बॅडमिंटन,टेबल टेनिस,स्क्वॉश आणि नेमबाजी या महत्त्वाच्या खेळांना वगळण्याचा निर्णय घेतल्याने खेळाडू निराश झाले आहेत.राष्ट्रकुल स्पर्धा बाबत असे प्रथमच घडत आहे. यजमान ग्लासगो ला राष्ट्रकुल स्पर्धा घेण्यास जमत नसेल तर इतर देशांनी त्यांना आर्थिक मदत करावी.नाहीतर स्पर्धा दुस-या ठिकाणी सर्व क्रीडा प्रकारांसाठी घेण्यात यावी.खेळाडूंच्या पदकांचे,मेहनतीचे व त्यांच्या स्वप्नांचे काय? ज्या खेळांच्या स्पर्धा होणार नाहीत त्या खेळांचे व खेळाडूंचे नुकसान होणार आहे. खेळांडूची गुण,कौशल्य दाखवण्याची संधी गमवली जाणार आहे.ऑलिम्पिक एवढेच महत्व असलेली राष्ट्रकुल स्पर्धेतून काही प्रकारांचे खेळ वगळण्यात आल्याने पदकांची संख्या कमी होणार असल्याने भारताचे मोठे नुकसान होणार आहे.स्पर्धेच्या आयोजनाचा खर्च झेपणार नसल्यास त्या देशाने स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी स्विकारु नये.

**- विवेक तवटे , कळवा ,ठाणे**

## जनहितासाठी प्रतिनिधीत्व करणार - चित्रलेखा पाटील

**अलिबाग :** शेतकरी कामगार पक्षाच्या अधिकृत उमेदवार चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांनी गुरुवारी (दि.24) दुपारी अलिबागमध्ये उमेदवारी अर्ज दाखल केला. तसेच अलिबाग अर्बन बँकेच्या अध्यक्षा सुप्रिया पाटील यांनीदेखील उमेदवारी अर्ज उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण यांच्याकडे दिला. चित्रलेखा पाटील यांचे अलिबागमध्ये शेतकरी भवन येथे आगमन होताच 'चिऊताई तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है, लाल बावटे की जय, लढेंगे जितेंगे' अशा घोषणा दिल्या. चित्रलेखा पाटील यांचे यावेळी शेकाप भवनमध्ये औक्षण करण्यात आले. शेकाप सरचिटणीस माजी आ. जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा आनंदोत्सव साजरा करण्यात आला.



## म ह त्त्वा चे

### दारूच्या पैशासाठी जावयाने जाळले सासरचे घर

**भिवंडी :** भिवंडीतील नदीनाका परिसरात जावयाने दारूच्या पैशासाठी आपल्याच सासरच्या घराला आग लावल्याची धक्कादायक घटना घडली आहे. त्याच्या पत्नीने त्याला दारू पिण्यासाठी हजार रुपये दिले नाहीत. त्यामुळे ही घटना घडल्याची माहिती पोलिसांनी दिली. या घटनेनंतर पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शब्बीर अन्सारी हे भिवंडीतील नदीनाका परिसरात असलेल्या म्हाडा कॉलनीत आपल्या कुटुंबासह राहतात. त्यांच्या घरी कोणीही नसताना त्यांचा जावई अहमद दिलावर याने पेट्रोल शिंपडून त्यांच्या घराला आग लावली. काही वेळातच या आगीत घरातील कपाट, भांडी, पलंग, अन्नधान्य, कपडे, अगदी सिमेंटचे छतही जळून खाक झाले. काही क्षणातच घरातील सर्व मौल्यवान वस्तू व महत्त्वाची कागदपत्रे जळून खाक झाली. या घटनेने शब्बीर अन्सारी यांना धक्काच बसला. त्यांच्या तक्रारीवरून निजामपूर पोलिसांनी अहमद दिलावर खान नावाच्या जावईविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली असून पुढील तपास उपनिरीक्षक जीवन म्हस्के करीत आहेत.

### उल्हास नदीवरील नवा पूल उखडला

**बदलापूर :** बदलापूरकरांच्या मागणीनुसार उल्हास नदीवरील जुन्या पुलाला समांतर नव्या पुलाचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने करण्यात आले; मात्र या पुलाच्या उद्घाटनाला महिना उलटत नाही तोच हा नवा पूल उखडला आहे, तर अर्ध्या रस्त्यावरील खडी बाहेर आल्याने दुरवस्था झाली आहे. पूल बांधण्यासाठी १७ कोटी रुपये खर्च केले होते. या पैशांचा चुराडा झाल्याने बदलापूरकर राग व्यक्त करत आहेत.उल्हास नदीवरील असलेल्या जुन्या पुलावर वाहतूक कोंडी होत असे, तसेच लोकसंख्या आणि त्यातुलनेत वाहनांची संख्यादेखील वाढल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून जुन्या पुलाला समांतर पूल २०१९ मध्ये बांधण्यास सुरुवात झाली. १७ कोटी खर्च करून बांधलेला हा पूल गेल्या काही महिन्यांपासून उद्घाटनाच्या प्रतीक्षेत होता. या पुलासाठी पुढाकार घेणारे स्थानिक आमदार किसन कथोरे यांच्या हस्ते या पुलाचे लोकार्पण १३ ऑक्टोबरला करण्यात आले.

### मर्सिडीजने उडवल्याने तरुणाचा मृत्यू

**भिवंडी :** ठाण्यातील नौपाडा परिसरात एका भरधाव आलीशान मर्सिडीज कारने धडक दिल्याने मोटारसायकलीवरुन जाणारा एका तरुण गंभीर जखमी झाल्याची घटना सोमवारी रात्री उशीरा घडली होती. या तरुणाला रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच मृत घोषीत करण्यात आले होते. या प्रकरणातील कार चालक घटनास्थळावर वैद्यकीय मदतीसाठी न थांबता पसार झाला होता. या प्रकरणात अखेर हा कार चालक नौपाडा पोलिसांच्या स्वाधीन झाला आहे. ठाण्यातील नौपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नितीन जंक्शन येथे नाशिक हायवेने मुंबईच्या दिशेने येणाऱ्या एका भरधाव कार चालकाने दुचाकी चालकाला जोरदार धडक दिल्याने तो गंभीर जखमी झाल्याची घटना काल रात्री 1.50 वाजण्याच्या सुमारास घडली होती. या घटनेत गंभीर जखमी झालेल्या दर्शन हेगडे यांचा मृत्यू झाला होता.

# शरद पवारांच्या उपस्थितीत जितेंद्र आव्हाडांनी भरला उमेदवारी अर्ज

प्रतिनिधी
■ ठाणे

मुंब्रा वासियांना खेळण्यासाठी एका मैदानाची आवश्यकता आहे. त्यासाठी मुंबई क्रिकेट असोसिएशनने राज्य सरकारला विनंती केली आहे. त्यामुळे जितेंद्र आव्हाड यांच्या नेतृत्वाखाली हे मैदान लवकरच मुंब्रावासियांसाठी होणार असल्याचे मत राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केले. ते गुरुवारी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे उमेदवार जितेंद्र आव्हाड यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी मुंब्रा येथे आले होते. त्यावेळी बोलताना त्यांनी हे मत व्यक्त केले.

गुरुपुष्यामृत योग या दिवसाचे औचित्य साधत कळवा मुंब्रा विधानसभेसाठी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे उमेदवार जितेंद्र आव्हाड यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी मुंब्रा दत्तवाडी येथून उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी रॅली काढण्यात आली. त्यापूर्वी रेतीबंदर येथे असलेल्या फुले,शाहू, आंबेडकर यांच्या तैलाचीत्रावर पुष्पहार व पुष्पवृष्टी शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आली.यावेळी पारंपारिक ब्रासबंड, पुणेरी ढोल आणि तुतारीच्या गजराने संपूर्ण परिसर दणाणू गेला होता. त्यानंतर मुंब्रा दत्तवाडी येथील रॅलीला सुरुवात झाली. यावेळी मोठ्या संख्येने आव्हाड समर्थक उपस्थित होते. यावेळी प्रसार माध्यमांशी पवार यांनी संवाद साधला, यावेळी गेल्या अनेक वर्ष या मतदारसंघांमध्ये अमुलाग्रह बदल घडवण्याचं काम जितेंद्र आव्हाड यांनी केलेला आहे.



तसेच या मतदार संघातील जानेत्शी त्यांची नाळ घट्ट जोडली गेली असल्याचे याठिकाणी जमलेल्या जनसमुदायावरून दिसून येत आहे. तसेच मुंब्रा वासियांसाठी एक खेळाच्या मैदानाची अवश्यकत आहे, हि बाब लक्षात घेवून त्यासाठी एमसीए कडे पाठपुरवा करण्यात आला आहे. त्यांची परवानगी हि अंतिम टप्प्यात असून लवकरच खेळाचे मैदान मिळणार असल्याचे देखील शरद पवार यांनी यावेळी स्पष्ट केले..राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे उमेदवार जितेंद्र आव्हाड यांनी गुरुवारी शक्ती प्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी रॅली काढली होती. यावेळी कळवा भागातून त्यांच्या समर्थकांसह कार्यकर्त्यांना घेवून जाण्यासाठी बसेसची व्यवस्था करण्यात आली होती. मात्र, मुंब्रा दत्तवाडी आणि मुंब्रा रेल्वे स्टेशन परिसरातील उड्डाण पुलावर या बसेस कार्यकर्त्यांना उतरविण्यासाठी थांबल्याने लांबच लांब बसेसच्या रांगा लागल्या होत्या..त्याचा फटका शरद पवार यांच्या ताफ्याला देखील बसला.

# शिवसेनेतील नाराज गटाची सुलभा गायकवाड यांच्या मिरवणुकीकडे पाठ



प्रतिनिधी
■ कल्याण

कल्याण पूर्वेतील महायुतीच्या उमेदवार सुलभा गणपत गायकवाड यांचा उमेदवारी अर्ज गुरूवारी महायुतीच्या ज्येष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत शक्तिप्रदर्शन करत पालिकेच्या ड प्रभाग कार्यालयातील निवडणूक अधिकाऱ्यांकडे दाखल करण्यात आला. यावेळी शिवसेनेतील नाराज गटाने महायुतीच्या या मिरवणुकीकडे पाठ फिरविल्याचे चित्र होते. गोळीबार प्रकरणामुळे भाजपचे कल्याण पूर्वेतील आमदार गणपत गायकवाड तुरूंगात आहेत. त्यामुळे यावेळी भाजपने त्यांच्या पत्नीला उमेदवारी दिली आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उमेदवारी अर्ज भरण्यासाठी येणार असल्याचे वातावरण भाजपने बुधवारी निर्माण केले होते. पण व्यस्ततेमुळे तेही उमेदवारी अर्ज भरण्यासाठी येऊ शकले नाहीत. भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, माजी मंत्री जगन्नाथ पाटील, माजी मंत्री कपील पाटील, आमदार कुमार आयलानी, रिपब्लिकन पक्षाचे अण्णा रोकडे, भाजपचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र सूर्यवंशी, उपाध्यक्ष अभिमन्यू गायकवाड, कल्याण पूर्व मंडळ अध्यक्ष संजय मोरे, शिवसेनेच्या माजी नगरसेविका माधुरी काळे सहभागी झाले होते.

तिसगाव नाका येथील आमदार गणपत गायकवाड यांच्या तिसाई हाऊस येथून मिरवणुकीला सुरूवात करण्यात आली. मिरवणुकीत चित्ररथ, ढोल-ताशा, कर्णकर्कश वाद्ये यांचा समावेश होता. महायुती आणि सुलभा गायकवाड यांच्या विजयाच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. सजविलेल्या रथामधून उमेदवार सुलभा गायकवाड, मंत्री रवींद्र चव्हाण, माजी मंत्री जगन्नाथ पाटील, सुलभा गायकवाड यांचे कुटुंबीय उपस्थितांना अभिवादन करत होते.

शिवसेनेतील स्थानिक पदाधिकारी, माजी नगरसेवक यांच्यासह शिवसेनेच्या बड्या नेत्यांनी या मिरवणुकीकडे पाठ फिरवली होती. उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कल्याण पूर्वेत आणून महायुतीमधील नाराजांना सूचक इशारा देण्याचा प्रयत्न केला जाणार होता. पण, या नाराजांवर भाजपच्या ज्येष्ठ नेत्यांची पूर्ण नजर राहणार असल्याची चर्चा आहे. मिरवणुकीच्यावेळी कोणताही अनुचित प्रकार होऊ नये म्हणून पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. अनेक वर्ष कल्याण पूर्वेतील निवडणूक शिवसेना-भाजप युतीमधून लढवत आहेत. आमदार गणपत गायकवाड यांचा दांडगा जनसंपर्क येथे आहे. अनेक विकास कामे या भागात त्यांनी केली आहेत.

# आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळील अनधिकृत बांधकामावर सिडकोची कारवाई

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळील 'शहर आणि औद्योगिक विकास महामंडळा'च्या (सिडको) जमिनीवर बेकायदेशीररित्या उभारलेला दर्गा आणि अन्य अनधिकृत बांधकामांमुळे विमानतळाला, तसेच राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे. हे सर्व अनधिकृत बांधकाम तात्काळ हटवण्यात यावे, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने आज पुन्हा एकदा सिडको प्रशासनाकडे केली. त्यावर अनधिकृत बांधकामावर नियमानुसार कारवाई केली जाईल, असे आश्वासन सिडकोच्या वतीने देण्यात आले.

समितीने 'सिडको'चे मुख्य दक्षता अधिकारी तथा पोलीस उपायुक्त सुरेश मेंगडे यांची भेट घेऊन निवेदन देऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी शिष्टमंडळामध्ये हिंदु जनजागृती समितीचे मुंबई जिल्हा समन्वयक बळवंत पाठक, समितीचे महेश लाड आणि विजय भोर उपस्थित होते. २०१२ मध्ये चार दगडांना पांढरे आणि हिरवे रंग देण्यात आले होते. आज वर्ष २०२४ मध्ये ही एक एकर मालमत्ता झाली आहे. झाडाखाली चार पांढऱ्या रंगाच्या दगडांनी कंपाऊंड, कारंजे, घुमट, पाण्याच्या टाक्या, आऊटहाऊस, गेस्ट हाऊस आणि पार्किंग असलेला मोठा दर्गा बनला आहे. हे बेकायदेशीर बांधकाम नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लागून असल्याने राष्ट्रीय सुरक्षेलाही धोका निर्माण झाला आहे. यासंदर्भात अनेक संघटनांनी पोलीस आणि सिडकोला पत्र लिहून बेकायदेशीर बांधकामाच्या विरोधात तातडीने कारवाईची मागणी केली होती. वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या माहितीनुसार सिडकोने बेकायदेशीर बांधकाम हटविण्यासाठी आधीच नोटीस बजावली होती; पण तरीही कोणत्याही अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष कारवाई केलेली नाही.

# पर्यावरणपूरक दिवाळी उत्सव (ग्रीन फेस्टिव्हल) साजरा करण्याचे नवी मुंबई पालिकेचे आवाहन

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील फटाके विक्री करणारे सर्व व्यावसायिक व फटाक्यांचा वापर करणारे नागरिक यांना आवाहन करण्यात येते की, भारत सरकार अधिसूचना क्रमांक G.S.R. 682 (E) Dt. 05/10/1999 अन्वये 125 dB (AI)पेक्षा जास्त आवाज निर्माण करणा-या फटाक्यांचे उत्पादन,विक्री किंवा वापर बेकायदेशीर आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार बेरियम सॉल्ट, लिथीयम, अर्सेनिक, लीड, मर्क्युरी यासारखे घटक असणारे फटाके वापरण्यास बंदी आहे. या घटकांमुळे विषारी वायू तयार होतात, हे वायू प्राणी व वनस्पती या दोघांना घातक आहेत. तसेच इतर वेळी सरासरी 91 इतक्या असणा-या हवा गुणवत्ता निर्देशांकामध्ये (AQI) दिवाळी सणादरम्यान फटाक्यांमधून निघणा-या विषारी घटकांपासून उद्भवणा-या वायू प्रदूषणामुळे सरासरी 212 इतकी वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे.वाढत्या वायूप्रदूषणामुळे नागरिकांना श्वसनासंबंधीच्या समस्यांना सामोरे जावे लागते.



जनहित याचिका क्र. 152/2015 मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाका विक्रेत्यांनी विस्फोटक व अधिनियम 1884 आणि त्या अंतर्गत केलेले विस्फोटक नियम 2008 मधील प्रतिबंध व नियम यांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तरी फटाके विक्रेत्यांनी बंदी असलेले फटाके विक्री करावयाची नाही, तसेच परवानगी असलेल्या फटाक्यांची महानगरपालिकेने निश्चित केलेल्या ठिकाणी परवानगी घेऊनच विक्री करावयाची आहे.

राष्ट्रीय हरीत लवाद मुख्य खंडपीठ, नवी दिल्ली यांचे दि.3/11/2023 रोजीचे सुनावणी आदेश तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे स्वतःहून दाखल करुन घेतलेली जनहितार्थ याचिका क्र.3/2023 च्या आदेश कलम 7 (ज) नुसार नागरिकांनी केवळ संध्याकाळी 7 ते रात्री 10 या कालावधीतच फटाके वाजवायचे आहेत. सदर आदेशातील कलम 7 (क) नुसार सर्व शैक्षणिक संस्था यांनी याची काटेकोरपणे अंमलबजावणी होणेबाबत आवश्यक उपाययोजना कराव्यात व फटाक्यांमुळे होणाऱ्या पर्यावरणाच्या हानीबाबत विद्यार्थ्यांना प्रबोधन करावयाचे आहे.

# थकबाकीदारांकडून विद्युत सहायक महिलेला धक्काबुक्की

प्रतिनिधी
■ पनवेल

वीजबिलाचा भरणा टाळणाऱ्या ग्राहकांचे वीज मीटर काढून घेणाऱ्या महिला विद्युत सहायकास धक्काबुक्की व दमदाटी करण्याची संतापजनक घटना बुधवारी (२३ ऑक्टोबर) सायंकाळी घडली. महावितरणच्या पनवेल शहर विभागांतर्गत पारगाव परिसरात ही घटना घडली असून याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध पाच कलमान्वये गुन्हा दाखल झाला आहे.



शरद कृष्णा भोईर, अमृत भोईर (राहणार शिव मॅजेस्टिक बिल्डींग, पारगाव, करंजाडे), एक अनोळखी अशी या प्रकरणी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. शिव मॅजेस्टिक बिल्डींगमधील जवळपास ९ ग्राहकांनी वीजबिल भरले नव्हते. त्यामुळे त्यांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला. वीजपुरवठा खंडित करुनही संबंधित ग्राहकांनी वीजबिल भरले नाही. त्यामुळे वरिष्ठांच्या आदेशानुसार विद्युत सहायक धनश्री भारती संबंधित ग्राहकांचे मीटर काढून कार्यालयाकडे निघाल्या असतांना आरोपींनी त्यांना धक्काबुक्की व दमदाटी करत सरकारी कामात अडथळा आणला. विद्युत सहायक भारती यांच्या फिर्यादीवरून पनवेल शहर पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली आहे. कर्तव्यावरील वीज कर्मचाऱ्यांच्या कामात अडथळा आणणे हा फौजदारी स्वरूपाचा गुन्हा असून वीज ग्राहकांनी कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामात सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

# निवडणुकीच्या तोंडावर पाणीपुरवठ्यात वाढ

प्रतिनिधी
■ भाईंदर

विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरू झाली आहे. येत्या काही दिवसांतच प्रचारालाही धुमधडाक्यात सुरुवात होणार आहे. या प्रचारादरम्यान मिरा-भाईंदर शहरातील पाणीटंचाईचा मुद्दा कळीचा ठरणार आहे. अशातच गेल्या काही दिवसांपासून शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या स्टेम प्राधिकरणाकडून दररोजच्या पुरवठ्यात अचानक वाढ झाली आहे..मिरा-भाईंदरला स्टेम प्राधिकरणाकडून ८९ दशलक्ष लिटर, तर एमआयडीसीकडून १२५ दशलक्ष लिटर पाणी कोटा मंजूर आहे, परंतु दोन्ही स्रोतांकडून मंजूर कोट्यानुसार पाणी दिले जात नाही. स्टेमकडून ७५ दशलक्ष लिटर पाणीच दिले जाते. यावरून मिरा-भाईंदर महापालिका आणि स्टेम प्राधिकरण यांच्यात कायम संघर्ष होत असतो. अडीच वर्षांपूर्वी शहरात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली असताना तत्कालीन महापौर ज्योत्स्ना हसनाळे यांनी स्टेमच्या अधिकाऱ्यांना महापालिकेत पाचारण करून चांगलेच खडसावले होते.

मिरा-भाईंदरच्या प्रवेशद्वारावर स्वतंत्र मीटर बसवून त्यावरील नोंदीनुसार पाण्याचे पैसे अदा करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचप्रमाणे मिरा-भाईंदरला मंजूर कोट्यानुसारच पाणी देण्याचे आदेश महापौरांनी दिले होते..त्यानुसार चेणे येथे स्वतंत्र मीटर बसविण्यात आले, मात्र प्राधिकरणाकडून पाण्यात काही वाढ झाली नाही. मात्र गेल्या काही दिवसांपासून मिरा-भाईंदरच्या पाण्यात अचानक वाढ झाली आहे. दररोज ७५ दशलक्ष लिटर मिळणाऱ्या पाण्याऐवजी आता ८० ते ८१ दशलक्ष लिटर पाणी येऊ लागले आहे.

# प्रभात फेऱ्यांसह पथनाट्यातून जनजागृती

प्रतिनिधी
■ पाली

रायगड जिल्ह्यात विधानसभा मतदारसंघात निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. २०१९ च्या निवडणुकीत जिल्ह्यात ६५.८६ टक्के मतदान झाले. २०१४ च्या निवडणुकीपेक्षा ४.३९ टक्क्यांची तफावत दिसून आली होती. जिल्हा प्रशासनाकडून मतांची टक्केवारी वाढवण्यासाठी वेगवेगळ्या मार्गाने जनजागृती होत आहे. ठिकठिकाणी प्रभात फेऱ्या, मतदान जागृती कार्यक्रम, पथनाट्य, असे विविध उपक्रम राबवले आहेत. समाजमाध्यमांवर जाहिरात, बॅनरबाजी करून मतदान करण्याचे आवाहन करण्यात येते. शाळा, महाविद्यालय, आरोग्य केंद्र, महसूल प्रशासनामार्फतदेखील मतदार जनजागृती करण्यात येत आहे. राजकीय पक्षांनीही मतदारांना जास्तीत जास्त मतदान करण्याचे आवाहन केले होते.

लाडक्या बहिणींवर मदार मतदारांचा प्रतिसाद कमी झाल्याने २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यात ६५.८६ टक्के मतदान झाले. त्या वेळी जिल्ह्यात पुरुष मतदारांचा टक्का वाढला होता, मात्र महिलांचा मतदानाचा घसरलेला टक्का चिंताजनक आहे. यंदा लाडकी बहीण योजना राबवण्यात आली आहे.

# भिवंडीत तांदळाचा काळाबाजार

प्रतिनिधी
■ भिवंडी

राष्ट्रीय अन्न महामंडळाच्या गोदामातून सरकारी रेशन दुकानात नेण्यासाठी ट्रकमध्ये भरलेला १२ टन तांदूळ भिवंडी भदाणे गावातील एका गोदामात उतरवण्यात आला. या घटनेची माहिती पोलिसांना मिळताच पोलिसांनी चार लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करत तांदळाचा काळाबाजार उधळून लावला आहे. भिवंडीत घडलेल्या या घटनेची कामगिरी कल्याण येथील खडकपाडा पोलिसांनी बजावली.

भिवंडीतील अंजूरफाटा येथील राष्ट्रीय अन्न महामंडळाच्या गोदामातून १२ टन तांदूळ कल्याण येथील शासकीय रेशन दुकानात पुरवठा करण्यासाठी एमएच ०४ जीसी २७५७ क्रमांकाचा ट्रक घेऊन जात असल्याची गुप्त माहिती कल्याणच्या खडकपाडा पोलिसांना मिळाली होती. हा तांदूळ कल्याणमधील रेशनिंग वितरण केंद्रात नेण्याऐवजी काळ्या बाजारातून विकण्यासाठी ट्रकचालकाने आपल्या ट्रकची जीपीएस यंत्रणा बदलली. त्याचप्रमाणे तो ट्रक राजनोलीमार्गे मुंबई-नाशिक मार्गावर नेला. या घटनेची माहिती मिळताच खडकपाडा पोलिसांनी या ट्रकचा पाठलाग करून भदाणे येथील जय आनंद फूड इंडस्ट्रीजच्या गोदामात पकडला. तेथे २४० पोत्यांमध्ये भरलेला १२ हजार किलो तांदूळ ट्रकमधून उतरवला जात होता. या तांदळाची बाजारभावानुसार सुमारे चार लाख ८० हजार रुपये इतकी किंमत असल्याचे सांगण्यात येत आहे.

पोलिसांनी ट्रकचालकाला ताब्यात घेऊन जय आनंद फूड इंडस्ट्रीजचे गोदाम सील केले आहे. शिधावाटप विभागाच्या अधिकाऱ्यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला असून तपास सुरू आहे.

# रायगडात तिन्ही आमदार पुन्हा रिंगणात

प्रतिनिधी
■ अलिबाग

शिवसेना शिंदे गटाच्या रायगड जिल्ह्यातील तिन्ही आमदारांना पक्षाने पुन्हा एकदा निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. तर राष्ट्रवादीकडून अदिती तटकरे यांना तिकीट देण्यात आले आहे. पक्षाने त्यांच्या उमेदवारीची घोषणा केल्यानंतर त्यांच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष केला आहे. जिल्ह्यात आता महायुतीचे सात पैकी सहा उमेदवार जाहीर झाले आहेत. पेणचा तिढा मात्र अजूनही कायम असल्याचे दिसत आहे.

जिल्ह्यातील महाड विधानसभा मतदारसंघातून शिवसेनेने (शिंदे गट) आमदार भरत गोगावले यांना उमेदवारी दिली आहे. या मतदारसंघातून शिवसेना ठाकरे गटाकडून स्नेहल जगताप यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. त्यामुळे महाडमध्ये शिवसेना विरुध्द शिवसेना अशी लढत होणार आहे.



लोकसभेतील मतदान टक्क्यावरुन येथे 'काँटे की टक्कर' पहायला मिळेल, अशी चर्चा आहे. अलिबाग मतदारसंघातून महेंद्र दळवी यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

ते महायुतीचे उमेदवार म्हणून निवडणूक लढणार आहेत. त्यांच्यासमोर शेकापच्या चित्रलेखा पाटील निवडणूक लढवत आहेत. त्यांची ही पहिलीच पण 'करो या मरो'ची लढाई आहे. तर दुसरीकडे भाजपचे उपाध्यक्ष दिलीप भोईर हेदेखील निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याच्या तयारीत आहेत. पक्षाचे तिकीट आता मिळणे कठीण आहे. त्यामुळे ते अपक्ष निवडणूक लढण्याची शक्यता आहे. कर्जत मतदारसंघातून महेंद्र थोरवे यांना पुन्हा संधी देण्यात आली आहे.

या मतदारसंघात महायुतीमध्ये प्रचंड उलथापालथ झाली आहे. थोरवे यांना उमेदवारी मिळाल्यामुळे राष्ट्रवादी हा पक्षच फुटून बाजूला झाला आहे. त्यामुळे सुधाकर घारे अपक्ष म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. शिवसेना ठाकरे गटाचे नितीन सावंत हेदेखील पक्षाचे अधिकृत उमेदवार आहेत.त्यामुळे येथे त्रिशंकू लढत होण्याची शक्यता आहे. श्रीवर्धन मतदारसंघातून राष्ट्रवादीने अदिती तटकरे यांना दुसऱ्यांदा उमेदवारी दिली आहे.

या मतदारसंघात मात्र विरोधकांना अजून उमेदवार सापडल्याचे दिसत नाही. कुठल्याही पक्षाने अधिकृत उमेदवार जाहीर केलेला नाही. त्यामुळे अदिती यांच्याविरोधात नेमका कोण उमेदवार असेल? हे येत्या दोन दिवसांत स्पष्ट होईल असे दिसते. एकंदरीत, जिल्ह्यात सातच्या सात आमदार महायुतीचे आहेत. यामध्ये भाजपकडून उरणमध्ये महेश बालदी, पनवेलमधून प्रशांत ठाकूर, शिवसेना शिंदे गटाकडून कर्जतमध्ये महेंद्र थोरवे, अलिबागमधून महेंद्र दळवी, महाडमधून भरत गोगावले तर श्रीवर्धनमधून अदिती तटकरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. पेणचा उमेदवार अद्याप जाहीर झालेला नाही.

# मुख्यमंत्र्यांच्या ठाण्यात भाजपच मोठा भाऊ, सर्वाधिक नऊ जागांवर लढणार

प्रतिनिधी
■ ठाणे


ठाणे जिल्हा हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला असला तरी जागावाटपात भाजपच मोठा भाऊ ठरला आहे. विद्यमान आमदारांना प्रथम प्राधान्य हा फॉर्म्युला ठरला असल्याने या तत्त्वानुसार भाजप हक्काच्या नऊ जागांवर लढणार आहे. त्यापैकी सात आमदारांना भाजपने उमेदवारी देत बाजी मारली आहे. तर, दुसरीकडे ठाणे, कल्याण पूर्व, ऐरोली, बेलापूर, उल्हासनगर या विधानसभांवरील शिवसेना शिंदे गटाचा दावा फोल ठरला आहे. कल्याण ग्रामीण मनसेला सोडणार असल्याचे कळते. भिवंडी पूर्वमध्ये शिवसेना शिंदे गट की राष्ट्रवादी अजित पवार गट यावर निर्णय झालेला नाही. त्यामुळे सध्यातरी विद्यमान आमदार असलेल्या पाच जागांवरच शिवसेना शिंदे गटाची बोळवण होण्याची शक्यता आहे.



लोकसभा निवडणुकीत ठाणे जिल्ह्यातील तीन लोकसभांमध्ये महायुती आणि महाविकास आघाडीत रस्सीखेच पाहायला मिळाली. यामध्ये शिवसेना शिंदे गटाने बाजी मारत दोन लोकसभा लढवल्या आणि जिंकल्याही. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत याची पुनरावृत्ती होईल, अशी अपेक्षा बाळगून असलेल्या इच्छुकांनी गुडघ्याला बाशिंग लावून निवडणुकीची तयारी केली. पण आली लग्नघटीका समीप अशी हाक येताच वरमाला हातात घेऊन असणाऱ्या इच्छुक उमेदवारांऐवजी 'विद्यमान'च बोहल्यावर चढल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे, लोकसभा निवडणुकीत आत्मविश्वास वाढलेल्या शिवसेना शिंदे गटाच्या पदरात खासकरून ठाणे जिल्ह्यात निराशा आली आहे. जिल्ह्याचा हक्काचा मुख्यमंत्री असतानाही जागावाटपात पक्षाला दुय्यम स्थान मिळाल्याची सल आता बंडखोरीच्या माध्यमातून बाहेर पडत आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे ठाण्याचे असल्याने या जिल्ह्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

## पुणे विद्यार्थी गृहाच्या माजी कार्याध्यक्षांसह दोघांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल

**पुणे :** पुणे विद्यार्थी गृहाचे माजी कार्याध्यक्षांसह दोन जणांविरुद्ध विश्रामबाग पोलिसांनी आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. बनावट बदल अर्ज धर्मादाय आयुक्त कार्यालयात सादर करुन संस्थेचा बेकायदा ताबा घेऊन आर्थिक लाभ मिळवण्याचा प्रयत्न आरोपीकडून करण्यात आल्याचे पोलिसांकडे दाखल करण्यात आलेल्या तक्रारीत सांगितले आहे.याबाबत पुणे विद्यार्थी गृह संस्थेचे माजी कार्याध्यक्ष रामचंद्र लक्ष्मण शेटे (वय 74, रा. चिंतामणीनगर, बिबवेवाडी,पुणे), वरुण संजय दिवाडकर (वय 32, रा. नारायण पेठ,पुणे) यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे (वय 55, घाटकोपर, मुंबई) यांनी विश्रामबाग पोलिस ठाण्यात आरोपी विरोधात फिर्याद दिली आहे. संस्थेचे माजी कार्याध्यक्ष शेटे आणि दिवाडकर यांनी तळेगाव, नाशिक-अंजनेरी येथे संस्थेची नियामक मंडळाची सभा झाल्याचे खोटे भासविले. त्यांनी संगनमत करून परस्पर सभेचे बनावट इतिवृत्त तयार केले.



## महत्त्वाचे

### बिल अदा करण्यासाठी 2 लाखांची मागणी

**जळगाव :** ग्रामपंचायत अंतर्गत करण्यात आलेल्या विकास कामांचे बिल अदा करण्यासाठी आणि दुसऱ्या गावात घेतलेल्या कामांची वर्क ऑर्डर काढून देण्यासाठी २ लाख रुपयांची लाच मागितली. या प्रकरणी पारोळा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, विस्तार अधिकाऱ्यांसह पाच जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. जळगाव लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्यावतीने ही कारवाई करण्यात आली आहे. दलीत वस्ती सुधार योजनेअंतर्गत पारोळा तालुक्यातील सावखेडा होळ या गावात दरम्यान तक्रारदाराने पेव्हर ब्लॉक बसविणे व काँक्रिट रस्ता बनवण्याचे ७ लाखांचे बिल तसेच सावखेडा तुर्क गावातील रस्त्यांचे खडीकरण करण्याचे ६० लाखांचे ३ कामे, शासनाच्या ९०-१० हेडखाली ३० लाखांचे तीन अशी एकूण ९० लाखाचे सहा कामे घेतली होती. त्यापैकी सावखेडा होळ गावात केलेल्या कामांचे बिल व सावखेडा खुर्द गावात घेतलेल्या कामांची वर्क ऑर्डर काढून देण्याचे मोबदल्यात गटविकास अधिकारी किशोर दत्ताजीराव शिंदे (वय ५६) यांनी तक्रारदाराकडे २ लाख रुपये लाच रकमेची मागणी केली होती.

### सांभाळण्यासाठी दिलेल्या श्वानाला डांबून ठार मारले

**पिंपरी :** नेरे – दत्तवाडी येथे एका ॲनिमल शेल्टरमध्ये सांभाळण्यास दिलेल्या श्वानाचा सांभाळ न करता त्याला डांबून ठेवून ठार मारल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी ३२ वर्षीय महिलेने हिंजवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार ॲनिमल वेलफेअर ट्रस्टचे रोहित चौधरी याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी महिलेने रोहित यांना १२ हजार रुपये देऊन त्यांच्याकडील मादी श्वान सांभाळण्यासाठी दिले होते. त्यानंतर फिर्यादीने रोहितला श्वानाचे छायाचित्र पाठविण्यास सांगितले.मात्र, छायाचित्र पाठवण्यास रोहितने टाळाटाळ केली. फिर्यादी यांनी श्वानाचे परिचय पत्रक लावून श्वानाचा शोध घेतला. त्यावेळी रोहितच्या शेल्टरजवळ एका व्यक्तीने शेल्टरपासून २०० मीटर अंतरावर मृत श्वान दाखविले.

### मराठा आरक्षणासाठी चिठ्ठी लिहुन आत्महत्या

**बीड :** मराठा समाजाला आरक्षण मिळत नसल्याने मी फासी घेत आहे. अशी चिठ्ठी लिहुन पस्तीस वर्षीय युवकाने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना काल रात्री बीडच्या गेवराईत घडली.. गणेश आण्णासाहेब काळे, रा. गोळेगाव, ता. गेवराई, जि. बीड असे आत्महत्या केलेल्या युवकाचे नाव आहे. मागील एक वर्षांपासून आरक्षणाबाबत मराठा समाज तसेच मनोज जरांगे-पाटील हे संघर्ष करत आहेत. मात्र, सरकारकडून आरक्षणाबाबत निर्णय घेता निवडणूक जाहीर झाल्याने मराठा आरक्षण मिळाले नसल्याने बुधवार (ता. २३) रात्री मी गणेश काळे मराठा समाजाला आरक्षण मिळत नसल्याने फासी घेत अशी चिठ्ठी लिहुन गळफास लावून जीवनयात्रा संपविली.
या घटनेची माहीती तलवाडा पोलीसांना मिळाल्यानंतर आज सकाळी पंचनामा करून मृतदेह जातेगाव प्राथमिक केंद्रात उत्तरीय तपासणीस दाखल करण्यात आला.

# भोसरीत पाण्याची टाकी कोसळली

## 5 कामगारांचा दुर्दैवी मृत्यू

प्रतिनिधी
■ पिंपरी

पिंपरी-चिंचवडमधील भोसरी येथे पाण्याची टाकी कोसळून 5 कामगारांचा मृत्यू झाला. भोसरीतील सद्गुरू नगर येथे गुरुवारी पहाटेच्या सुमारास ही घटना घडली. याची माहिती मिळताच अग्निशमन दल, महापालिका प्रशासन आणि पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. ही दुर्घटने कशी घडली याचा तपास सुरू करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पहाटेच्या सुमारास सद्गुरू नगरमधील पाण्याची टाकी अचानक कोसळली. येथेच लेबर कॅम्बमध्ये सर्व कामगार राहतात. या दुर्घटनेत 5 कामगारांचा जागीच मृत्यू झाला, तर काही कामगार जखमी झाले आहेत. घटनास्थळी रुग्णवाहिकाही पोहोचली असून जखमींना जवळच्या रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, पाण्याची टाकी कोसळण्याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. ही टाकी एका स्थानिक बिल्डरने बांधली होती. त्यामुळे टाकीच्या बांधकामाच्या दर्जावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.



एकीकडे विधानसभा निवडणुकांची धामधूम सुरु असताना दुसरीकडे पिंपरी चिंचवडमध्ये मोठी दुर्घटना घडली आहे. पिंपरी चिंचवडमध्ये पाण्याची टाकी कोसळून 4 कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. पिंपरी चिंचवडमधील भोसरीतील सदगुरु नगर या ठिकाणी ही धक्कादायक घटना घडली आहे. सध्या या ठिकाणी रेस्क्यू ऑपरेशन सुरु करण्यात आले आहे. सध्या अग्निशमन दलाचे कर्मचारी आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, पिंपरी चिंचवड परिसरातील भोसरीच्या सदगुरु नगर या ठिकाणी असलेली एक पाण्याची टाकी कोसळली. या ठिकाणी लेबर कॅम्पमधील काही कामगार राहत होते. बिल्डरने तकलादू पद्धतीने ही पाण्याची टाकी उभारली होती, असा आरोपही नागरिकांनी केला आहे. आज सकाळी साधारण ७ च्या दरम्यान ही पाण्याची टाकी कोसळून मोठी दुर्घटना घडली.

या टाकीच्या ढिगाऱ्याखाली अनेकजण अडकल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. तसेच या घटनेत चार कामगारांचा मृत्यू झाला आहे. तर काही कामगार जखमी झाले आहेत. या दुर्घटनेची माहिती मिळताच पिंपरी चिंचवडमधील अग्निशमन दल आणि पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. सध्या हा ढिगारा हटवून जखमींना बाहेर काढले जात आहे. तसेच सध्या जखमींना रुग्णालयात दाखल केले जात आहे. पण या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कामगारांचे मृतदेह काढण्यास नातेवाईकांडून विरोध दर्शवला जात आहे.

# मनोज जरांगे यांना जीवे मारण्याची धमकी

प्रतिनिधी
■ जालना

मराठा आंदोलन मनोज जरांगे यांनी विधानसभा निवडणुकीत उमेदवार उभे करण्याची घोषणा केली आहे. इच्छुकांशी चर्चा करुनच उमेदवार निश्चित करणार असल्याचे जरांगे यांनी आधीच सांगितले आहे. त्यामुळे त्यासाठी अनेक इच्छुक जरांगे यांची भेट घेण्यासाठी आंतरवाली सराटी येथे गर्दी करत आहेत. दरम्यान, मनोज जरांगेंना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. इच्छुक उमेदवार म्हणून येणार आणि गेम करणार, अशी धमकी एका युट्यूब चॅनलच्या कमेंटमधून दिली आहे. एका अज्ञाताने ही धमकी दिली असू यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

युट्यूबवरील एका चॅनलच्या कमेंटमध्ये बजाज बिश्नोई लीडर नावाच्या फेक अकाउंटवरुन ही धमकी देण्यात आली आहे. इच्छुक उमेदवार म्हणून येणार आणि गेम करणार, अशा आशयाची ही धमकी आहे. ऐन निवडणुकीत मनोज जरांगेंना धमकी मिळाल्याने एकच खळबळ उडाली आहे. या धमकीनंतर मनोज जरांगे यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली असून जरांगे बसत असलेल्या सरपंच मळा येथे पोलिस बंदोबस्त वाढवला आहे. तसेच जरांगेंना भेटण्यासाठी येणाऱ्या सर्वांची तपासणी होणार असल्याचे समजते.



दरम्यान, एका जातीवर निवडणूक लढवता येणार नाही, सर्वांना सोबत घेऊन राजकीय समीकरण जुळवणार आहे. 30-40 दिवस कष्ट घेतले तर पाच वर्ष सर्व जनता आनंदी राहील. सर्वांना हात जोडून विनंती करणार एकच जण उभे रहा. किती मतदारसंघ काढायचे हे आज जाहीर करायचे नाही. काही मतदारसंघांमध्ये उमेदवार उभे करणार असल्याचे सांगितल्यानंतर आता एकच उमेदवार दिल्यावाचून पर्याय नाही, असे मनोज जरांगे यांनी आज सकाळी माध्यमांशी संवाद साधताना म्हटले आंतरवालीत आज जरांगे पाटील इच्छुकांच्या मुलाखती घेणार आहेत. यासाठी मराठवाड्यासह 23 जिल्ह्यातील इच्छुकांना त्यांनी आंतरवालीत बोलावले आहे. इतक्या मोठ्या संख्येने येणाऱ्या उमेदवारांशी जरांगे पाटील स्वतंत्रपणे कसे बोलू शकतील, असा प्रश्न उपस्थित होतो आहे. मात्र, जरांगे यांनी 24 तास बैठक घेण्याची तयारी ठेवली आहे. गरज पडली तर पहाटे 4 वाजेपर्यंत बसू असे जरांगेंनी स्पष्ट केले.

# 23 तारखेला घराघरात गुलाल उधळायचाय

## आर. आर. आबांचा लेक पहिल्यांदाच विधानसभेच्या आखाड्यात

प्रतिनिधी
■ पुणे

विधानसभा निवडणुकीच्या रणसंग्रामात यंदा पहिल्यादांच निवडणुकीच्या रिंगणात उतणाऱ्या उमेदवारांची चर्चा होतेय. असाच एक तरूण उमेदवार म्हणजे राज्याचे माजी गृहमंत्री, राष्ट्रवादीचे दिवंगत नेते आर. आर. पाटील यांचा लेक रोहित पाटील... रोहित पाटील यंदा विधानसभेची निवडणूक लढवत आहेत. तासगांव कवठे महांकाळ विधानसभा मतदारसंघातून रोहित पाटील निवडणूक लढवत आहेत.



आज त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. या निवडणुकीतील प्रचाराचं पहिलं भाषण रोहित पाटील यांनी गाजवलं. येत्या 23 नोव्हेंबरला प्रत्येक घराघरात गुलाल आणि भंडारा आपल्याला उधळायचाय, असं रोहित पाटील म्हणाले.

आर. आर. पाटील आपल्यातून निघून गेले असले तरी त्यांची कमी मला तुम्ही कधीही भासू दिली नाही, कार्यकर्त्यांना अशी भावनिक साद घालत रोहित पाटील यांनी भाषणाची सुरुवात केली. कार्यकर्त्यांची मान कधीही खाली जाऊ देणार नाही याची मी काळजी घेईन. अनेक निवडणुकात पक्षाने माझे स्टार प्रचाराकडून निवड केली होती. लोकसभा निवडणुकीत अनेक उमेदवारासाठी मी सभा घेतल्या. पण स्वतः निवडणुकीला उभारल्यावर भाषण काय करायचं असतं.

# दिलीप वळसे पाटलांच्या उमेदवारीवरुन राडा

## शिवसेनेच्या आदिवासी नेत्याचा तीव्र विरोध

प्रतिनिधी
■ पुणे

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिलीप वळसे पाटील यांच्या आंबेगाव विधानसभा मतदारसंघातील उमेदवारीवरून गुरुवारी भर पत्रकार परिषदेत मोठा राडा झाला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेच्या एका स्थानिक नेत्यांनी वळसेंची उमेदवारी आपल्याला मान्य नसल्याची टीका करत पत्रकार परिषदेतच पक्षाला सोडचिठ्ठी देण्याची घोषणा केली. यामुळे महायुतीचे राजकारण चांगलेच तापले आहे.

दिलीप वळसे पाटील गुरुवारी आंबेगाव विधानसभा मतदारसंघातून आपली उमेदवारी दाखल करणार आहेत. तत्पूर्वी आयोजित एका पत्रकार



परिषदेत त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. या परिषदेत शिंदे गटाच्या आदिवासी विभागाचे प्रमुख विजय आडारी यांनी वळसेंच्या उमेदवारीला कडाडून विरोध दर्शवला. ते म्हणाले, मला या ठिकाणी पक्षाची बैठक असल्याचे सांगून बोलावण्यात आले होते. पण प्रत्यक्षात येथे दुसराच ठराव घेतला जात आहे. हा प्रकार मला मान्य नाही. वळसेंनी आम्हाला वेळोवेळी त्रास दिला. त्यामुळे त्यांच्या उमेदवारीविरोधात आम्ही इथे आताच्या आता पक्षातून बाहेर पडण्याची घोषणा करत आहोत.

विजय आडारी म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेसचा सभापती निवडून आणताना आणि इतर सर्व कामांत आम्ही त्यांना मदत केली. पण त्यानंतरही त्यांनी आदिवासी भागात आम्हाला खूप त्रास दिला. सद्यस्थितीत मी माझा जीव मुठीत धरून दिवस काढत आहे. आम्हाला इथे पक्षाची बैठक असल्याचे सांगून बोलावण्यात आले. पण इथे दुसराच ठराव घेतला जात आहे. त्याची आम्हाला कोणतीही माहिती नव्हती. मी जिल्ह्याचा आदिवासी प्रमुख म्हणून काम करतो. मी आत्ता या क्षणी पक्ष सोडण्याची घोषणा करत आहे. मी माझी पुढील भूमिका आताच स्पष्ट करमार नाही. पण आमचा दिलीप वळसे पाटील यांच्या उमेदवारीला विरोध आहे.

# श्रीकांत जिचकरांचे पुत्र अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करणार

प्रतिनिधी
■ नागपूर

"दिवंगत श्रीकांत जिचकर यांचे पुत्र याज्ञवल्क्य जिचकार हे मागील काही दिवसांपासून काटोल विधानसभा मतदारसंघांमध्ये निवडणूक लढण्याची इच्छुक असून प्रचार करत आहेत. काटोल मतदारसंघ महाविकास आघाडी कोणाला सुटेल हे माहित नाही, मात्र जनभावनेचा आदर ठेवत अपक्ष निवडणूक लढवणार असल्याचं जाहीर आहे. एकाच घरात सत्ता असताना खूप काही असतांना काही झालं नाही, उद्या 25 ऑक्टोबरला अपक्ष उमेदवारी अर्ज भरणार आहे. मी काँग्रेस नेत्यांच्या संपर्कात आहे. त्यामुळं काँग्रेसला सुटून मला उमेदवारी मिळेल. दुसऱ्या कोणाला सुटली तरी उमेदवारी मागे घेणार नाही, मी अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढणार आहे. शिक्षण आरोग्य रोजगार अश्या अनेक क्षेत्रात काम झालेलं नाही, अनेक मुद्दे आहे हे भविष्यात केले जाऊ शकते.

# निवडणुकीच्या तोंडावरच अजित पवारांना मोठा धक्का

## विद्यमान आमदाराची बंडखोरी, महिला नेत्यानेही सोडली साथ

प्रतिनिधी
■ नागपूर

महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका आता तोंडावर आल्या आहेत. मात्र अद्यापही राज्यातील जागावाटपाची प्रक्रिय पूर्ण झाली नाही. अशातच अनेक नेते उमेदवारी न मिळाल्याने बंडखोरी देखील करत आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या 38 उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. मात्र या यादीत गोंदिया येथील अर्जुनी मोरगाव मतदारसंघातील



विद्यमान आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांचे तिकीट कापल्याने त्यांनी बंडखोरी केल्याचे समोर आले आहे.

आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांनी बंडखोरी करत महाराष्ट्रातील तिसरी आघाडी परिवर्तन महाशक्तीमधील प्रहार या पक्षात प्रवेश करत मैदानात उतरणार आहेत. मनोहर चंद्रिकापुरे व त्यांचे पुत्र सुगत चंद्रिकापुरे यांनी प्रहार पक्षात प्रवेश केला आहे. त्यामुळे मोरगावच्या विधानसभा निवडणुकीत तिरंगी लढत होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. भाजपमधून अजित पवारांच्या गटात राजकुमार बडोले यांनी पक्षप्रवेश करत उमेदवारी मिळवल्याने मनोहर चंद्रिकापुरे यांनी नाराजी व्यक्त करत बंडखोरी केली असल्याचे दिसत आहे.

# संजय राऊत यांनी श्रीगोंधाचे तिकीट विकले

## शरद पवार गटाच्या नेत्याचा गंभीर आरोप

प्रतिनिधी
■ अहमदनगर

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघाची महाविकास आघाडीची उमेदवारी विक्री केल्याचा गंभीर आरोप येथील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा माजी आमदार राहुल जगताप यांनी केला आहे. त्यांच्या या आरोपामुळे महाविकास आघाडीत एकच खळबळ माजली आहे.

श्रीगोंदा विधानसभेतील राष्ट्रवादी



काँग्रेसच्या अजित पवार गटाच्या नगर जिल्हाध्यक्षा अनुराधा नागवडे आणि राजेंद्र नागवडे यांनी बुधवारी उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला.

# समीर भुजबळ येत्या 28 ऑक्टोबरला उमेदवारी अर्ज दाखल करणार

प्रतिनिधी
■ नाशिक

महायुतीला नाशिकमध्ये मोठा धक्का बसला आहे. छगन भुजबळ यांचे पुतणे, माजी खासदार समीर भुजबळ यांनी बंडखोरी करत निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. समीर भुजबळ नांदगाव मतदारसंघातून निवडणूक लढणार आहेत.

समीर भुजबळ येत्या 28 ऑक्टोबरला उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचंही त्यांनी सांगितलं आहे. समीर भुजबळ आज राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी मुंबई अध्यक्षपदाचा देखील राजीनामा दिला आहे. समीर भुजबळ महायुतीतून नांदगाव मतदारसंघातून निवडणूक लढवण्यास इच्छूक होते. मात्र शिवसेना शिंदे गटाने पहिल्याच यादीत विद्यमान आमदार सुहास कांदे यांना या मतदारसंघातून उमेदवारी जाहीर केली.

त्यानंतर समीर भुजबळ शरद पवार गटातून निवडणूक लढवतील अशी शक्यता वर्तवली जात होता. मात्र शिवसेना ठाकरे गटाने गणेश धात्रक यांना येथून उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे समीर भुजबळ यांना येथून बंडखोरी करत अपक्ष लढण्याचा निर्णय घेतला आहे. समीर भुजबळ यांना पत्रकार परिषद घेत म्हटलं की, नांदगावमधील परिस्थिती अतिशय भयानक आहे. पंकज भुजबळांनी 10 वर्षात केलेल्या विकासकामांना खीळ बसली आहे.

# खोट्या नॅरेटिव्हला जनता बळी पडणार नाही

## नाव न घेता गिरीश महाजनांची संजय राऊतांवर टीका

प्रतिनिधी
■ धुळे

आता त्यांना घरीच बसण्याची वेळ येणारं आहे आणि सकाळी उठून पोपटपंची सारखं बोलण्याची वेळ येणार आहे, अशा शब्दांत मंत्री गिरीश महाजन यांनी नाव न घेता संजय राऊत यांना पुन्हा टोला लगावला आहे. संजय राऊत यांच्या खोट्या नरेटीव्हला आता जनता बळी पडणार नाही, असंही महाजनांनी ठामपणे सांगितलं आहे.

महाविकास आघाडीचाच मुख्यमंत्री होईल हे मी ठासून सांगत आहे, असं संजय राऊत म्हणाजे होते.



त्यावर प्रत्युत्तर देताना महाजनांनी नाव घेता राऊतांवर टीका केली आहे.

राज्यात सध्या विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी रंगली आहे. महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये सत्ता स्थापन करण्यासाठी कसून प्रयत्न सुरू आहेत. अशात दररोज विरोधक सत्ताधाऱ्यांवर टीका करतायत. तसेच सत्ताधारी देखील विरोधकांवर आरोपांच्या आणि टिकेच्या फैरी झाडत आहेत. त्यात आता मंत्री गिरीश महाजन यांनी संजय राऊतांवर टिकास्त्र डागलं आहे.

# महाराष्ट्राला यशोमती ठाकूरांसारख्या बुलंद व कणखर नेतृत्वाची गरज - आ. विनेश फोगाट

## मविआच्या उमेदवार यशोमती ठाकूर यांचे शक्तिप्रदर्शन

प्रतिनिधी
■ अमरावती

महिलाच नव्हे तर युवकांवर देखील अन्याय करणाऱ्या भाजप प्रणित सरकारला पराभूत करून महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार निवडून आणा. यशोमती ठाकूर यांच्यासारख्या बुलंद व कणखर नेतृत्वाची समाजाला व पर्यायाने महाराष्ट्राला गरज असून या आपल्या बहिणीला हरविण्यासाठी विरोधक षडयंत्र रचतील परंतु आपण कोणत्याही भ्रमात न राहता यशोमती ठाकूर यांचा बुलंद आवाज विधानसभेत पोहचवा, असे आवाहन प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू आ. विनेश फोगाट यांनी केले.

महाविकास आघाडीच्या उमेदवार लोकनेत्या यशोमती ठाकूर यांच्या प्रचारार्थ आयोजित



विराट सभेत आ. विनेश फोगाट बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर माजी केंद्रीय मंत्री अरुण यादव, मध्यप्रदेशचे माजी मंत्री सुखदेव पांसे, खा. बळवंत वानखडे, वर्धा येथील खा. अमर काळे, यवतमाळ येथील खा.संजय देशमुख, माजी मंत्री अनिलबाबू देशमुख यांची उपस्थिती होती. यशोमती ठाकूर यांनी आज तिवसा विधानसभा मतदारसंघासाठी नामांकन दाखल केले. आ. यशोमती ठाकूर यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी महाविकास आघाडी व घटकपक्षाचे हजारो कार्यकर्ते तिवसा येथील समर्थ आडकूजी महाराज नगर सातरगाव रोड येथील मैदानावर जमले होते.

प्रारंभी नामांकन रॅली काढून यशोमती ठाकूर यांनी अफाट सभा घेतली. मोठ्या शक्तीप्रदर्शनात त्यांनी आपला नामांकन अर्ज दाखल केला. यावेळी पुढे बोलतांना विनेश फोगाट म्हणाल्या की,यशोमती ठाकूर या बहादूर बेटी व बहीण आहे. यशोमतींचा आवाज म्हणजे तुमचा आवाज.यशोमती ठाकूर सारख्या महिला निर्माण झाल्यास महिलांवर अत्याचार होणार नाहीत असा विश्वास आ.फोगाट यांनी व्यक्त केला. यावेळी माजी केंद्रीय मंत्री अरुण यादव यांनी केंद्र सरकार सोबतच राज्य सरकारचा समाचार घेत यशोमती ठाकूर सारख्या जनतेच्या पाठीराख्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्यांनी निवडून देण्याचे आवाहन नागरिकांना केले. यावेळी माजी मंत्री सुखदेव पांसे यांनी यशोमती सारख्या विकासाभिमुख नेतृत्वाची आज गरज असल्याचे म्हटले.

# आम्ही महाविकास आघाडीतच राहणार

प्रतिनिधी
■ सांगोला

"सांगोल्याची जागा जर लढवणार नसेल, तर शेकाप कोणतीच जागा लढवणार नाही. आम्ही आमचे अधिकार शरद पवार यांना दिले आहेत. त्यांनीच सांगितले आहे की, सांगोल्यात आमचा पाठिंबा शेकापला राहील. त्यामुळे ते सांगतील त्याप्रमाणे होईल. महाविकास आघाडीचे दोन उमेदवार नसतील. आम्ही महाविकास आघाडीतच राहणार आहोत," असं स्पष्टीकरण शेकापचे सरचिटणीस भाई जयंत पाटील यांनी सांगोल्यात दिलं.

सांगोला विधानसभेसाठी शेकापकडून स्व. गणपत आबांचे नातू डॉ. बाबासाहेब देशमुख यांना अधिकृत उमेदवारी शेकापचे सरचिटणीस भाई जयंत पाटील यांनी पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या



उपस्थितीत जाहीर केली. यावेळी ते बोलत होते. जयंत पाटील पुढे म्हणाले, शहाजी बापूंचे बजेट मोठे असणार आहे. आम्ही पैशाला पुरे पडणार नाही. यावेळी डॉ. बाबासाहेब देशमुख म्हणाले, आबासाहेबांच्या पश्चात नेतेमंडळी आमची चेष्टा करीत होती. त्यांचे विचार निष्ठा सोडून नेते मंडळी इकडून तिकडून गेली. मात्र, ज्याला लढायचे आहे. त्यांनी तिरंगी, चौरंगी, पंचरंगी लढावे. केवळ कोणीही डरकाळ्या फोडू नये, रिंगणात उतरावे.

डॉ. अनिकेत देशमुख म्हणाले, आम्हा देशमुख कुटुंबात वादच नव्हता. विरोधकाकडून आमच्यात मतभेद असल्याचा प्रयत्न केला. आम्हाला आमिषे दाखवली गेली; परंतु आबासाहेबांनी कार्यकर्त्यांची बांधलेली मोळी आम्ही दोघे सहजासहजी सोडणार नाही. समोर कोण आहे याची चिंता आम्हाला नाही. सांगोला विधानसभा मतदारसंघ महाविकास आघाडीतून शेकापला सुटणार म्हणत शेकापने डॉ. बाबासाहेब देशमुख यांची उमेदवारी जाहीर केली.

७ वृत्तमानस
मुंबई-क्रीडा
मुंबई, शुक्रवार, २५ ऑक्टोबर २०२४

## राष्ट्रीय "बेंचप्रेस" स्पर्धेत महाराष्ट्राचे शानदार यश....

**मुंबई :** वास्को -गोवा येथील रवींद्र भवन येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय बेंचप्रेस स्पर्धेत महाराष्ट्र संघाने शानदार कामगिरी करताना विविध गटातील तब्बल चौदा सांघिक जेतेपद मिळवली.. ही स्पर्धा पॉवरलिफ्टिंग इंडिया आणि गोवा सुपर बॉडीज पॉवरलिफ्टिंग असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. या क्लासिक बेंच स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाने सब ज्युनिअर, ज्युनिअर, सीनियर, आणि मास्टर्स पुरुष व महिलांच्या गटात आपल्या चमकदार कामगिरीचा ठसा उमटवला. महाराष्ट्राच्या अनेक पुरुष व महिला खेळाडूंनी या स्पधैत भरघोस पदकांची कमाई केली. . त्यामुळेच महाराष्ट्र संघाला एकूण 14 सांघिक विविध गटातील विजेतेपद मिळाली. महाराष्ट्राच्या या शानदार कामगिरी बाबत महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव संजय सरदेसाई ,राज्य संघटनेच्या उपाध्यक्षा ,शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त "रक्षा महाराव" यांनी सर्व पदक विजेत्या खेळाडूंचे खास अभिनंदन केले आहे. या सर्व खेळाडूंना शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त अनंत चाळके, सूर्यकांत गद्रे यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले. संघाचे व्यवस्थापक अरुण पाटकर होते.



## राजेश मंडल व रश्मी दळवीकडे मुंबईचे नेतृत्व

### कनिष्ठ राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा

■ मुंबई

सुवर्णमहोत्सवी कनिष्ठ (कुमार-मुली) राज्य अजिंक्यपद व निवडचाचणी खो-खो स्पर्धेसाठी मुंबईच्या कर्णधारपदी ओम साईश्वर सेवा मंडळाच्या राजेश मंडल व रश्मी दळवी यांची निवड झाली आहे. महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने उस्मानाबाद जिल्हा खो-खो असोसिएशनने धाराशिव (उस्मानाबाद) येथे 27 ते 30 ऑक्टोबर या कालावधीत होणाऱ्या स्पर्धेसाठी तीन महिन्यांचे सराव शिबिर घेण्यात आले. त्यात 46 मुले व 40 मुली सहभागी झाले. या खेळाडूंमधून अंतिम संघाची निवड करण्यात आली.



कुमार संघ: राजेश मंडल (कर्णधार), सुजल शिंत्रे, ओम वाटाणे, साई टेंबुलकर (सर्व ओम साईश्वर सेवा मंडळ), सुबोध पाटील (विद्यार्थी क्रीडा केंद्र), रोहन खांबे (सरस्वती स्पोर्ट्स क्लब), देवर्श पांगले, अनिश शिरोडकर (सर्व श्री समर्थ व्यायाम मंदिर), विघ्नेश कोरे (अमरहिंद मंडळ), श्रेयस सौंदळकर, साई गुरव (सर्व ओम समर्थ भारत व्यायाम मंदिर), प्रणव कुंभार, निमेश चौगुले, राहुल नेवरेकर, वेदांत नागवेकर (सर्व वैभव स्पोर्ट्स क्लब). प्रशिक्षक: निलेश सावंत. संघ व्यवस्थापक: गुरुदत्त शिंदे.

मुलींचा संघ: हर्षला सकपाळ, जान्हवी लोंढे, रिया सिंग (सर्व सरस्वती स्पोर्ट्स क्लब), रश्मी दळवी (कर्णधार), कादंबरी टेरवणकर, काजल मोरे, निर्मिती परब (सर्व ओम साईश्वर सेवा मंडळ), मुस्कान शेख, शर्वी नाडे, आरुषी गुप्ता (सर्व शिवनेरी सेवा मंडळ), सलोनी सावंत, अवंतिका अंबोळकर (सर्व वैभव स्पोर्ट्स क्लब), रुद्रा नाटेकर (अमर हिंद मंडळ), सृष्टी पाष्टे (ओम समर्थ भारत व्यायाम मंदिर), तन्वी मोरे (श्री समर्थ व्यायाम मंदिर),प्रशिक्षक: श्रीकांत गायकवाड. संघ व्यवस्थापिका: वर्षा मोरे.

## वॉशिंग्टनने केला गुरुवार 'सुंदर'
## पाहुण्या न्यूझीलंडचा डाव 259 धावांत गुंडाळला

### सुंदरने पटकावल्या ७ तर अश्विनने ३ विकेट



**संक्षिप्त धावफलक**

*न्यूझीलंड,पहिला डाव - ७९.१ षटकांत सर्वबाद २५९ ( डेवोन कॉन्वे ७६ ,रचिन रवींद्र ६५, मिचेल सॅटनर ३३ ;वॉशिंग्टन सुंदर ५९ धावांत ७ विकेट ,रविचंद्रन अश्विन ६४ धावांत ३ विकेट ) विरुद्ध भारत ,पहिला डाव ११ षटकांत १ बाद १६ (रोहित शर्मा ०,यशस्वी जैस्वाल खेळात आहे ६ ,शुभमन गिल खेळात आहे १० ;टीम सौदी ४ धावांत १ विकेट )*

प्रतिनिधी
■ पुणे

दुसऱ्या कसोटीच्या पहिल्या डावात भारताने न्यूझीलंडला २५९ धावांत गुंडाळले. पुण्यातील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर गुरुवारी न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला.फिरकीवीर वॉशिंग्टन सुंदरने अफलातून फिरकी मारा करीत किवींच्या ७ फलंदाजांना तंबूत धाडले.तर अनुभवी रविचंद्रन अश्विनने ३ विकेट घेतल्या.

भारताच्या फिरकीपटूंनी सर्व १० विकेट मिळवल्या . वॉशिंग्टन सुंदरने सर्वाधिक ७ विकेट घेतले. रविचंद्रन अश्विनने ३ फलंदाज बाद केले. .एजाज पटेल ४ धावा करून बाद झाला. त्याला वॉशिंग्टन सुंदरने बोल्ड केले. सुंदरने टीम साऊदी (५ ), ग्लेन फिलिप्स (९ ), डॅरील मिशेल (१८ ), टॉम ब्लंडेल (३ धावा) आणि रचिन रवींद्र (६५ धावा) यांनाही बाद केले. रविचंद्रन अश्विनने डेव्हन कॉनवे (७६ धावा), विल यंग (१८ धावा) आणि टॉम लॅथम (१५ धावा) यांना बाद केले. तो WTC चा सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज बनला आहे. तीन सामन्यांच्या मालिकेत भारत 0-१ ने पिछाडीवर आहे. न्यूझीलंडने पहिली कसोटी ८ विकेट राखून जिंकली होती.

टीम इंडियाच्या पहिल्या डावाची सुरूवात सुद्धा अत्यंत निराशाजनक झाली. टीम इंडियाचा कॅप्टन रोहित शर्मा शून्यावर बाद झाला. त्यामुळे टीम इंडियाची अवस्था एक बाद एक अशी झाली. यानंतर सलामीवीर यशस्वी जैस्वाल आणि शुभमन गिल यांनी सावध खेळ करत उर्वरित षटके खेळून काढली. टीम इंडियाने पहिल्या दिवसअखेर १ बाद १६ अशी स्थिती आहे.

## दक्षिण आफ्रिकेचा आशिया खंडात 10 वर्षांनी विजय

### डब्ल्यूटीसी गुणतालिकेत भारताचे वाढले टेन्शन



वृत्तसंस्था
■ ढाका

आफ्रिका आणि बांगलादेश यांच्यात बांगलादेशातील ढाका येथे पहिला कसोटी सामना खेळवला जात होता. या सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या संघाने बांगलादेशला हरवून इतिहास रचला आहे. ढाका येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या सामन्यात बांगलादेशचा ७ विकेट राखून पराभव करून संघाने गेल्या दहा वर्षांत आशिया खंडातील पहिला सामना जिंकला. संघाच्या या विजयानंतर 'आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप'च्या पॉइंट टेबलमध्ये बदल झाला आहे.

दक्षिण आफ्रिकेने या विजयासह कसोटी मालिकेत १-० ने आघाडी घेतली आहे. या विजयासह जागतिक कसोटी चॅम्पियनशिपमधील अंतिम सामन्याच्या दृष्टीने एक मोठं पाऊल टाकलं आहे. दक्षिण आफ्रिकेला अंतिम फेरीत जाण्यासाठी त्यांच्या उर्वरित ६ सामन्यात ५ विजय मिळवणं आवश्यक आहे. त्यात एक विजय तर त्यांनी मिळवला आहे. दक्षिण आफ्रिकेने २०१४ मध्ये आशिया खंडात अखेरचा सामना जिंकला होता. २०१४ मध्ये श्रीलंकेने गॅले येथे झालेल्या सामन्यात अखेरचा विजय मिळवला होता. यानंतर आशियात झालेल्या सर्व ९ कसोटी सामन्यांमध्ये त्यांना पराभव पत्करावा लागला आहे.

भारत आणि ऑस्ट्रेलियानंतर जागतिक कसोटी चॅम्पियनशिपची अंतिम फेरी गाठण्यासाठी आफ्रिकेचा संघही आता प्रतिस्पर्धी संघांमध्ये सामील झाला आहे. दक्षिण आफ्रिका संघाच्या या विजयामुळे भारताचे टेन्शनही वाढलं आहे. दक्षिण आफ्रिकेने या विजयासह जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत मोठी झेप घेतली आहे. बांगलादेशविरुद्धच्या विजयासह दक्षिण आफ्रिकेने जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत सहाव्या क्रमांकावरून थेट चौथ्या क्रमांकावर मजल मारली आहे. यापूर्वी संघाच्या गुणांची टक्केवारी ३८.८९ होती, जी आता ४७.६२ वर पोहोचली आहे. चितगाव येथे होणारा दुसरा सामनाही संघाने जिंकला तर भारत आणि ऑस्ट्रेलियापाठोपाठ त्यांनाही अंतिम फेरीत जाण्याची संधी आहे. गुणतालिकेतील अव्वल तीन संघ म्हणजे भारत, ऑस्ट्रेलिया आणि श्रीलंका आहेत. सध्या ६८.०६ या गुणांच्या टक्केवारीसह अव्वल स्थानावर आहे. संघाची टक्केवारी ७० च्या पार होती परंतु, बेंगळुरूमध्ये न्यूझीलंडविरुद्ध पराभव पत्करावा लागला, ज्याचा भारताला फटका बसला. ऑस्ट्रेलियाचा संघ ६२.५० च्या टक्केवारीसह गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर आहे. या यादीत श्रीलंका संघ तिसऱ्या स्थानावर आहे, ज्यांची टक्केवारी ५५.५६ आहे.

## अश्विनने साकारला भीमपराक्रम; जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या इतिहासातील बनला नंबर 1 गोलंदाज

प्रतिनिधी
■ पुणे



भारतीय संघाचा स्टार फिरकीवीर रविचंद्रन अश्विनने न्यूझीलंडविरुद्ध दुसऱ्या कसोटी भीमपराक्रम केला आहे. पुणे कसोटीत न्यूझीलंडचा फलंदाज विल यंगची विकेट घेत अश्विन जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या इतिहासात सर्वाधिक विकेट घेणारा गोलंदाज बनला आहे. या यादीत त्याने ऑस्ट्रेलियाचा स्टार फिरकीपटू नॅथन लियॉनचा मागे टाकले आहे.

पुण्यातील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियमवर सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात न्यूझीलंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र त्यांची सुरुवात खराब झाली. अश्विनने पहिल्या डावाच्या आठव्या षटकात कर्णधार टॉम लॅथमची विकेट न्यूझीलंडला ३२ धावांवर पहिला धक्का दिला.यानंतर अश्विनने विल यंग याला बाद करत जागतिक कसोटी चॅम्पियनशिपमध्ये सर्वाधिक विकेट घेण्याचा मान पटकावला. यासह तो गोलंदाजांच्या क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर पोहचला आहे.

ही विकेट अश्विनच्या खात्यात न सरफराज खानच्या खात्यात जायला हवी, कारण त्याने योग्य वेळी दाखवलेल्या हुशारीमुळे भारताला ही विकेट मिळाली. वास्तविक, विल यंगच्या बॅटला फटका बसल्यानंतर चेंडू ऋषभ पंतच्या हातात गेला. मात्र हा झेल आहे की, या संभ्रमात ऋषभ पंत होता. अशावेळी सरफराजने बॅटचा आवाज ऐकून कर्णधार रोहित शर्माला रिव्ह्यू घेण्यासाठी भाग पाडले.

***WTC च्या इतिहासात सर्वाधिक विकेट घेणारे***

*आर अश्विन – १८९*
*नॅथन लिऑन – १८७*
*पॅट कमिन्स – १७५*
*मिचेल स्टार्क – १४७*
*स्टुअर्ट ब्रॉड – १३४*

सरफराजच्या या हुशारीमुळे अश्विनला विल यंगची विकेट मिळाली आणि त्याने विक्रम केला. यानंतर उपहारानंतर धोकादायक वाटणाऱ्या डेव्हॉन कॉनवेलाबाद करत अश्विनने न्यूझीलंडला तिसरा धक्का दिला.




*मुंबई: प्रो कबड्डी लीगच्या (पीकेएल) दहाव्या हंगामातील विजेते पुणेरी पलटणने पहिला सीआयआय फ्रँचायझी ऑफ द इयर 'पुरस्कार पटकावला आहे. कबड्डीच्या माध्यमातून क्रीडा क्षेत्रामध्ये अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना गौरविण्यात आले. यावेळी पुणेरी पलटणचे मुख्य कार्यकारी अधिकारी कैलाश कांडपाल, विपणन विभागाचे प्रमुख सिद्धांत सुवर्णा आदी उपस्थित होते. पुणेरी पलटणच्या जेतेपदामध्ये अस्लम इनामदार, मोहित गोयत, पंकज मोहिते आणि आकाश शिंदे यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. पुणेरी पलटणच्या युवा पलटण या स्थानिक स्तरावरील विकास उपक्रमाने युवा खेळाडूंच्या प्रतिभेला मोठे व्यासपीठ मिळवून देतानाच त्यांचा विकास करण्याची महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे.*

## ऐन दिवाळीमध्ये ट्रॅव्हल्सने प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे दिवाळे; दरात तिप्पटीने वाढ

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई : दिवाळीच्या सुट्ट्यामध्ये लोकं गावी जाण्यासाठी एसटीने नाही तर रेल्वेने प्रवास करतात. मात्र दिवाळीच्या तोंडावर आता एसटी आणि रेल्वेच्या गाड्यांचे बुकिंग फुल्ल झाल्यामुळे दिवाळीसाठी गावी निघालेल्या प्रवाशांना खासगी ट्रॅव्हल्स हा एकमेव पर्याय उपलब्ध आहे. मात्र खासगी ट्रॅव्हल्सने आता तिकीटाचे दर तिप्पटीने वाढवल्याचे समोर आले आहे. त्यामुळे ऐन दिवाळीमध्ये ट्रॅव्हल्सने प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे दिवाळे निघणार असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. दिवाळीनिमित्त हंगामी दरवाढीमुळे प्रवाशांना आता आर्थिक फटका बसणार आहे.

दिवाळीनिमित्त गावी जाण्यासाठी अनेकजण अगोदरच तिकिटांचे बुकिंग करतात. काही वेळेस एसटी बस आणि रेल्वेचे तिकिट बुकिंग फुल्ल झाल्यामुळे त्या प्रवाशांना आता खासगी ट्रॅव्हल्स हा पर्याय उरतो. मात्र खासगी ट्रॅव्हल्सकडून दिवाळीच्या अगोदरच तिकिटांच्या दरामध्ये तिप्पटीने वाढ झाल्याचे दिसून येत आहे. तसेच खासगी ट्रॅव्हल्स चालकांना नियमानुसार एसटी बसच्या दिडपट तिकीट घेता येते; मात्र त्यांनी दर प्रमाणाबाहेर वाढविले आहेत.

दिवाळीनिमित्त अनेकांनी शुक्रवारी रात्रीपासूनच गावी किंवा कुठे तरी बाहेर फिरायला जाण्याचे नियोजन आखले आहे. मात्र, दिवाळी सुट्टीच्या हंगामाच्या पार्श्वभूमीवर खासगी ट्रॅव्हल्स चालकांनी तिकीट भाड्यात तिप्पटीने वाढ केल्यामुळे प्रवाशांना भाडेवाढीला सामोरे जावे लागणार आहे. दिवाळीच्या अगोदर म्हणजेच महिनेच्या अखेर कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, महाबळेश्वर, नागपूर अमरावतीसाठी सुटणाऱ्या खासगी बसगाड्यांचे बुकिंग फुल्ल झाले आहे. बंगळुरू, सुरत, अहमदाबादपर्यंत प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा याच दिवसांमध्ये प्रवास करण्याचा कल आहे, अशी माहिती दादरमधील खासगी बसचालकांनी दिली आहे.

## बेस्टच्या दिव्यांग चालकांना काम नाकारणाऱ्या अधिकाऱ्यांना कामगार न्यायालयाचे फौजदारी समन्स

प्रतिनिधी
■ मुंबई

बेस्ट उपक्रमातील काही बस चालकांना सेवेत असतांना शारीरिक दुबाल्य प्राप्त झाल्यामुळे दि राईट्स ऑफ पर्सन्स विथ डिसएबिलीटी, अधिनियम, २०१६ अन्वये संबंधीत शासकिय / माहानगरपालिका रुग्णालयांनी दिव्यांग प्रमाणपत्रे प्रदान केली. मात्र त्या बस चालकांनी त्याचे ड्रायव्हिंग अनुज्ञप्ती नुतनीकृत करून घेतली या कारणाखाली ते कामगार पर्यायी कामासाठी पात्र असतांना बेस्टच्या वैद्यकिय आणि कामगार विभागाच्या काही अधिकाऱ्यांनी संगनमत करून त्यांना पार्यायी कामे देण्या ऐवजी बेकायदा आरोपपत्र बजावली.प्रकरण न्यायालयात गेल्यानंतर या

बेस्ट अधिकाऱ्यांना समन्स काढून पुढील सुवणीसाठी १२/११/२०२४ रोजी व्यक्तीगत रित्या हजर राहण्याचे आदेश पारीत केले आहेत.

दि राईट्स ऑफ पर्सन्स विथ डिसएबिलीटी, अधिनियम , २०१६ च्या कलम २० नुसार त्यांना पर्याची काम देण्या बाबत मा. औद्योगिक न्यायालय, मुंबई यांच्या सामने तक्रार (चु.एल.पी.) क्र.१०८/२२ (श्री. पोपट शिंदे बस चालक), १८३/२२ ( अरूण खांडे बस चालक), ७१/२२ ( देवराज यादव बस चालक), ७४/२२ ( संजय घार्गे बस चालक), ७५/२२ ( श्रीपती डांगरे- बस चालक), २६५/२२ . मंगेश शिरसाट- बस चालक ) आणि २८३/२२ ( शिवाजी सकपाळ बस वाहक) २०२२ मध्ये दाखल केली.

या प्रकरणांत एका बस वाहकाचा देखील समावेश आहे, ज्याने कोणत्याही प्रकारे गैरव्यवहार केलेला नव्हता. अंतरिम सुनावणी अखेरीस मा. औद्योगिक न्यायालय, मुंबई यांनी संबंधीत ६ बस चालक आणि १ बस वाहक यांना दि राईट्स ऑफ पर्सन्स विथ डिसएबिलीटी, अधिनियम, २०१६ च्या कलम २० नुसार त्यांना पर्यायी काम देण्या बाबत बेस्ट उपक्रम, महाव्यवस्थापक, संबंधीत वैद्यकिय आणि कामगार विभागाच्या अधिकाऱ्यांना आदेश दिले. मात्र जवळपास २० महिने उलटून गेल्या नंतरही सदर दिव्यांग कामगारांना काम देऊन सदरहू आदेशांचे पालन करण्यात कसूर केल्यामुळे सदर कामगारांनी मा. कामगार न्यायालयात फौजदारी गुन्हा बेस्टचे महाव्यवस्थापक तसेच वैद्यकिय आणि कामगार विभागाच्या संबंधीत अधिकाऱ्या विरूध्द दाखल केला असून त्यांचे अनुक्रमे क्र. मिसलेनियस क्रिमिनल कंम्प्लेंट (यु. एल.पी.) क्र. ६ ते १२-२०२४ आहेत.

ही प्रकरणे दाखल केल्या नंतर शिवाजी सकपाळ, बस वाहक यांना २०/०८/२०२४ रोजी उपक्रमाने पर्यायी कामावर हजर करून घेतले. मात्र दि.२७/०३/२०२३ रोजी त्यांना कामावर हजर करून घेण्या बाबतचा आदेश असतांना जवळपास १७ महिने आदेशाची अंमलबजावणी न झाल्याने त्यांच्या प्रकरणी देखील समन्स काढण्यात आले आहे. या प्रकरणी गुन्हा सिध्द झाल्यास संबंधीत आरोपींना कारावास आणि / किंवा दंड या शिक्षा होऊ शकतील. असे बेस्ट कामगार सेनेचे कार्याध्यक्ष अँड. उदयकुमार अनंत आंबोणकर यांनी सांगितले.

## तिसऱ्या मुंबईचे नाव अखेर ठरले

### 'केएससी न्यू टाऊन' म्हणून ओळखली जाणार !



प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई आणि नवी मुंबई या शहरांवरील ताण कमी व्हावा या दृष्टीने विकसित करण्यात येत असलेल्या तिसऱ्या मुंबईचे अखेर नामकरण झाले आहे. कर्नाळा-साई-चिरनेर न्यू टाऊन (केएससी न्यू टाऊन) या नावाने ही तिसरी मुंबई ओळखली जाईल.

नवी मुंबई विमानतळाच्या प्रभाव क्षेत्रात नवे शहर विकसित केले जात आहे. २०१३ साली नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र म्हणजेच नैना प्रकल्पाची घोषणा करण्यात आली होती. या प्रकल्पातील ८० गावांचा समावेश तिसऱ्या मुंबईत करण्यात आला आहे. खोपटा न्यू टाऊन अधिसूचित क्षेत्रातील ३३ गावे, मुंबई महानगर प्रादेशिक योजनेतील २ आणि रायगड प्रादेशिक योजनेतील ९ गावेही यात समाविष्ट आहेत.

केएससी न्यू टाऊनसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विकास प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे एमएमआरडीएतर्फे या नव्या शहरासाठी आराखडा तयार केला जात आहे. तसेच एमएमआरडीएला भूसंपादनाचे अधिकार देण्यात आले आहेत. शहर विकसित करताना येथे रहिवासी संकुलांसोबतच औद्योगिक वसाहतीही उभारल्या जातील. त्यामुळे रोजगार निर्मिती होऊ शकेल. एखाद्या विकसित शहराप्रमाणेच येथे सर्व सोयी-सुविधा उभारल्या जातील. चिरनेर येथील जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टचा परिसर केएससी न्यू टाऊनमध्ये समाविष्ट असेल. तसेच कर्नाळा पक्षी अभयारण्यही याच क्षेत्रात येते. यावरूनच नव्या शहराचे नाव कर्नाळा-साई-चिरनेर न्यू टाऊन असे ठेवण्यात आले आहे.

## 11 व्या मानांकित अहानचा दुसरा सीडेड आरववर विजय

### एमएसएलटीए-सीसीआय अखिल भारतीय रँकिंग टेनिस स्पर्धा

प्रतिनिधी
■ मुंबई

एमएसएलटीए-सीसीआय अखिल भारतीय रँकिंग टेनिस स्पर्धेत 14 वर्षांखालील मुले गटात दुसरा मानांकित आरव छल्लानीसह तिसरा मानांकित अर्जुन मणिकानंदचे उपांत्यपूर्व फेरीत संपुष्टात आले.

क्रिकेट क्लब ऑफ इंडियाच्या (सीसीआय) टेनिस कोर्टवर सुरू असलेल्या स्पर्धेत बुधवारी दुसरा सीडेड आरवला 11व्या मानांकित अहान जैनने 6-2, 1-6, 6-4 असे हरवले. नववा सीडेड माधव दधीचने तिसरा सीडेड अर्जुन मणिकानंदवर 6-2, 6-1 अशी सरळ सेटमध्ये मात केली. आरवसह अर्जुनला बाहेरचा रस्ता धरावा लागला तरी सातवा सीडेड अंश रामानी आणि बिनसीडेड माहीन झवेरीने अंतिम चार खेळाडूंमध्ये स्थान मिळवले.

मुलींमध्ये पहिल्या तीन सीडेड खेळाडूंनी आगेकूच केली. अव्वल मानांकित आराध्या मीना आणि तिसरी मानांकित पद्मा रमेशकुमारने आपापल्या प्रतिस्पर्ध्यांना सरळ सेटमध्ये हरवले. दुसऱ्या सीडेड जान्हवी तम्मिनेदीला बिनसीडेड जानकी रविकुमारने झुंजवले. मात्र, चौथ्या सीडेड आयशा बागलाला बिनसीडेड कृशिका गौतमकडून पराभवाचा धक्का बसला.

**निकाल** -14 वर्षांखालील मुले (उपांत्यपूर्व फेरी): 7-अंश रामाणी विजयी वि. आरव मुळ्ये 4-6, 6-2, 7-5;माहिन झवेरी विजयी वि. कियान पटेल 2-6, 6-1, 6-2; 9-माधव दधीच विजयी वि. 3-अर्जुन मणिकानंद 6-2, 6-1; 11-अहान जैन विजयी वि. 2-आरव छल्लानी 6-2, 1-6, 6-4.

**मुली:** 1-आराध्या मीना विजयी वि. 6-कीर्तियानी घाटकर 6-1, 6-2; कृशिका गौतम विजयी वि. 4-आयशा बागला 2-6, 6-2, 6-3; 3-पद्मा रमेशकुमार विजयी वि. आयुश्री तरंगे 6-1, 6-2; 2-जान्हवी तम्मिनेदी विजयी वि. जानकी रविकुमार 0-6, 6-0, 7-6(5).



*मुंबई : ज्येष्ठ शिक्षक चंद्रबली गिरी यांचा सेवापूर्ति सत्कार समारोह महाराष्ट्र राज्य शिक्षण संचालक महेश पालकर यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत संपन्न झाला*

*मुंबई : महायुती मध्यें जागावाटपात रिपब्लिकन पक्षावर (आठवले गट ) अन्याय होत असल्याने नाराज रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी रिपब्लिकन पक्षाचे मध्यवर्ती कार्यालयाजवळ,आझाद मैदान , मुंबईत गुरुवारी एल्गार दुपारी एल्गार मेळाव्याचे आयोजन केले होते.या मेळाव्यास रिपाई नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.*



## लिबास सहभागात बॉम्बे टाइम्स फॅशन वीक फिनालेचा समारोप



प्रतिनिधी
■ मुंबई

टेलिव्हिजनचे मेगास्टार रोनित बोस रॉय आणि जोशपूर्ण सौंदर्या शर्मा यांनी लिबाससाठी शोस्टॉपर म्हणून रॅम्पवर जलवा दाखवला. सौंदर्याने 'मस्ताना' कलेक्शनमधील फुलांनी सजवलेले गुलाबी लेहंगा परिधान केले होते, तर रोनितने हस्तनिर्मित कटदाना वर्क असलेले हत्ती दांत पांढरे बंदगला ट्रेंच कोट परिधान केले होते.हा कलेक्शन प्रत्येक गोष्टीचा प्रतीक होता जी वधू आणि त्यांच्या पोशाखाशी संबंधित आहे.

कलेक्शन स्वच्छ पांढरे, मऊ काळे आणि म्यूट गोल्ड टोनमधून प्रवास करत होते. हा शो एक काव्यात्मक प्रवास होता जो परिवर्तन आणि पुनःशोध दर्शवतो. बीटीएफडब्ल्यू कलेक्शनचे मास्टरपीस लवकरच पेडर रोड, मुंबई आणि दुबईमधील लिबास स्टोअर्समध्ये उपलब्ध होणार आहेत.

## पाकिस्तानी मॉडेलचा बिकिनीवर रॅम्प वॉक; कठोर टीका झाल्यानंतर व्हिडीओ केला डिलीट

**इस्लामाबाद :** पाकिस्तान हे इस्लामी राष्ट्र असल्यामुळे तेथील महिलांनी हिजाब परिधान करावा, असा आग्रह धरण्यात येतो. महिलांच्या उदारीकरणाला पाकिस्तानमध्ये विरोध होत आला आहे. आधुनिक जीवनशैली आणि सोशल मीडियाचा वापर करत असल्यामुळे एका तरुणाने त्याच्याच कुटुंबातील चार महिलांची हत्या केल्याची घटना नुकतीच कराचीमध्ये घडली. त्यानंतर आता एका पाकिस्तानी मॉडेलला तेथील लोकांच्या पुराणमतवादी धोरणांना बळी पडावे लागले आहे. मिस ग्रँड इंटरनॅशनल २०२४ या स्पर्धेत बिकिनी घालून रॅम्प वॉक केल्यानंतर पाकिस्तानी मॉडेल रोमा मायकलवर टीका होऊ लागली आहे. या टीकेनंतर रोमा मायकलने आपल्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरून सदर व्हिडीओ डिलीट केला. मात्र सध्या हा व्हिडीओ व्हायरल होत असून पाकिस्तानवर टीका केली जात आहे. रोमा मायकलला व्हिडीओ डिलीट करावा लागल्यानंतर ते सोशल मीडियावर ट्रेंड होऊ लागली आहे. पाकिस्तानमधील काही गटांनी तिच्या पेहरावावर आक्षेप घेतल्यानंतर इन्स्टाग्रावर पोस्ट केलेला बिकिनीवरील व्हिडीओ तिला डिलीट करावा लागला. यामुळे ती आता चर्चेत आली असून जगभरातून पाकिस्तानच्या पुराणमतवादी विचारसरणीवर टीका होऊ लागली आहे. तसेच तिचा बिकिनीवरील व्हिडीओ व्हायरल होत आहे.



# विमान कंपन्यांना दिलेल्या धमक्यांप्रकरणी आठ एफआरआय दाखल

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**

देशभरात ९५ विमानांना बॉम्बच्या धमक्या आल्या आहेत. काही दिवसांपासून विमान कंपन्यांना मेल आणि मेसेजद्वारे धमक्या येत आहेत. ज्यात २० एअर इंजिया, २० इंडिगो, २० विस्तारा आणि २५ आकाशा विमानांचा समावेश आहे. याशिवाय स्पाइसजेटच्या ५ विमानांना आणि अलायन्स एअरच्या ५ विमानांनाही धमक्या देण्यात आल्या आहेत. यामुळे सुरक्षा यंत्रणेत भितीचे वातावरण आहे. याप्रकरणी आता दिल्ली पोलिसांनी ९० हून अधिक देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमानांना धमकावल्याप्रकरणी आठ एफआरआय दाखल करण्यात आल्याची माहिती आहे.



मिळालेल्या वृत्तानुसार, एका दिवसांमध्ये ९५ विमाने उडवून टाकण्याची धमकी देण्यात आली आहे. जी अत्यंत गंभीर आहे. एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याच्या म्हणण्यानुसार, हे धमकीचे संदेश X ट्विटर अकाऊंटरही आले होते असे सांगण्यात आले आहे. याप्रकरणी आता पोलिसांनी संबंधित एक्स ट्विटरवर आलेल्या मेसेजच्या खात्याची माहिती मिळवली आहे. याप्रकरणात एका आठवड्याहून कमी कालावधीत २५० हून अधिक विमानांना बॉम्बने धमक्या देण्यात आल्या. सायबर सेल आणि दिल्ली पोलिसांचे इतर पथक या धमक्यांच्या चौकशी करत असून सोशल मीडियावर लक्ष ठेऊन आहेत. ही बाब गांभीर्याने घेत सरकार विमान कंपन्यांच्या सुरक्षेसाठी नवीन कायदे करण्याचा विचार करत आहेत.

## आज पुन्हा 85 विमानांवर बॉम्बस्फोटाची धमकी

**नवी दिल्ली**

देशातील विमानांवर बॉम्बच्या धमकीचा ट्रेंड थांबलेला नाहीये. गुरुवारीही इंडिगो, एअर इंडिया, विस्तारा आणि आकासा एअरच्या 85 फ्लाइटमध्ये बॉम्बच्या धमक्या आल्या होत्या. यापैकी 20 उड्डाणे एअर इंडियाची, 20 इंडिगोची, 20 विस्ताराची आणि 25 उड्डाणे आकाशाची आहेत. एक दिवस आधी, 23 ऑक्टोबर रोजी, आयटी मंत्रालयाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X, मेटा आणि एअरलाइन कंपन्यांसोबत या धमक्यांबाबत व्हर्च्युअल बैठक घेतली होती. सरकारने सोशल मीडिया कंपन्यांना या धोकादायक अफवांचा प्रसार रोखण्यासाठी काय केले आहे,

# काश्मिरात सैन्य वाहनावर दहशतवादी हल्ला, 3 जवान शहीद



**वृत्तसंस्था**
**श्रीनगर**

गुरुवारी संध्याकाळी जम्मू-काश्मीरमधील बारामुल्ला जिल्ह्यातील गुलमर्गच्या नागिन भागात नियंत्रण रेषेजवळ 18 राष्ट्रीय रायफल्सच्या वाहनावर दहशतवाद्यांनी हल्ला केला. दहशतवाद्यांनी केलेल्या गोळीबारात तीन जवान शहीद झाले असून एका पोर्टरचा मृत्यू झाला आहे. सैन्याला मदत करण्यासाठी पोर्टर्स असतात, ते डोंगराळ भागात आणि पुढच्या चौक्यांमध्ये सामान पोहोचवण्यास मदत करतात. या हल्ल्यात लष्कराचे 7 जवान जखमी झाले आहेत. सर्व जखमींना श्रीनगरमधील 92 बेस हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले, त्यापैकी 3 जवानांचा मृत्यू झाला.

या हल्ल्यात 50 हून अधिक दहशतवादी सामील लष्कराच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार या हल्ल्यात 50 हून अधिक दहशतवादी सहभागी असू शकतात. त्याचवेळी सुरक्षा दलांनी परिसराला वेढा घातला असून दहशतवाद्यांचा शोध सुरू केला आहे. उत्तर काश्मीरमधील बोटा पाथरी सेक्टरमध्ये एलओसीवरून दहशतवाद्यांनी घुसखोरी केली असावी, असा अंदाज आहे.

पुलवामामध्ये सकाळी दहशतवादी हल्ला, मजूर जखमी आज सकाळी दक्षिण काश्मीरमधील पुलवामा जिल्ह्यातील बटगुंडमध्ये दहशतवाद्यांनी आणखी एका मजुरावर गोळीबार केला होता, त्यात तो जखमी झाला होता. जखमी शुभम कुमार हा यूपीचा रहिवासी आहे. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

याआधी 20 ऑक्टोबरच्या रात्री जम्मू-काश्मीरच्या गांदरबलमध्ये झालेल्या हल्ल्यात काश्मीरमधील एक डॉक्टर, एमपीचा एक अभियंता आणि पंजाब आणि बिहारमधील 5 मजुरांना आपला जीव गमवावा लागला होता. याची जबाबदारी लष्करच्या द रेझिस्टन्स फ्रंट (TRF) या संघटनेने घेतली आहे. बुधवारी या हल्ल्यात दहशतवादी सहभागी असल्याचे चित्र समोर आले. हातात AK-47 सारखी रायफल घेतलेला एक दहशतवादी एका इमारतीत शिरताना दिसत आहे. टीआरएफ प्रमुख शेख सज्जाद गुल हा या हल्ल्याचा मास्टरमाईंड होता. दहशतवादी हल्ल्यात मारले गेलेले कामगार केंद्र सरकारच्या प्रकल्पावर काम करत होते.

***टीआरएफ प्रमुख शेख सज्जाद मास्टरमाइंड***
*लश्कर-ए-तोएबाची संघटना असलेल्या रेझिस्टन्स फ्रंटने (टीआरएफ) हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. रिपोर्ट्सनुसार, टीआरएफने गेल्या दीड वर्षात आपली रणनीती बदलली आहे. पूर्वी TRF काश्मीर पंडितांची टार्गेट किलिंग करत असे. आता ही संघटना बिगर काश्मिरी आणि शीखांना लक्ष्य करत आहे.*

पान ९ वरुन

### बारामतीमध्ये काका विरुद्ध पुतण्या

- जामनेर – दिलीप खोडपे
- मुक्ताईनगर – रोहिणी खडसे
- मुर्तिजापूर – सम्राट डोंगरदिवे
- नागपूर पूर्व – दुनेश्वर पेठे
- तिरोडा – रविकांत बोपचे
- अहेरी – भाग्यश्री आत्राम
- बदनापूर – रुपकुमार चौधरी
- मुरबाड – सुभाष पवार
- घाटकोपर पूर्व – राखी जाधव
- आंबेगाव – देवदत्त निकम
- बारामती – युगेंद्र पवार
- कोपरगाव – संदीप वर्पे
- शेवगाव – प्रताप ढाकणे
- पारनेर – रानी लंके
- आष्टी – महेबुब शेख
- करमाळा – नारायण पाटील
- सोलापूर उत्तर – महेश कोठे
- चिपळूण – प्रशांत यादव
- कागल – समरजीत घाटगे
- तासगाव-कवठे महांकाळ – रोहित पाटील
- हडपसर – प्रशांत जगताप

### आई अन् बहिणीच्या विरोधात माजी मुख्यमंत्र्यांची कोर्टात

जगन मोहन रेड्डी यांनी ऑगस्ट २०२४ मध्ये शर्मिला यांना एक पत्र लिहून आपली बाजू मांडली. ज्यात त्यांनी, आपल्या वडिलांनी हयात असतानाच सर्व संपत्तीची वाटणी केली होती. त्यांनी त्यांच्या आयुष्यात जेवढी मालमत्ता कमावली होती त्याचं त्यांनी योग्य वाटप केलं होतं. त्याशिवाय मी माझ्या कष्टाने आणि सचोटीने व्यवसाय उभे केले आहेत, ते कुठल्याही कौटुंबिक मालमत्तेशी संबंधित नाहीत. जगन मोहन रेड्डींनी हेही सांगितल की, मागच्या दहा वर्षात वायएस शर्मिला यांना साधारण २०० कोटी रुपये देण्यात आलेले आहेत. जे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रुपयाने आपली आई विजयम्मा यांच्या वतीने देण्यात आलेले होते. 'शर्मिला, मी नेहमीच मालमत्ता हस्तांतरित करण्यासाठी तयार होतो, मात्र कायदेशीर अडचणींमुळे ते शक्य झालं नाही.' असंही जगन मोहन रेड्डी सांगतात.

# भारताकडून जिवाला धोका, माझ्या माथी मरण लिहिले

## 3 दिवसांपूर्वी एअर इंडियाच्या विमानांमध्ये स्फोटाची धमकी

**वृत्तसंस्था**
**जालंधर**

शीख फॉर जस्टिस (SFJ) दहशतवादी गुरपतवंत सिंग पन्नूने आपल्या जिवाला धोका असल्याचे म्हटले आहे. कॅनडाच्या एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्याने भारत सरकारवर अनेक आरोप केले. माझ्या माथी मृत्यू लिहिला आहे, पंजाबींसाठी वेगळ्या देशाच्या मागणी केल्याने हरदीपसिंग निज्जर याची हत्या करण्यात आली, असे तो म्हणाला.

पन्नू असेही म्हणाले, कॅनडातून निष्कासित करण्यात आलेले भारतीय उच्चायुक्त संजय कुमार वर्मा हे राजनयिक नसून ढोंगी व्यक्ती आहेत.



पन्नूच्या हत्येच्या कटात हरियाणातील रेवाडी येथील विकास यादव या तरुणाचाही हात असल्याचा दावा नुकताच अमेरिकन सरकारने केला होता. विकास यादव यांच्यावर अमेरिकेने आरोप निश्चित केले आहेत. हत्येचा कट रचण्यासोबतच विकासवर मनी लॉंड्रिंगचाही आरोप आहे.

मोदी आणि भारतीय उच्चायुक्तांची वेगवेगळी विधाने जो कोणी भारताच्या विरोधात जाईल, त्याच्यावर कारवाई केली जाईल आणि त्याला ठार केले जाईल, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेत म्हटले होते. पण कॅनडातील भारताचे माजी उच्चायुक्त संजय कुमार वर्मा म्हणतात की, आम्ही कोणत्याही देशाच्या भूमीवर अशी कारवाई करत नाही, ज्यामुळे कोणत्याही देशाच्या कायद्याला धक्का पोहोचेल.

हत्येच्या प्रयत्नात रॉ एजंट निखिल गुप्ताचे नाव हरदीप सिंग निज्जरची हत्या आणि पन्नूच्या खुनाच्या प्रयत्नाबाबत पन्नूला प्रश्न विचारला असता तो म्हणाला- अमेरिकेत माझ्या हत्येचा प्रयत्न झाला. तपासात रॉ एजंट निखिल गुप्ताचे नाव पुढे आले. पुरावा म्हणून त्यांच्या संभाषणाचे मेसेज आणि व्हिडिओही देण्यात आले होते.

पंजाबींसाठी वेगळ्या देशाच्या मागणीसाठी निज्जरची हत्या गुरूंच्या कृपेने मी वाचलो, पण निज्जरला मारण्यासाठी शूटर नेमले गेले आणि तो मारला गेला. पंजाबींसाठी वेगळ्या देशाच्या मागणीसाठी निज्जर याची हत्या करण्यात आली होती. निज्जर हा खलिस्तान सार्वमताचा प्रमुख नेता होता.

माझ्या मृत्यूची वेळ निश्चित आहे पन्नू म्हणाला- माझ्या कपाळावर माझ्या मृत्यूची वेळ आणि दिवस लिहिलेला आहे. मला कितीही धमकावले किंवा धमकावले गेले तरी मी खलिस्तान सार्वमत चालवणे थांबवणार नाही.

# इम्रान यांच्या पत्नी बुशरा 9 महिन्यांनंतर तुरुंगातून बाहेर

**वृत्तसंस्था**
**इस्लामाबाद**

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्या पत्नी बुशरा बीबींना तोशाखाना प्रकरणी जामीन मिळाला आहे. इस्लामाबाद हायकोर्टाने बुशरांची 10 लाख रुपयांच्या जामिनावर सुटका केली आहे. बुशरा गेल्या 9 महिन्यांपासून रावळपिंडीच्या अदियाला तुरुंगात बंद होत्या. त्यांना कडेकोट बंदोबस्तात येथून सोडण्यात आले.

बुशरांची सुटका झाल्यानंतर बुशरा बनी गाला येथील त्यांच्या घरी रवाना झाल्या. येथे त्या पाकिस्तान तहरीक-ए-इन्साफ पक्षाच्या (पीटीआय) नेत्यांची भेट घेणार आहे. त्यांच्या सुटकेची माहिती पीटीआयने ट्विटरवर दिली आहे. यापूर्वी 13 जुलै रोजी इद्दत म्हणजेच बनावट विवाह प्रकरणात इम्रान खान आणि बुशरा यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली होती. मात्र, काही तासांनंतर या दोघांनाही नॅशनल अकाउंटेबिलिटी ब्युरोने (एनएबी) तुरुंगात अटक केली. इम्रान खान अजूनही याच तुरुंगात आहेत.

इम्रान रावळपिंडीच्या अदियाला तुरुंगात 3 वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये 350 दिवसांपासून बंद आहे. इस्लामाबादच्या स्थानिक न्यायालयाने 5 ऑगस्ट 2023 रोजी तोशाखाना प्रकरणात त्यांना दोषी ठरवले होते. यानंतर त्यांना इस्लामाबादच्या जमान पार्क येथील घरातून अटक करून तुरुंगात पाठवण्यात आले. नंतर त्यांना आणखी 2 प्रकरणात दोषी ठरवण्यात आले. मात्र, या सर्व प्रकरणात इम्रान यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

# अयोध्यानगरी 28 लाख दिव्यांनी उजळणार...55 घाटांवर रोषणाई

**वृत्तसंस्था**
**गुवाहाटी**

उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी यंदाही अयोध्येचा आठवा दीपोत्सव भव्य-दिव्य पद्धतीने साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. यानिमित्ताने शरयू नदीच्या 55 घाटांवर 28 लाख दिवे प्रज्वलित करून नवा विश्वविक्रम करण्याची तयारी सुरू आहे. दीपोत्सवाच्या तयारीचा एक भाग म्हणून डॉ. राम मनोहर लोहिया अवध विद्यापीठाने दिवे आणि स्वयंसेवकांची संख्या निश्चित केली आहे, जेणेकरून हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नियोजनबद्ध काम मोठ्या प्रमाणावर करता येईल.

या कार्यक्रमांतर्गत शरयू नदीच्या 55 घाटांवर 28 लाखांहून अधिक दिवे प्रज्वलित करण्यात येणार आहेत. घाट संयोजकांच्या देखरेखीखाली राम की पायडी, चौधरी चरणसिंग घाट आणि भजन संध्या स्थळासह इतर सर्व घाटांवर दिवे लावले जातील. याशिवाय 14 संलग्न महाविद्यालये, 37 मध्यवर्ती महाविद्यालये आणि 40 स्वयंसेवी संस्थांमधील सुमारे 30,000 स्वयंसेवक या उपक्रमात सक्रियपणे सहभागी होणार आहेत. घाटांवर दिव्यांची संख्या आणि स्वयंसेवकांचे वाटप आधीच ठरलेले आहे.



अवध विद्यापीठाने घाटांवर लावले जाणारे दिवे आणि तैनात करण्यात येणाऱ्या स्वयंसेवकांची सविस्तर आकडेवारीही प्रसिद्ध केली आहे. उदाहरणार्थ, राम की पैडीच्या घाट 1 वर 65,000 दिवे लावण्यासाठी 765 स्वयंसेवक तैनात केले जातील, तर 447 स्वयंसेवक घाट 2 वर 38,000 दिवे लावण्यासाठी जबाबदार असतील. तसेच घाट क्रमांक 3 मध्ये 48 हजार दिव्यांच्या कामासाठी 565 स्वयंसेवक तर 61 हजार दिव्यांच्या कामासाठी 718 स्वयंसेवक घाट 4 येथे तैनात करण्यात येणार आहेत.

दीपोत्सवाचे नोडल अधिकारी प्रा. संत शरण मिश्रा म्हणाले की, 30 ऑक्टोबर रोजी होणाऱ्या या दीपोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. 24 ऑक्टोबरपासून दिव्यांची खेप घाटांवर येण्यास सुरुवात झाली असून, घाटांवर दिवे लावण्याचे काम 25 ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. स्वयंसेवकांच्या आय-कार्डचे वितरणही सुरू झाले असून, त्यापैकी 15 हजारांहून अधिक आय-कार्ड संस्थांच्या अधिकाऱ्यांना वितरित करण्यात आले आहेत. शुक्रवारपर्यंत सर्व संस्थांना आय-कार्ड उपलब्ध करून दिले जातील.

# तीन महिने आईच्या सांगाड्याची पूजा करत होता, जेवणही भरवायचा...

**वृत्तसंस्था**
**गुवाहाटी**

आसामच्या गुवाहाटीत अंगाचा थरकाप उडवणारी एक घटना समोर आली आहे. गेल्या तीन महिन्यांपासून एक व्यक्ती आपल्या आईच्या सांगाड्यासोबत राहात होता. सांगाड्याची दररोज पुजा करण्याबरोबरच आपल्या हाताने तिला जेवण भरवण्याचाही प्रयत्न करायचा. धक्कादायक म्हणजे या व्यक्तीने स्वत:ला एका खोलीत बंद करुन घेतलं होतं. घराच्या बाहेर तो कुठेही जात नव्हता आणि बाहेरच्या व्यक्तीला घरात येऊ देत नव्हता. त्यामुळे या घरात काय सुरु आहे याचा शेजाऱ्यांनाही अंदाज आला नाही.



मृतदेहाचा सांगाडा बनला होता. घरातून उग्र वास येऊ लागल्याने शेजारच्यांनी त्या व्यक्तीला काय घडलंय हे विचारण्याचा प्रयत्न केला. तसंच त्याची आई बरेच दिवस दिसली नसल्याचंही विचारलं. पण त्या व्यक्तीने या प्रश्नांचं कोणतंच उत्तर दिलं नाही. त्यामुळे शेजारच्यांना संशय येऊ लागला.

अखेर काही शेजाऱ्यांनी एकत्र येत त्या व्यक्तीच्या घरी धडक दिली आणि तुझी आई कुठे आहे अशी विचारणा केली. अचानक बरीच लोकं आलेली पाहून तो व्यक्ती घाबरला आणि त्याने आईचा मृत्यू झाल्याचं सांगितलं.


# जस्टिन ट्रुडो यांच्या राजीनाम्याची मागणी, 4 दिवसांचा अल्टिमेटम

## कॅनडात 24 खासदार पंतप्रधानांच्या विरोधात, राजीनामा न दिल्यास बंड करण्याचा इशारा

**वृत्तसंस्था**
**ओटावा**

कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांना त्यांच्याच पक्षातून विरोध होत आहे. उदारमतवादी पक्षाच्या खासदारांनी ट्रुडो यांना पंतप्रधानपदावरून पायउतार होण्यासाठी 28 ऑक्टोबरपर्यंत वेळ दिला आहे. संतप्त नेत्यांनी ट्रुडो यांना एकतर पायउतार व्हा किंवा बंडखोरीला सामोरे जाण्यास तयार राहा असे सांगितले.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, ट्रुडो यांच्या पक्षाच्या 24 खासदारांनी निवडणुकीपूर्वी पंतप्रधानांना हटवण्याची मागणी केली आहे. त्यासाठी त्यांनी मागणी पत्रावर स्वाक्षरीही केली आहे. खासदारांच्या स्वाक्षरी असलेले हे मागणीपत्र अद्याप सार्वजनिक करण्यात आलेले नाही. या पत्रात खासदारांनी ट्रुडो यांना पुढील वर्षी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत पराभवाचा धोका लक्षात घेऊन निवडणुकीपूर्वी राजीनामा देण्याची मागणी केली आहे.



खासदारांनी ट्रुडो यांना चौथ्यांदा पंतप्रधानपदासाठी उमेदवारी न देण्यास सांगितले आहे. गेल्या 100 वर्षांत एकाही कॅनडाच्या नेत्याने चौथ्यांदा निवडणूक जिंकलेली नाही.

खलिस्तानी दहशतवादी हरदीपसिंग निज्जरच्या हत्येवरून त्यांचे सरकार भारतासोबत मोठ्या राजनैतिक तणावात अडकले असताना ट्रूडोंसमोर हे आव्हान आले आहे.

खासदार म्हणाले - ट्रुडो यांनी बायडेनसारखा दावा सोडावा पीएम ट्रुडो यांनी बुधवारी बंद दाराआड 20 लिबरल पक्षाच्या खासदारांचीही भेट घेतली. या बैठकीत लिबरल पक्षाचे ब्रिटिश कोलंबियाचे खासदार पॅट्रिक व्हीलर म्हणाले की, पुढील वर्षी होणाऱ्या निवडणुका जिंकण्यासाठी पंतप्रधानांचा राजीनामा आवश्यक आहे.

वेलर म्हणाले की, अमेरिकेत बायडेन यांच्या नेतृत्वाखाली डेमोक्रॅटिक पक्ष निवडणुकीत खूप मागे होता. यानंतर त्यांनी दावा सोडून कमला हॅरिस यांचे नाव पुढे केले. त्यामुळे डेमोक्रॅटिक पक्षाची आघाडी मजबूत झाली. ते म्हणाले की लिबरल पक्ष कॅनडामध्येही त्याच पद्धतीने पुनरागमन करू शकतो.

केन मॅकडोनाल्ड, न्यूफाउंडलँड, कॅनडाचे लिबरल खासदार म्हणाले की, ट्रुडो यांनी लोकांचे ऐकणे आवश्यक आहे. ते म्हणाले की त्यांचे अनेक सहकारी आहेत जे आगामी निवडणूक लढवू पाहत आहेत, परंतु कमी मतदान संख्या आणि लिबरल लोकांच्या घसरत्या लोकप्रियतेमुळे ते घाबरले आहेत.

या महिन्याच्या सुरुवातीला, ट्रुडो सरकारचा सहयोगी न्यू डेमोक्रॅटिक पार्टी (एनडीपी) ने आपला पाठिंबा काढून घेतला होता. तेव्हापासून ट्रुडो बहुमताशिवाय सरकार चालवत आहेत. एनडीपी हा खलिस्तान समर्थक कॅनडाचे शीख खासदार जगमीत सिंग यांचा पक्ष आहे.

# अमेरिका असो की चीन, कुणीही भारताकडे दुर्लक्ष करू शकत नाही

## अर्थमंत्र्यांचे वॉशिंग्टनमधील चर्चेत वक्तव्य

**वृत्तसंस्था**
**वॉशिंग्टन**

आजघडीला भारताकडे कोणताही देश मग तो अमेरिका असो वा चीन कुणीही दुर्लक्ष करु शकत नाही, असे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी एका चर्चासत्रात म्हटले आहे. वॉशिंग्टन येथील सेंटर फॉर ग्लोबल डेव्हलपमेंटने आयोजित केलेल्या 'ब्रेटन वुड्स ॲट 80: प्रायोरिटीज फॉर द नेक्स्ट डिकेड' या चर्चेत अर्थमंत्री सीतारामण यांनी सहभाग घेतला.



भारताचे प्राधान्य वर्चस्व प्रस्थापित करणे नाही तर प्रभाव वाढविण्यावर असून भारत हा सर्वात मोठा लोकशाही देश आहे. आपली लोकसंख्या सर्वाधिक आहे हे दाखवून आपले वर्चस्व प्रस्थापित करणे हा भारताचा प्राधान्यक्रम नाही. त्याऐवजी आमचा प्रभाव वाढविणे हेच ध्येय असल्याचेही अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी सांगितले.

केंद्रीय मंत्री निर्मला सीतारामण ब्रेटन वूड्स संस्थांच्या वार्षिक बैठकीत सहभागी होण्यासाठी वॉशिंग्टन येथे दाखल झाल्या. त्या म्हणाल्या, जगातील सहापैकी एक व्यक्ती भारतीय असून आपण आपली अर्थव्यवस्था आणि ती ज्या प्रकारे वाढत आहे त्याकडे दुर्लक्ष करू शकत नाही. देशातील तंत्रज्ञानातील आघाडीच्या भूमिकेचा उल्लेख करताना भारतीयांकडे जटिल कॉर्पोरेट प्रणाली चालवण्याची क्षमता आहे, असेही सीतारामण यावेळी म्हणाल्या.

### वेळेत उपचार न मिळाल्याने मुलीचा मृत्यू

**पाटणा :** उत्तर प्रदेशमधील बदायूँ येथील मेडिकल कॉलेजमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. येथे वेळेत उपचार न मिळाल्याने ७ वर्षांच्या एका मुलीचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. पीडित नाजिम हे त्यांची ७ वर्षांची मुलगी सोफिया हिला गंभीर अवस्थेमध्ये रुग्णालयात घेऊन आले. मात्र डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे तिच्यावर वेळेत उपचार होऊ शकले नाहीत. तसेच तिचा मृत्यू झाला. पीडित मुलीच्या वडिलांनी केलेल्या आरोपानुसार मुलीला रुग्णालयात आणल्यानंतर तिच्यावर उपचारांसाठी त्यांना खूप वेळ वाट पाहायला लावण्यात आली. तसेच डॉक्टरांनी उपचार करण्यास नकार दिला. यादरम्यान, डॉक्टर टीव्हीवर क्रिकेट सामना पाहत राहिले, तर सोफियाची प्रकृती बिघडत गेली. अखेरीस तिने आईच्या मांडीवरच प्राण सोडले. या घटनेनंतर पीडित कुटुंबाला शोक अनावर झाला आहे. तसेच आरोपी डॉक्टराविरोधात कठोर कारवाईची मागणी करण्यात येत आहे.